म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र. ७९७६८

१९९ स. न. ७९७६८
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
(... वाचनालय) वाचनालय/नौपाडा.
ग्रंथ — आत्मोन्नोत
ले. रा. स. चितळे
विष — निबंध
१९९

आत्मोन्नोत

निबंध

# आत्मोन्नति.

ग्रंथकार

कै० मोरेश्वर सखाराम चितळे.

प्रकाशक

रामचंद्र सखाराम चितळे.

पुणें येथें "जगद्धितेच्छु" छा. छा.

सन १८९८.

या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क प्रकाशकानें आपले स्वाधीन ठेविले आहेत.

किंमत एक रुपया.

श्रीमंत

# युवराज

# फत्तेसिंगराव गायकवाड

ह्यांचे सेवेस

त्यांच्या राजकुलास भूषविणाऱ्या

अनुपम क्षात्रतेज, गांभीर्य

बुद्धिमत्ता, गुणग्राहकता

सुशीलता, सदयता

इत्यादि अनेक गुणांच्या अभिनंदनार्थ

## हा शिक्षणविषयक ग्रंथ

कर्त्याच्या इच्छेनुरूप

प्रकाशकानें

परमादरानें सादर केला असे.

# प्रस्तावना.

प्रस्तुत ग्रंथ प्रोफेसर ब्लॅकीकृत सुप्रसिद्ध 'सेल्फ-कल्चर' या ग्रंथाचे आधारें तयार केला आहे. याचा विषय 'शिक्षण' आणि 'उन्नति' हा आहे. शिक्षणासारख्या अत्यंत उपयुक्त व महत्त्वाच्या विषयावर संगतवार रीतीनें लिहिलेले 'सेल्फकल्चर'च्या तोडीचे ग्रंथ इंग्रजी भाषेमध्येंहि थोडेच निघतील; आपल्या मराठींत तर बहुधा मिळणें कठिण. मूळ इंग्रजी ग्रंथांत शिक्षण या विषयाचा सर्व अंगांनीं फारच व्यापक व मार्मिक रीतीनें विचार केला आहे, व यामुळेंच त्या ग्रंथास महत्त्व आलेलें आहे. मूळ ग्रंथांत मानसिक—शारीरिक—व नैतिक शिक्षण असे तीन भाग केलेले आहेत, ते तसेच या ग्रंथांत उतरले आहेत.

शिक्षणासारख्या सर्वमान्य विषयावर मराठी भाषेंत व्यापक व मुद्देसूद तऱ्हेनें लिहिलेल्या ग्रंथाची आवश्यकता नजरेस येऊन त्या दिशेनें प्रयत्न करण्याचें मनानें घेतलें; परंतु अशा महत्त्वाच्या विषयावर स्वतंत्र ग्रंथ लिहिण्याची लायकी अंगीं नसल्यामुळें परावलंबनच 'अकरणात् मंदकरणम् श्रेयः' या न्यायानें इष्ट वाटलें, व त्याप्रमाणें सदरील विद्वन्मान्य इंग्रजी ग्रंथास यथामति मराठी रूप दिलें आहे. मूळ इंग्रजी ग्रंथ तात्त्विक व —त्याचा विषय शिक्षण हा गहन असल्यामुळें—बराच दुर्बोध आहे, व तो जशाचा तसा मराठींत उतरला तर सामान्य मराठी वाचकवर्गाचे अभिरुचीस कितपत पात्र होईल याबद्दल जबरदस्त शंका वाटली, यास्तव स्थल-

विशेषीं थोडाफार फेरफार करावा लागला आहे; तथापि मूळ ग्रंथांतील विचारसार जाऊं न देतां त्याचें परकीयत्व व दुर्बोधत्व घालविण्याचा प्रयत्न प्रस्तुत ग्रंथांत केला आहे, यामुळें तो सामान्य वाचकवर्गास जास्त प्रिय होईल अशी आशा आहे. या ग्रंथास मूळ ग्रंथाची योग्यता येणें दुरापास्तच आहे; तथापि केलेला प्रयत्न कितपत साधला आहे याचा निकाल सुशिक्षित व विद्वान् वाचकांवर सोंपवितों.

प्रस्तुत ग्रंथास **श्री० बाबासाहेब घोरपडे** इचलकरंजीकर यांनीं चांगला आश्रय देऊन कर्त्यास उतराई केलें.

प्रस्तुत ग्रंथ कै. वा. गणेश कृष्ण ऊर्फ भाऊसाहेब देशमुख या विद्वान् गृहस्थांच्या साहचर्याचें व कृपेचें फल होय. सदहू विद्वद्रत्नावर काळानें अकालीं झडप घातल्याबद्दल मन अत्यंत दिलगीर होतें. हा ग्रंथ तयार करण्याचे कामीं प्रो. मोरो केशव दामले एम. ए., प्रो. अच्युत सीताराम साठे एम. ए. एल. एल. बी., रा. भास्कर रामचंद्र नानल बी. ए. एल. एल. बी., रा. दामोदर रामकृष्ण बापट बी. ए. ह्या विद्वान् गृहस्थांनीं आपला अमूल्य वेळ खर्चून मनोभावानें साहाय्य केलें, इतर मित्रवर्गाकडून वेळोवेळीं आस्थापूर्वक मदत झाली, तसेंच रा. गंगाधर गोविंद गोंधळेकर म्यानेजर ‘ जगद्धितेच्छु ’ यांनींही हातभार लाविला, त्यामुळें ही महाराष्ट्र भाषेची अल्पसेवा घडली; याबद्दल त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानितों.

चिपळूण, जि. रत्नागिरी.
तारीख १।१०।९८.

**रा० स० चितळे,**
प्रकाशक.

# आत्मोन्नति

## मानसिक शिक्षण

अर्वाचीन कालामध्यें मुख्यत्वेंकरून पुस्तकांच्या साहाय्यानें शिक्षण मिळतें. ज्ञानप्राप्तीच्या कामीं पुस्तकें फार उपयुक्त आहेत ह्यांत संशय नाहीं; तसेंच कांहीं अंशीं उपयुक्त कलाकौशल्याच्या कामींही त्यांचा उपयोग होतो. परंतु कांहीं झालें तरी तीं कोणत्याही शिक्षणाचीं स्वाभाविक व मूल साधनें नव्हत; आणि ज्ञानाच्या ज्या शाखांत त्यांची अतिशय जरूर आहे त्या शाखांत देखील माझ्या मतें त्यांच्या गुणांची वाजवीपेक्षां जास्त प्रशंसा होण्याचा संभव आहे. कोणत्याही दृष्टीनें पाहिलें तरी तीं ज्ञानप्राप्तीचीं आदिकारणें नसून केवळ मदत देणारीं साधनें ह्मणजे सहकारी कारणें व उपकरणें होत; आणि उपकरणें ह्या दृष्टीनें सुद्धां तीं नैसर्गिक नसून कृत्रिमच आहेत. सृष्टीच्या लक्षपूर्वक अवलोकनानें ज्ञानप्राप्तीचीं जीं साधनें आपणांस उपलब्ध होतात त्यांस पुस्तकें केवळ साहाय्यभूत असल्यामुळें तीं गौणच समजावयाचीं. उदाहरणार्थः—सूक्ष्मदर्शक व दूरदर्शक यंत्रें घ्या. ह्यांच्या मदतीनें अ-

नेक नवीन शोधांचे कामीं अकल्पित अद्भुत गोष्टी दृष्टिगोचर होतात; परंतु त्यांचा असा उपयोग होतो ह्मणून नेत्रांच्या श्रमांची किंमत कमी करणें किंवा तिकडे मुळींच लक्ष न देणें हें कधींही योग्य होणार नाहीं. ज्ञानसंपादनाचीं मूल व योग्य साधनें ह्मटलीं ह्मणजे व्यवहार, अनुभव, मनन, मनोविकार व क्रिया हींच होत. हीं नैसर्गिक साधनें प्राप्त झालीं ह्मणजे मनुष्यांस पुस्तकांच्या साहाय्यानें अनेक स्फुट कल्पनांचा संबंध कळतो, दुसऱ्या कांहीं कल्पनांचें अप्रयोजकत्व त्यांस दूर करितां येतें, व इतर कांहीं अपुऱ्या असतात त्यांस पूर्णत्व आणितां येतें; परंतु ज्ञानप्राप्तीच्या कामीं केवळ पुस्तकें हीं सृष्ट्यवलोकनाशिवाय ओसाड मैदानांत पडलेल्या पर्जन्याप्रमाणें व सूर्यप्रकाशाप्रमाणें निष्फल होत.

॥ आर्या ॥

॥ ग्रंथसमृद्धि असे का पुण्यनदी ती, यदीय पानीय ॥
॥ घुटकाभर प्याल्यानें पानेच्छा सर्वथा निघुन जाय ? ॥ १ ॥
॥ मोठी प्रेरकशक्ति ज्ञानाची तीच एक जाणतसे ॥
॥ ज्याच्या चित्तापासुनि ती अप्रतिहत सदैव वाहतसे ॥ २ ॥

वरील कवितांत जरी कांहीं अंशीं कवित्व प्रधानत्व पावलेलें आढळतें, तरी त्यांत एक महत्त्वाचा सामान्य सिद्धांत सांगितलेला आहे. ज्याप्रमाणें ज्यानें कधींही खनिज पदार्थ पाहिला नाहीं त्याला नुसतें खनिजशा-

स्त्राचें एखादें पुस्तक वाचून त्या शास्त्रासंबधीं खरें ज्ञान प्राप्त होणार नाहीं, त्याचप्रमाणें ज्या विद्यार्थ्याला जीवयात्रेचा मुळींच अनुभव नाहीं त्या विद्यार्थ्याला गद्यपद्य ग्रंथाच्या अवलोकनानें ज्ञान संपादितां यावयाचें नाहीं; अथवा ज्याला मधुर आवाज माहित नाहींत त्याला गायनकलेच्या व्याख्यानाचा कांहींच उपयोग होणार नाहीं, अगर ज्याच्या मनांत भक्तिभाव नाहीं किंवा ज्याचें आचरण शुद्ध नाहीं, त्याला धर्मविषयक तत्त्वांपासून कांहींही बोध होणार नाहीं. ज्याप्रमाणें परावृत्तप्रकाश हा मूलप्रकाश नव्हे, अगर ज्याप्रमाणें प्रतिध्वनि हा मूलध्वनि नव्हे, त्याचप्रमाणें पुस्तकीज्ञान हें खरें ज्ञान नव्हे. खरें ज्ञान विचारशील मनांतील ज्ञानबीजापासूनच वाढतें; आणि ज्याप्रमाणें इतर पदार्थांतील पोषकद्रव्यांचें आकर्षण करून वनस्पति व प्राणी स्वतःस पुष्टि आणितात, त्याचप्रमाणें विचारी मनुष्य आपल्या मनांतील ज्ञानांकुरांचे पुष्ट्यर्थ योग्य त्या मार्गानें बाह्य कल्पना ग्रहण करितो.

म्हणून सर्व तरुण मनुष्यांस माझें आग्रहपूर्वक असें सांगणें आहे कीं, त्यांनीं केवळ पुस्तकांतील विधानांचा आपल्या मनांत संग्रह न करितां आपल्या अभ्यासास होईल तितकें करून सृष्टींतील गोष्टींच्या प्रत्यक्ष अवलोकनापासून आरंभ करावा. "**निरीक्षण कसें करावें**" ह्या नांवाचें एक उपयुक्त पुस्तक प्रसिद्ध झालें हो-

तें. " **निरीक्षण कसें करावें** " हें त्रिशब्दात्मक सूत्र प्राथमिक शिक्षणाचें वेळीं–जें अत्यंत महत्त्वाचें असूनही आमच्या दुर्दैवानें आमच्या उपेक्षेस पात्र झालें आहे–आमच्या मनांत बिंवलें ह्मणजे त्याचा मार्गदर्शकाचे नात्यानें फारच उपयोग होण्यासारखा आहे. सर्व भौतिक शास्त्रें हीं, मनाला अतिशय महत्त्वाच्या अनेक सुंदर कल्पनांची प्रतीति करून देतात ह्मणून नव्हे तर " **आपल्या नेत्रांचा कसा उपयोग करावा** " ही जी सर्व कलांमधील अत्युत्तम कला ती त्यांच्या व्यासंगानें प्राप्त होते ह्मणून, फारच महत्वाचीं आहेत. आपण सर्व आपले डोळे उघडे ठेवून किती तरी हिंडतों. परंतु सर्वच काल डोळे उघडे असले तरी ज्या क्रियेला पाहणें असें ह्मणतात ती क्रिया त्यांजकडून होत नाहीं ही अश्चर्याची गोष्ट नव्हे काय? ह्याचें कारण, इतर इंद्रियांप्रमाणें नेत्रेंद्रियालाही शिक्षणाची आवश्यकता आहे हें होय. नेत्रांस अवश्य शिक्षण न मिळाल्यामुळें व आपण पुस्तकांचे बंदे गुलाम झाल्यामुळें तें इंद्रिय मंद व सुस्त होऊन शेवटीं त्यास आपलें स्वाभाविक कामही करवेनासें होतें. आपण जें पहातों तें जाणण्याचें आणि ज्याकडे साहजिक दुर्लक्ष होण्यासारखें आहे तें पहाण्याचें शिक्षण शाळांतील व पाठशाळांतील ज्या विषयांनीं मिळतें ते प्राथमिक शिक्षणाच्या सदराखालीं येतात. या दृष्टीनें वनस्पति-शास्त्र,

प्राणी-शास्त्र, खनिज पदार्थशास्त्र, भूगर्भशास्त्र, रसायन-शास्त्र हीं शास्त्रें व शिल्प, गायन, वादन, चित्र इत्यादि कला फारच उपयोगी आहेत. आपण कितीही देशाटनें अगर पर्यटनें केलीं तरी जर आपणांस ह्या निरीक्षणमूलक शास्त्रांच्या मूलतत्त्वांचें ज्ञान नसेल तर तीं बहुतांशीं व्यर्थ होत.

निरीक्षण करणें हें निःसंशय चांगलें तर खरेंच; परंतु तेंच निरीक्षण अतिसूक्ष्म दृष्टीनें केल्यास उत्तम. परंतु हें जग वस्तुवैचित्र्यानें परिप्लुत असल्यामुळें प्रत्येक वस्तूचें स्फुट निरीक्षण करण्याशिवाय आपल्या निरीक्षणशक्तीला सृष्ट्यवलोकनाचा अन्य मार्ग जर माहीत नसता तर ती शक्ति त्या कामीं अप्रयोजक होऊन अगदीं गोंधळून गेली असती. सुदैवानें, अनेक वस्तूंचा सामान्य दृष्टीनें विचार करून त्यांचा सामान्य तत्त्वांच्या आधारानें आपल्या मनांत सुलभ रीतीनें संग्रह करून ठेवण्याचा मार्ग जन्मतः आपणांस माहीत आहे त्यामुळें वरील अडचण बरीच नाहींशी झाली आहे. ह्या व्यापक मार्गास " **वर्गीकरण** " ही संज्ञा आहे. वर्ग हे मनुष्यमात्राला आपल्या बुद्धिसामर्थ्यानें ओळखितां येतात. आणि हें जग सर्वज्ञानसंपन्न जो ईश्वर त्याची कृति असल्यामुळें वर्गीकरण ह्या जगांत सर्वत्र दृष्टीस पडतें. जगांतील अखिल वस्तुजाताचे ठायीं जें एकीकरणजनक व्यक्तिसाधर्म्य विधात्यानें निर्माण

केलें आहे त्यावरच सर्व वर्गीकरण अवलंबून आहे. ज्या वस्तू बाह्य स्वरूपावरून अगदीं भिन्न अशा दिसतात त्यांच्यांतील ऐक्य त्यांत आढळणाऱ्या सादृश्यावरून दृष्टोत्पत्तीस येतें. आणि हें सादृश्य जेव्हां लक्षपूर्वक अवलोकनानें आपणांस माहित होतें तेव्हां त्याच्या योगानें जगांतील अनंत वस्तूंचे निरनिराळे लहान मोठे भेद करून आपणांस त्यांचें वर्गीकरण करितां येतें. ह्या मोठ्या व लहान भेदांस अनुक्रमें "**जाती व**" "**उपजाती**" अशा संज्ञा आहेत. अशा रीतीनें भेद केले असतां चौकस व अवलोकनशील मनुष्यास सर्व वस्तू स्वाभाविकपणें लक्षांत ठेवितां येतात. ह्मणून ज्या ज्या गोष्टी विद्यार्थी पहातो त्या त्या गोष्टींत साधर्म्याबरोबरच वैधर्म्यही कोणकोणत्या बाबतींत आहे हें पाहण्याचें त्याचें पहिलें कर्तव्य आहे; कारण जेथें उजेड आहे तेथें सावली असावयाचीच. तसेंच साधर्म्य जेथें असतें तेथें वैधर्म्य असावयाचेंच. जरी वैधर्म्य वस्तूंच्या प्रकृतीस अवश्य नाहीं तरी त्याच्या योगानें अनेक जातींतील व अनेक सजातीय उपजातींतील फरक उत्पन्न होतो. सर्व वस्तूंचें जें वर्गीकरण करावयाचें, किंवा जी त्यांची विल्हेवारी लावावयाची, ती सृष्टिरचनेस अनुसरूनच असली पाहिजे. कोशांतल्या वर्णानुक्रम शब्दव्यवस्थेप्रमाणें अथवा वनस्पतिशास्त्रांतल्या पुष्पाविषयक लिनिअन व्यवस्थेप्रमाणें कृत्रिम व्य-

वस्था अगदीं नवशिक्या विद्यार्थ्यास कांहीं अंशीं उपयुक्त होतील हें खरें; परंतु ह्या कृत्रिम व्यवस्थांचेंच अवलंबन केलें तर तें खऱ्या ज्ञानप्राप्तीच्या कामीं प्रतिबंधक होईल. सृष्टींतील स्वाभाविक साधर्म्यसंबंधास अनुसरून निरनिराळ्या वस्तूंचें वर्गीकरण करण्याची संवय आपणास लावून घेण्याचा उद्देश प्रत्येक मनुष्यानें आपणापुढें ठेविला पाहिजे. आणि हा उद्देश परस्पर सदृश वस्तूंत असणाऱ्या साधारण स्वरूपाचें ज्ञान व त्यांतील असाधारण गुणधर्मांचें सूक्ष्म निरीक्षण यांच्या साहाय्यानेंच सफल होईल. लोकांत प्रचलित असणारीं फुलांचीं नांवें विशेषेंकरून सादृश्यावरच अवलंबून आहेत. त्या नांवांवरून त्यांमधील वैधर्म्याकडे लोकांचें लक्ष गेलें आहे असें दिसत नाहीं. निरीक्षणाची संवय संपादन करण्यासाठीं हल्लींच्या दळणवळणाचीं साधनें वाढलेल्या काळांत, विद्यार्थ्यांनीं अलौकिक वस्तुसंग्रहालयें ( म्युझिअम्स ) पाहण्याची जेव्हां जेव्हां संधि येईल तेव्हां तेव्हां ती फुकट जाऊं देऊं नये अशी माझी त्यांस विनंति आहे; व अशा ठिकाणीं गेल्यावर त्या संग्रहालयांत ज्या वस्तूंचा विशेष संग्रह केलेला असेल त्यांकडे साधारणपणें अधिक लक्ष पुरविलें पाहिजे; कारण प्रत्येक गोष्ट वरवर पाहणें ह्मणजे कांहींच न पाहिल्यासारखें होय.

ह्याप्रमाणें अनेक वस्तू लक्षपूर्वक पाहून त्यांचें योग्य

वर्गीकरण केल्यानंतर त्यापासून अनुमान प्रमाणानें कांहीं सामान्य सिद्धांत निघतात कीं काय हें पाहण्याकडे तत्त्वज्ञाचें लक्ष जातें. ह्याचें कारण उघडच आहे. प्रथमतः पाया घातल्याशिवाय ज्याप्रमाणें इमारत बांधण्यास आरंभ करितां येत नाहीं, त्याचप्रमाणें निरनिराळ्या अनेक वस्तूंचें लक्षपूर्वक अवलोकन करून त्यांचें वर्गीकरण केल्याशिवाय त्यांजवरून कोणकोणते सामान्य सिद्धांत निघतात हें पाहण्यास आरंभ करितां येणार नाहीं. वस्तु अशा अशा आहेत इतकेंच समजून आपली मनीषा तृप्त होत नाहीं, तर त्या तशा कां आहेत आणि त्यांचा उपयोग काय हेंही समजून घेण्याची इच्छा आपल्याठायीं प्रादुर्भाव पावते. ज्याप्रमाणें अनेक जाती व उपजाती ह्यांच्याठायीं वास करणारे साधारण धर्म ईश्वराच्या अविकृत प्रकृतीपासून उत्पन्न झाले आहेत, त्याचप्रमाणें वस्तूंच्या उत्पत्तीच्या व वाढीच्या सर्व तऱ्हांमध्यें सर्वत्र दृष्टोत्पत्तीस पडणारे साधारण धर्म त्याच प्रकृतीपासून उत्पन्न झाले आहेत; आणि ईश्वराच्या अविकृत प्रकृतीपासूनच मानवी प्राण्यांची उत्पत्ति झाली असल्यामुळें ईश्वरनिर्मित वरील दोन प्रकारच्या साधारण धर्मांचें विवेचन करणें त्यास अवश्य वाटतें. ईश्वरी बुद्धीपासूनच मानवी बुद्धीची उत्पत्ति असल्यामुळें मनुष्याच्या अल्प आयुष्यक्रमांतील निरनिराळ्या व्यवहारांत काय सादृश्य आहे किंवा

ांत कशी संगति आहे ह्या प्रश्नांचीं उत्तरें शोधून ाढण्यांतच मानवी बुद्धि नेहमीं गढून गेली आहे. प्रमाणेंच आपणासभोंवतील जें हें जग सर्वबुद्धिमान् रमेश्वरानेंच स्वतःपासून स्वतःकरितां उत्पन्न केलें, ा जगाच्या सर्व व्यवहारांतील साधर्म्य, संगति व धरावलंबन शोधून काढण्याकडे आमचें स्वाभाविक क्ष लागलें आहे. ह्या जगांतील परस्परसंबद्ध वस्तूंतील मूलसाधर्म्य शोधून काढण्याकडे ज्या गोष्टींच्या ागानें मनुष्याचें मन वळतें तिला "**कारणसंबंध**" असें ह्मणण्याचा प्रघात आहे. कोणत्याही कार्याचें कारण ह्मटलें ह्मणजे ईश्वरनिर्मित पदार्थांच्या आवश्यक परंपरेमध्यें ज्याचें मागून कार्य लागलेंच घडतें तें होय. कार्यांचीं कारणें माहीत झाल्याशिवाय केवळ कार्यांच्याच ज्ञानानें फुगून जाऊन समाधान पावणारे फारच थोडे लोक आढळतात. एखादी गोष्ट घडण्याला कांहींच कारण नाहीं असें सांगितलें असतां मनुष्यमात्राचें असमाधान होऊन त्या गोष्टीचें कांहींना कांहीं तरी कारण गृहित धरून तो चालतो. ह्यावरूनच साधारणतः मनुष्यमात्राला कारणें शोधून काढण्याची उपजतच स्फूर्ति आहे असें सिद्ध होतें. कार्यांच्या खऱ्या कारणाऐवजीं एखादी आकस्मिक घडलेली गोष्ट अगर वस्तुस्थिति त्यास कारणीभूत आहे असें मानण्याची पुष्कळ लोकांस स्वाभाविक संवय असते. जसें:—

एखाद्यानें नवें घर बांधिलें अथवा नवी विहीर खोदि
अगर एखादा विवाहसमारंभ केला आणि एका व
च्या आंत त्याचे कुटुंबांत जर एखादा मृत्यु झाला
तो मृत्यु होण्याच्या शारीरिक उपाधींच्या खऱ्या क
रणाकडे नजर न देतां त्यास घर, विहीर अथवा ल
कारणीभूत आहे असें मानण्याचा पुष्कळांचा प्रघा
आहे असें दृष्टिगोचर होतें. मूळपासूनच अशा प्रका
च्या संवयी आपणांस न जडूं देण्याची विद्यार्थ्यां
खबरदारी घेतली पाहिजे. ब्रिटनच्या पश्चिम किनाऱ्य
वर वर्षाकालांत विपुल वृष्टि होण्याचें कारण त्याजव-
ळील अटलांटिक महासागर आहे हें समजणें सोपें
आहे; तसेंच एडिनबर्ग व अबरडीन येथील हिंवाळ्या-
शीं तुलना करितां आवन येथील हिंवाळा सौम्य अ-
सतो आणि तो तसा सौम्य असण्याचें कारण मेक्सि-
कोच्या आखातांतील उष्ण पाण्याच्या प्रचंड प्रवाहाचें
सान्निध्य हें होय हेंही समजणें फार कठिण नाहीं.
परंतु नैतिक व राजकीय विषयांत वस्तुस्थिति फारच
घोंटाळ्याची असते आणि मनुष्याच्या मनोवृत्ति उचं-
बळलेल्या असतात म्हणूनच ह्या विषयांत ज्या कार-
णांमुळें कार्य घडलेलें असतें त्या कारणाची सिद्धता न
करितां भलतेंच कारण गृहीत धरून चालल्याच्या वि-
चारसरणीचीं उदाहरणें आपणांस वारंवार आढळतात.
एकदां मीं एका प्रसिद्ध राजनिंदक ओरड्या प्रजाहि-

तेच्छूचें राजकीय विषयावरील भाषण ऐकिलें. तेव्हां तो असें ह्मणाला कीं " ह्या देशांतील सर्व दुःखें बहुया लोकांच्या धोरणानें चालणाऱ्या राजसत्ताक राज्यव्यवस्थेपासून उद्भवलेलीं आहेत." हें विधान त्यानें निरनिराळ्या तऱ्हांनीं व उदाहरणांनीं स्थापन करण्याचा प्रयत्न केला; आणि नंतर तो असें ह्मणाला कीं " ज्याप्रमाणें जादूगार कांडी फिरवून पदार्थांचें स्वरूप क्षणमात्रांत बदलून टाकितो, त्याप्रमाणें जर देशांत प्रजासत्ताक राज्याची एका क्षणांत पूर्णपणें स्थापना झाली तर आमच्या दुःखांचा तेव्हांच परिहार होईल." ह्या त्याच्या भाषणांत त्यानें एकजात सर्व सामाजिक दुःखांस एक काल्पनिक कारण गृहित धरून तीं दुःखें नाहींशीं होण्यासही एका काल्पनिकच उपायाची योजना केली आहे हें उघड आहे; व ह्मणूनच ही त्याची विचारसरणी अप्रयोजक आहे. सप्रमाण विचार करण्याची संवय संपादन करावयाच्या कामीं विद्यार्थ्यांनीं प्राचीन ग्रीक तत्त्ववेत्ता प्लेटो ह्याच्या मताप्रमाणें कांहीं कालपर्यंत गणितशास्त्राचा चांगला अभ्यास करावा अशी त्यांस प्रथमतः माझी मनापासून शिफारस आहे. अशा प्रकारें गणितशास्त्राचा अभ्यास केल्यानें सर्व प्रकारच्या विचारसरणीस आवश्यक असणारी मनाची एकीकरणाची शक्ति दृढतर होऊन तिजपासून अज्ञान मनुष्यास वस्तूंची नैसर्गिक परंपरा, परस्परावलंबन व शुद्ध कार्य-

कारणभाव ह्याचा खरा अर्थ काय आहे हें तेव्हांच कळेल. परंतु, इतकें बस्स नाहीं. कारण गणितशास्त्रांतील अनुमानें ज्या गृहित गोष्टींवर व प्रमाणांवर अवलंबून असतात, तीं एकदां मिळालीं ह्मणजे त्यांत कधींही फेरबदल होत नसल्यामुळें गणितशास्त्राच्या अभ्यासानें इतर अत्यंत महत्त्वाच्या व गहन विषयांच्या विवेचनास मनुष्याचें मन योग्य होण्यापुरतें शिक्षण त्यास मिळत नाहीं. ह्या गहन विषयांत ज्या वस्तूंचा अंतर्भाव होतो त्या व त्यांचे धर्म ह्यांची परस्परांवर एकसारखी क्रिया प्रतिक्रिया सुरू असल्यामुळें तिजपासून एक भयंकर जाल उत्पन्न होतें इतकेंच नव्हे, तर त्यांजवर दुसऱ्या अशा अनेक प्रबलतर कारणांचा परिणाम घडतो कीं तीं कारणें कधीं कधीं अत्यंत सूज्ञ मनुष्याचेही दृष्टोत्पत्तीस येण्याचें महा दुर्घट असतें. राजकीय, नैतिक व सामाजिक विषयांतील आपले सिद्धांत गणितशास्त्रांतील सिद्धांतांपेक्षां कमी निश्चित असतात असें नाहीं. फक्त ते जास्त कठिण व अधिक व्यापक असतात. ह्या विषयांचा विचार करतांना आपणांस एकदेशीय निरीक्षण, सिद्धांत स्थापण्याचा उतावीळपणा व मनोविकार आणि पक्षपात ह्यांच्या सम्मीलनानें उदय पावणारा बुद्धिभ्रंश ह्या दोषत्रयापासून अलिप्त राहिलें पाहिजे. जेव्हां एखाद्या मुत्सद्याच्यानें राजकीय प्रश्नाचा उलगडा होत नाहीं, तेव्हां तो

उलगडा न होण्याचें कारण राजकीय प्रश्न। ...
श्रितता नसून वस्तुस्थितीविषयीं त्याचें संकुचित ... होतात.
अथवा मनोविकार आणि पक्षपात ह्यांचा त्याच्या म- वि-
नावर बसलेला पगडा हें होय; कारण, असा पगडा बसल्यामुळें वस्तुस्थितीचें योग्य महत्त्व जाणण्याच्या कामीं त्याच्या मनाला प्रतिबंध होतो.

प्रस्तुत स्थळीं एकादा विद्यार्थी कदाचित् " आपली विचारशक्ति वाढावी म्हणून न्यायशास्त्र व अध्यात्मविद्या ह्यांचा मुद्दाम व्यवस्थितपणें अभ्यास करणें इष्ट आहे कीं नाहीं ? " असा प्रश्न विचारील. ह्यावर माझें उत्तर असें आहे कीं, जर तुम्हांस नैय्यायिकाच्या शुष्क व वायफळ वितंडवादास अनुसरून नव्हे तर साध्या, सरळ व स्वाभाविक रीतीनें कोणत्याही विषयाचा उहापोह करण्याची संवय प्राप्त झाली असेल तर तुम्हीं सदरहू शास्त्रांचा बेलाशक अभ्यास करा. मनुष्याला चालतां येण्यास प्रथमतः पाय असले पाहिजेत व नंतर त्यांचा त्यानें उपयोग केला पाहिजे; व ह्या दोन्ही गोष्टी झाल्यानंतर त्यानें वाटेल तर कवाईतीमध्यें वाकबगार अशा माणसाकडे जाऊन कूच, दौड इत्यादि, युद्धप्रसंगीं उपयोगीं पडणाऱ्या चालींच्या निरनिराळ्या कठिण धाटणी शिकाव्या; कारण, ह्या धाटणी नेहमींच्या साध्या चालण्यानें शिक्षणाशिवाय सहज प्राप्त होणाऱ्या नाहींत. न्यायकलेचा प्रकार असाच आहे.

कारणभाव ह्याचा ...
कळेल. परंत ... करण्याची संवय प्राप्त करून घ्या आणि
...ची सामुग्रीही मिळवा; आणि नंतर आपलीं
तील अनुमानें कोणत्या रीतीनें प्राप्त होतात हें सूक्ष्म दृष्टीनें पृथक्करण करून समजावून घेण्यासाठीं न्यायशास्त्र-ज्ञाकडे जा. न्यायशास्त्राचा ह्याच रीतीनें अभ्यास केल्यास तो अत्यंत हितावह होईल; परंतु ज्याअर्थीं गणितशास्त्राप्रमाणें न्यायशास्त्राचा विषय सृष्टींतील अमुक एक ठराविक वस्तु नाहीं, आणि ज्याअर्थीं त्यांत अनुमानाच्या सामान्य स्वरूपाचेंच व्यवस्थित निरूपण केलेलें असतें त्याअर्थीं शुद्ध न्यायशास्त्रापासून व्यवहारोपयोगी व फलद्रूप असे उच्च विचार प्राप्त करून घेण्याचा यत्न करणें म्हणजे नापीक जमिनींतून धान्य उत्पन्न करण्याचा प्रयत्न करण्यासारखेंच होय; अथवा केवळ न्यायशास्त्रज्ञ मनुष्य एकादा महान तत्त्ववेत्ता बनण्याची आशा करणें म्हणजे उगाच पट्ट्याचे चार दोन हात करितां येणाऱ्या मनुष्याच्या अंगीं पहिल्या बाजीराव साहेबांप्रमाणें अथवा शिवछत्रपतीप्रमाणें युद्धकला उत्पन्न होण्याची आशा करणें होय. ज्या शास्त्रांचा वस्तूंशीं प्रत्यक्ष संबंध नसतो, पण ज्यांत त्यांच्या सामान्य स्वरूपाचाच विचार केलेला असतो त्या सर्व शास्त्रांची वास्तविक अशीच स्थिति आहे. व्याकरण आणि साहित्य हीं अशींच निष्फल आहेत; आणि व्यवहार व अनुभव ह्यांनीं प्राप्त होणाऱ्या गोष्टींशीं

जेव्हां त्यांचा संबंध येतो, तेव्हांच तीं फलद्रूप होतात. नुसते न्यायाचे नियम शिकल्यानें कोत्या बुद्धीची विशाल बुद्धि अथवा क्षुद्र बुद्धीची उदार बुद्धि कधींही होणार नाहीं. उत्कट उत्साह, विकसित मन, अतिसूक्ष्म निरीक्षण, अनेक गोष्टींचा अनुभव, यांच्यापुढें शुद्ध नैय्यायिक वादपद्धतीची कांहींच किंमत नाहीं; तथापि न्यायशास्त्र अगदींच निरुपयोगी नाहीं. त्याजपासून जरी कोणताही सिद्धांत उत्पन्न होत नाहीं तरी सर्व सिद्धांतांचें त्याच्याच साहाय्यानें नियमन होतें. ज्याप्रमाणें शरीरच्छेद-शास्त्र चित्रकलेच्या कामीं उपयोगी आहे त्याप्रमाणें न्यायशास्त्र हें विचार करण्याच्या कामीं उपयोगी आहे. त्याजपासून मनांत आलेल्या विषयविवेचनाची रचना व जुळणी कशी करावी ह्याची योग्य कल्पना होते. तथापि ज्याप्रमाणें नुसत्या शरीरच्छेद-शास्त्राच्या व्यासंगानें उत्तम चित्र कधींही काढितां येणार नाहीं, त्याचप्रमाणें केवळ न्यायशास्त्राच्या अभ्यासानें सत्यज्ञान उत्पन्न होणार नाहीं. दुसऱ्याच्या विचारसरणींतील दोषांचें आविष्करण करण्याच्या कामीं आणि शब्दावडंबरानें उत्पन्न झालेला सत्यापलाप उघडकीस आणण्याच्या कामीं न्यायशास्त्राचा फारच उपयोग होतो. परंतु महत्त्वाचे सिद्धांत स्थापण्याच्या कामीं पुस्तकी न्याय-शास्त्र अगदीं नीर्बल आहे. त्या कामीं जीवंत झऱ्याप्रमाणें सतत वाहणाऱ्य

विचारशक्तीचीच त्यास मदत घेतली पाहिजे इतकेंच नव्हे, तर त्या कामीं लागणारी सर्व सामुग्री सभोंवतील जगाच्या निरीक्षणानेंच त्यास मिळविली पाहिजे;ती कोणत्याही वस्तुसंग्रहालयांत आयती मिळण्यासारखी नाहीं. वेदांतशास्त्राचीही अशीच स्थिति आहे. ह्या शास्त्रापासून दोन फायदे होतात.पहिला हा कीं ह्याच्यापासून मनाच्या शक्तींच्या अवश्य मर्यादा कळतात, ह्मणजे आपले भ्रामक कल्पनातरंग दूर होतात; आणि अगाध कल्पनासमुद्रांत कांहीं वेळ गंटगळ्या खाल्यानंतर आपणांस वाटत होतें त्यापेक्षां जग फारच विस्तृत असून तत्संबंधींचे आपले विचार फारच क्षुद्र आहेत असें आढळतें. हा निषेधक उपयोग खरा; परंतु तो निषेधक आहे एवढ्यानेंच कमी महत्त्वाचा आहे असें नाहीं. मनुष्याच्या मनाची गति कोठपर्यंत चालते हें जाणणें ही ज्ञानाची पहिली पायरी होय. आणि अज्ञात प्रदेशांत पक्ष्यांप्रमाणें उंच भराऱ्या मारण्यापेक्षां आपणांस परिचित अशा भूपृष्ठावरच निर्भयपणें प्रवास करणें बरें. नाहीं तर इक्यारसप्रमाणें आपली स्थिति व्हावयाची. हा मनुष्य इहलोकचीं दुःखें टाळण्यासाठीं आपणास पंख लावून स्वर्गास जाण्याच्या उद्देशानें आकाशांत उडाला. परंतु तो जेव्हां बराच उंच गेला, तेव्हां सूर्याच्या उष्णतेमुळें मेणानें चिकटविलेले त्याचे पंख गळून पडून तो “समुद्रास्तृप्यन्तु” झाला; आणि त्यावरूनच समुद्राला “इ-

क्यारिअन" असें ह्मणण्याचा परिपाठ सुरू झाला. वेदांतशास्त्राच्या अभ्यासानें अशा प्रकारची दुःखकारक स्थिति टाळितां येते. ह्या शास्त्राचा दुसरा उपयोग—इतर शास्त्रांची इमारत ज्या मूलतत्त्वांच्या पायावर उभारलेली आहे, तीं मूलतत्वें ह्या शास्त्राच्या अध्ययनानें आपणांस माहित होतात. वेदांतशास्त्रांत न्यायशास्त्रांतल्याप्रमाणें तद्विषयक वस्तूच्या सामान्य स्वरूपाचाच विचार केलेला नसतो; तर उलट वेदांतशास्त्राचा विषय फारच सत्यस्वरूप आहे. ज्याप्रमाणें वास्तविक जीव ह्मटला ह्मणजे अस्थि, चर्म व मांस ह्यांनीं बनलेला जड देह हा नव्हे, तर त्या देहाच्या सतत पालटणाऱ्या निरनिराळ्या स्थितींत कायम असणारा व त्या देहाच्या नाशानंतरही सुरक्षित राहणारा चिदंश होय, त्याचप्रमाणें वेदांतशास्त्राचा विषय अखिल मायावृत जगताचें खरें स्वरूप हा होय. निरनिराळ्या शास्त्रांचे ह्या मायावृत जगतांतील जे निरनिराळे विषय आहेत, त्यांच्यावरील मायापटल दूर झालें ह्मणजे वेदांतविषय आपणांस दृष्टीस पडेल. वेदांतशास्त्र हें वनस्पतिशास्त्र, शारीरशास्त्र, भूगर्भशास्त्र, ज्योतिषशास्त्र, रसायनशास्त्र व प्राणीशास्त्र ह्या सर्वांहून अगदीं भिन्न आहे. त्यांत जगांतील सर्वव्यापी आणि अत्यंत श्रेष्ठ अशा शक्तींचा, प्रभावांचा, आणि आदिकारणांचा अंतर्भाव होतो. वेदांतविषयाकडे वर

सांगितलेल्या ज्ञानाच्या निरनिराळ्या शाखांमध्यें एकेका विशेष दृष्टीनें लक्ष पोंचविलेलें असतें. तात्पर्य, वेदांतशास्त्राचा विषय हा सर्व अस्तित्वांतील वस्तूंचें साधारण स्वरूप होय; आणि ज्या अर्थीं अनाद्यनंत व अविकार्य चिच्छक्तीपासूनच अखिल जगत् निर्माण झालें आहे त्या अर्थीं ह्या अनाद्यनंत व ज्ञानमय परमात्म्याचें ज्ञान करून देण्याचा वेदांतशास्त्राचा उद्देश आहे असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. आतां सर्व जग जर ज्ञानमय चिच्छक्तीनें व्याप्त नसतें तर जगांत जिकडे तिकडे व्यवस्थेच्या ठिकाणीं अव्यवस्था आढळली असती; हें जें परमात्म्याचें ज्ञान वेदांतशास्त्रानें आपणांस मिळावयाचें तें कधींही पूर्ण असणार नाहीं. तर आमच्या परिच्छिन्न बुद्धीस अनुरूपच म्हणजे अपूर्णच असावयाचें. वर जो वेदांतशास्त्राचा उद्देश नमूद केला आहे, तो लक्षांत आणूनच शेंकडों वर्षांपूर्वीं महातत्ववेत्ता ॲरिस्टॉटल ह्यानें वेदांतशास्त्र व ईश्वरज्ञान ( Theology ) हीं एकच होत असें म्हटलें आहे. आणि वास्तविक रीतीनें पाहिलें म्हणजे ईश्वर स्वयंभूत सर्व शक्तिमान, अनाद्यनंत, स्वयंप्रकाश व सर्वज्ञ आहे असें जर मानिलें नाहीं तर सृष्टिक्रमाची उपपत्ती कधींही होणार नाहीं. पॅथोगोरासपासून तों हॅगलपर्यंत सर्व महातत्ववेत्त्यांचें सदरीं निर्दिष्ट केलेल्या ईश्वर कल्पनेशिवाय सत्यज्ञानास दुसरा कोणताही

आधार नाहीं असें मत असल्याचें दिसतें; कारण त्यांचें तसें मत नसतें तर त्यांनीं त्याच कल्पनेचा स्वीकार केला नसता. आणि म्हणूनच वेदांतशास्त्राचा अभ्यास करणें इष्ट आहे. त्यांतल्या त्यांत सांप्रतकाळीं इंग्लंडसारख्या देशांत फारच इष्ट आहे; कारण, त्या देशांत भौतिकशास्त्रांत एका पाठीमागून एक असे पुष्कळ अद्भुत नवीन शोध लागल्यामुळें आणि बाह्य व इंद्रियगोचर जड सृष्टीकडेच जोरानें धांव घेण्याची मनुष्याच्या मनास एककल्ली संवय लागल्यामुळें बऱ्याच लोकांचा शहाणपण कायतें भौतिकशास्त्रांत भरलेलें आहे असा ग्रह झालेला अढळतो. तसेंच विगमन ( Induction ) ही अत्यंत महत्वाचे शोध लावण्याची खरी तिजोरी आहे असें त्यांचें मत झालेलें आहे. हा लोकायताचा ह्मणजे जडसृष्टीवादाचा मूर्खपणा होय; कारण, एकतर ज्या अत्यंत महत्वाच्या मूलसिद्धांतांवर सर्व शास्त्रांची इमारत उभारलेली आहे, ते लर्व मूलसिद्धांत विगमनाच्या पूर्वींच स्थापन झाले पाहिजेत; दुसरें असें कीं भौतिकशास्त्रांत एकामागून एक येणाऱ्या पदार्थांचाच केवळ निर्देश केलेला असतो, ह्मणजे दोन पदार्थांत कार्यकारणभाव आहे असें त्या शास्त्रांत सांगितलेलें नसतें; तर त्यांमध्यें केवळ अनुचार आहे इतकेंच तीं सांगतात आणि ह्मणून त्या शास्त्रांतल्या वस्तूंमध्यें कार्यकारणभाव आहे असें ढोबळ दृष्टीच्या मनु-

त्यासच वाटण्याचा संभव आहे. त्या शास्त्रांत ज्यांना नियम हें नांव आहे ते वास्तविक नियम नसून त्यांच्या योगानें केवळ सृष्टिक्रमाची दिशा दाखविली जाते. वास्तविक पाहिलें असतां कोणत्याही नियमांचा सृष्टिचालकावर दाब नाहीं. त्याच्या कृतींत ते दिसून येतात. हा सृष्टिचालक आनाद्यनंत, सर्वसाक्षी, व सर्वशक्तिमान परमात्मा होय. त्यासच आपण ईश्वर असें म्हणतों. ह्याच ईश्वराचीं आपण सर्व लेंकरें आहोंत. एका धर्मपरायण प्राचीन ग्रीक कवीनें ह्मटल्याप्रमाणें आमची उत्पत्ति व स्थिति त्याचेच ठायीं असून आमचा लयही त्याच्यांतच होतो. सर्वथैव सुविचारमूलक ईश्वरज्ञान, आणि भक्तिमार्गास सर्वांशीं अनुसरून असणारी मीमांसा हेच वेदांतशास्त्राचे दोन भाग आहेत. ह्या दोन भागांशीं परिचय करण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनीं शाळेंत शिकत असतांनांच करावा; परंतु प्रामाणिकपणानें व सत्वस्थ वृत्तीनें आयुष्यक्रमण करणें हाच एक त्या विषयींचें योग्य ज्ञान होण्याचा खरा मार्ग होय. आणि हा सिद्धांत मनांत दृढ बाळगून, आईबापांच्या छत्राखालीं वागणाऱ्या मुलाप्रमाणें निर्भयपणें चालल्यानें वेदांतशास्त्राच्या अभ्यासाचा उद्देश हस्तगत झाला असें लौकरच त्यांच्या प्रत्ययास येईल.

ज्या मनोव्यापारांस मुद्दाम विशेष प्रकारचें वळण लाविलें पाहिजे अशा व्यापारांपैकीं दुसरा महत्त्वाचा

व्यापार ह्मटला ह्मणजे " कल्पना " हा होय. ह्या शक्तीला योग्य वळण मिळणें अत्यंत महत्त्वाचें आहे, ही गोष्ट शिक्षक अथवा विद्यार्थी ह्यांपैकीं कोणाच्याही मनांत पूर्णपणें बिंबलेली नसते, ही मोठी शोचनीय गोष्ट आहे. कल्पनाशक्तीचा खऱ्या गोष्टींशीं संबंध नसून कल्पित गोष्टींशीं असतो, आणि खरें ज्ञान संपादण्याची ज्या विद्यार्थ्याची इच्छा आहे त्याला तिची जरूरी नाहीं, असा ग्रह झाल्यामुळें त्या शक्तीचा सर्वांशीं तिरस्कार करणारे कांहीं लोक असणें संभवनीय आहे. परंतु हा त्यांचा वरील ग्रह चुकीचा आहे. मोठमोठ्या शास्त्रज्ञांनीं अत्यंत महत्त्वाचे असे जे शोध लाविले ते त्यांनीं आपल्या फलद्रूप व सूचक कल्पनाशक्तीच्या जोरावरच लाविले आहेत, ही गोष्ट सर्वांस माहित आहेच. वनस्पतिशास्त्र आणि अस्थिवर्णनशास्त्र ह्यासंबंधें **गोएथ** कवीनें आपले विचार प्रकट केले आहेत त्यावरून वरील गोष्ट सिद्ध होण्यासारखी आहे; ह्मणून जेव्हां कल्पनाशक्ति विचारास न जुमानता स्वतःच्या मर्जीप्रमाणें मनःपूत व स्वैर धावूं लागते तेव्हां ती शास्त्रास विरुद्ध असते. परंतु जेव्हां ती विचारास अनुसरून असते तेव्हां शास्त्रास तिचा फारच उपयोग होतो, इतकेंच नव्हे तर ती त्यास अवश्य आहे. शिवाय ज्याप्रमाणें कवितेस कल्पनाशक्ती जरूरीची आहे त्याप्रमाणेंच ती इतिहासांत आणि सृष्टपदार्थांचे निरूप-

णांत जरूरीची आहे. इतिहासकार कांहीं नव्या गोष्टी सांगतो असें नाहीं तरी त्याला गतगोष्टी सुंदर व्यवस्थितपणें जुळवून लिहाव्या लागतात. आणि अशी जुळणी कल्पनेच्या साहाय्यावांचून कधींही करितां येणार नाहीं. कल्पित गोष्टी व सर्व तऱ्हेच्या कादंबऱ्या ह्या अलबत टाकाऊ नाहींत; तसेंच कल्पनाशक्तीस उन्नति आणण्याचे कामीं ह्यांचा उपयोग करणें समंजसपणाचें होईल. तथापि जेव्हां कल्पनाशक्ति खऱ्या गोष्टींचा स्वीकार करून आपला सर्व व्यवहार त्याजपाशींच ठेवील तेव्हांच तिचा सर्वोत्कृष्ट असा उपयोग होईल; म्हणून तिला अशाच प्रकारचें वळण लावण्याविषयीं विद्यार्थ्यांस माझी आग्रहपूर्वक विनंति आहे. कल्पनाशक्तीस तृप्त करून तिचा विकास करण्यास योग्य अशीं मानवी स्वभावाचीं व मानवी दैवगतीचीं चित्रें पाहण्यास कादंबऱ्यांची जरूरी नाहीं. परंतु पहिले बाजीरावसाहेब पेशवे, गोब्राह्मणप्रतिपालक शिवाजी महाराज, सरदार परशुरामभाऊ पटवर्धन, अकबर व ह्याप्रमाणेंच ज्या अतुल पराक्रमी नरपुंगवांनीं जगामध्यें आपलें नांव गाजविलें व ज्यांनीं इतिहासांत आपलें नांव अजरामर केलें, त्यांची चरित्रें सर्वोत्कृष्ट कवितेपेक्षां अथवा "न भूतो न भविष्यति" अशा कादंबरीपेक्षां शिक्षणाच्या दृष्टीनें कल्पनाशक्तीच्या उन्नतीस साहाय्यभूत व जास्त महत्त्वाचीं आहेत.

सर्वच माणसांना कविता आवडते असें नाहीं. परंतु एकादी चमत्कारिक किंवा अद्भुत घडलेली गोष्ट प्रत्येक मनुष्याच्या मनावर चांगली ठसून तिचा त्याच्यावर कांहींना कांहींतरी सुपरिणाम घडतोच. थोर गृहस्थांचीं चरित्रें वाचून कल्पनाशक्तीस चलन मिळाल्यानें दोन प्रकारचा फायदा होतो. कारण, असें झाल्यानें पूर्वी लोकांचें आचरण कसें होतें व तें योग्य नसल्यास कसें असावयास पाहिजे होतें ह्या दोन्हीही गोष्टी एकाच वेळीं आपणांस स्पष्टपणें कळतात. परंतु उत्कर्षक भव्य चित्रें स्वस्थपणें पाहिल्यानें कल्पनाशक्तीस योग्य शिक्षण मिळत नाहीं. कारण, मनाच्या अशा केवळ निश्चल व स्वस्थ वृत्तीपासून कोणतीही शक्ति वृद्धिंगत व्हावयाची नाहीं. हीं रमणीय चित्रें समोरून जात असतांना कल्पनाशक्तीनें त्यांचें योग्य ग्रहण करण्याविषयीं विद्यार्थ्यांनीं विशेष खबरदारी घ्यावी; आणि पुस्तक मिटल्यानंतर तो सर्व देखावा जशाचा तसा डोळ्यांसमोर उभा करितां आल्याशिवाय त्यानें स्वस्थ राहूं नये. ज्याप्रमाणें कांहीं लोक जगांतील व्यवहार उघड्या डोळ्यांनीं करीत असतां त्यांस वास्तविक कांहींच दिसत नाहीं असें त्यांच्या वर्तनावरून विचार करणाऱ्यास दिसून येतें. त्याप्रमाणें कांहीं लोक फुरसतीच्या वेळीं मनास आल्हाद देणाऱ्या अथवा संकटसमयीं मनाला धीर देणाऱ्या गोष्टी पुस्तकांत वाचतात,

किंबहुना घोकूनही काढतात—तरी त्या वाचनानें त्यांना कांहींएक फायदा झालेला दिसत नाहीं. म्हणून जेव्हां एकाद्या प्रसिद्ध पुस्तकाचें एकादें प्रकरण तुम्हीं वाचाल तेव्हां तें वाचून झाल्यावर पुस्तकाच्या पानावर छपाई कशी झाली होती, कोठें टाईप चीत झाला होता वगैरे गोष्टी कितपत ध्यानांत आहेत हें पाहूं नका; तर त्या प्रकरणाचा तुमच्या कल्पनाशक्तीच्या पटावर कसा ठसा उमटला हें पहा. आपल्या कल्पनेंतील चित्रें नेहमीं रंगारूपानें हुबेहुब व स्पष्ट असावीं.

कल्पनाशक्ति प्रत्येक मनुष्याचे ठायीं कमी अधिक प्रमाणानें वास करिते असें ह्मणतां येईल हें खरें; तथापि ज्या मनोवृत्तीस व ज्या ज्ञानास " सौंदर्यात्मक " किंवा " सहृदय " ह्मणण्याचा परिपाठ आहे त्या मनोवृत्ति व तें ज्ञान ह्यांच्याशीं कल्पना ह्या शब्दानें दाखविल्या जाणाऱ्या शक्तीचा विशेष संबंध आहे असें मला वाटतें. ज्याप्रमाणें एकादें घर वारा आणि पाऊस ह्यांपासून सुरक्षित व हवा आणि प्रकाश ह्यांस आंत खेळूं देण्यास योग्य असें असून सुद्धां दिसण्यांत बेढब असेल, त्याप्रमाणेंच एकादा मनुष्य इहलोकचा प्रवास मोठ्या हिंमतीनें करीत असतांही त्याचेठायीं कल्पनाशक्तीचा अभाव असूं शकेल. सुंदर घर मिळण्यासारखें असतां जाणूनबुजून बेढब घराचा कोण स्वीकार करणार ? ह्मणून आपल्या हातून होण्यासारखी असेल

तितकी शारीरिक व मानसिक उन्नति करणें हा जो जीविताचा मुख्य हेतु तो ज्यास सिद्धीस न्यावयाचा असेल त्या प्रत्येकानें प्रबल कल्पनाशक्तीला ज्याच्या योगें पुष्टि येते असें जें सौंदर्य त्याच्या प्राप्तीकरितां झटलें पाहिजे. जसें केवळ पुस्तकांच्या आधारानें मनुष्याचें ह्या जगांत चालावयाचें नाहीं, तसेंच केवळ ज्ञानानेंही निभावयाचें नाहीं असें माझें मत आहे. "कांहीं तरी समजून घेणें हें नेहमीं श्रेयस्कर आहे" असें एका अर्वाचीन महापंडिताचें सुंदर वचन आहे. पण ह्या वचनानें अव्यवस्थित व स्फुटज्ञान नेहमीं श्रेयस्कर आहे असें सांगण्याचा त्याचा हेतु नाहीं. त्याचा अर्थ इतकाच कीं, अवलोकनांत येणारी प्रत्येक गोष्ट—मग ती अत्युत्तम नसली तरी चालेल—वेळीं उपयोगीं पडावी ह्मणून काळजीपूर्वक पाहून ठेवावी हें शहाणपणाचें आहे. नेहमींच उत्तम वस्तु पहावयास मिळतात असें नाहीं. आणि वारंवार आपल्या दृग्पथांत येणाऱ्या वाईट गोष्टी सर्वथैव वाईट असतात असेंही नाहीं. ह्मणून जातां जातां त्यांच्यांत जें कांहीं थोडेसें संग्रहणीय असेल तें निवडून घेण्यांत कांहीं कमीपणा आहे असें समजूं नये. तरुण मनुष्यानें नेहमीं ज्याचा पिच्छा पुरवून प्राप्तीकरितां झटलें पाहिजे असा एक हेतू आहे. साधारणतः सर्व गोष्टींचें किंवा एकाद्या क्षुल्लक गोष्टीचें भाराभर ज्ञान न मिळवितां महत्वाच्या, सुंदर, आणि

उपयुक्त अशाच गोष्टींचें ज्ञान मिळविणें ह्मणजे वरील हेतू संपादणें होय. कल्पनाशक्तीपुरता विचार पाहिला असतां मनाला सौंदर्यविषयक शिक्षण देण्याकडे थोडें विशेष लक्ष लाविल्यानें सदर हेतू साध्य होणारा आहे. हीच गोष्ट शब्दपर्यायानें वाचकांपुढें ठेवण्याचा इरादा धरल्यास निरनिराळ्या स्वरूपांतील आणि अवस्थांतील भव्यपणा आणि सौंदर्य व्यक्त करण्याचा ज्यांचा मुख्य उद्देश आहे अशा ज्या काव्य, चित्र, गायन, वादन आणि सामान्यतः इतर ललितकला ह्यांमधील नैपुण्य अप्रधान किंवा आकस्मिक नसून सुसंस्कृत बुद्धीच्या अत्यंत उदात्त विकासाचें एक लक्षण आहे एवढें लिहिणें बस्स आहे. ज्या मनुष्याची केवळ सरसकट माहिती मिळविण्याच्या कामींच सूक्ष्म दृष्टी असते आणि जो आपले उद्योग दृढ निश्चयानें तडीस नेण्याचा प्रयत्न करितो त्याचें जगांतील सामान्य व्यवहारांत पूर्णपणें निभेल. तथापि असा मनुष्य उदात्त किंवा मनोहर कधींही असावयाचा नाहीं; इतकेंच नव्हे तर तो तेढा, स्वमताचा विनाकारण अभिमान बाळगणारा, आग्रही, हट्टी, कलहप्रिय, मुग्ध, आणि कदाचित् गर्विष्ठही असण्याचा संभव आहे. अशा प्रकारचा वाईट स्वभाव बुद्धीला सौंदर्यविषयक शिक्षण देऊन चांगला करणें हें कृत्य समजास अत्यंत हितकारक आहे, इतकेंच नाहीं तर त्यापासून स्वतः त्या मनुष्यासही बरेंच

सुख होईल. सर्व प्रकारच्या रमणीय वस्तूंनीं कल्पना शक्तीचें योग्य परिपोषण होतें, ह्मणून त्यांचा आरंभापासून पुरवठा करण्यास लागलें पाहिजे. जर शहरांत एकादी नवीन सुंदर इमारत बांधलेली असेल तर विद्यार्थ्यानें ती एकवार तरी जाऊन पाहवी; तसेंच आपल्या कामाकरितां जात असतांना वाटेंत जर त्यास सुंदर चित्रें दिसलीं, तर चित्रांतील सौंदर्याचा रसास्वाद घेण्यासाठीं त्यानें त्यांच्याकडे निदान क्षणभर तरी पाहवें. कामाच्या विचारांतच गढून जाऊन त्यांजकडे दुर्लक्ष करूं नये. जर विद्यार्थ्यानें कुशल घोडेस्वार अगर उड्या मारण्यांत पटाईत असे लोक सरकसमध्यें पाहिले तर त्यांच्या चपलतेच्या खेळांत कांहीं महत्त्व नसून ते फक्त पोरांचें मनरंजन करण्यास उपयोगी आहेत असें न समजतां शारीरिक अवयवांच्या आश्चर्यजनक शक्तीचीं व लवचिकपणाचीं तीं कुशल प्रदर्शनें असून प्रत्येक शहाण्या मनुष्यानें त्यांचें अभिनंदन केलें पाहिजे असें समजावें.

तात्पर्य ज्याची आपली मानसिक उन्नति व्हावी अशी उत्कट इच्छा असेल, त्यानें खरोखर चांगल्या वस्तूंची प्रशंसा करण्याची संवय आपणांस लावून घेण्याचा प्रयत्न करावा. कारण भव्य व सुंदर वस्तूंची प्रशंसा केल्यानेंच आपण त्या प्राप्त करून घेण्याच्या मार्गास कांहीं अंशीं लागतों. जर कोणाला ह्या दैदी-

घ्यमान जगांतील अखिल वस्तुजाताच्या अवलोकनानें वेळोवेळीं अत्यंत आश्चर्य वाटलें नाहीं, तर त्यावरून ह्या जगांत आश्चर्य करण्याजोगें कांहींच नाहीं असें न सिद्ध होतां उलट त्या अवलोकन करणाराचे ठायीं सहृदयता नसून त्याचें मन संकुचित आहे असें-च ठरतें. ज्याला आपल्या बुद्धीला सृष्टीस अनुरूप असें सौंदर्यविषयक शिक्षण देण्याची इच्छा असेल तो जर सर्वत्र दोष पाहवयास लागेल, अथवा ज्यांना को-णत्याही गोष्टीचें आश्चर्य वाटत नाहीं, अशा लोकांचें अभिनंदन करून त्यांच्यासारखें होण्याविषयीं यत्न करील तर तें त्याचें वर्तन त्याच्या हेतूस अत्यंत वि-घातक होईल. ज्याला जगाचा वीट आला आहे अशा मनुष्यानें जर ह्या मार्गाचें अवलंबन केलें तर त्याजकडे दुर्लक्ष केलें असतां चालण्याजोगें आहे; परंतु हाच मार्ग जर एकाद्या विद्यार्थ्यानें स्वीकारला, तर ती त्या-ची क्रिया अक्षम्य होय. जो विद्यार्थी स्वतः कांहींएक उपयुक्त काम न करितां नेहमीं इतरांच्या कामांतील दोष काढीत बसतो त्याच्या हातून कधींही कांहींएक चांगलें काम होणार नाहीं. विद्यार्थ्याचें पहिलें कर्तव्य ह्मणजे गुण ग्रहण करण्याचें आहे. दोष काढणें हें त्यांच्या कर्तव्यास संमत नाहीं. वास्तविक टीका ह्म-टली ह्मणजे ती सूक्ष्म निरीक्षण व पुष्कळ अनुभव ह्या दोहोंच्या साहाय्याशिवाय करितां यावयाची नाहीं.

युद्ध करण्याची योग्य रीति कोणती हें एकाद्या वृद्ध व अनुभवी योद्ध्याशिवाय कोणासच सांगतां यावयाचें नाहीं. निरनिराळ्या विषयांसंबंधीं विद्यार्थ्यांचीं कांहीं विशेष मतें असलीं तरी हरकत नाहीं–किंबहुना तीं असावयाचींच–परंतु असें असलें तरी तीं मतें छापून प्रसिद्ध करण्याचें बिलकूल प्रयोजन नाहीं. कारण, अनुभवाच्या अभावामुळें ज्याचें मत पक्क झालें नाहीं अशा मनुष्यानें आपलें मत प्रसिद्ध केल्यास समाजास नाहीं ती भलतीच दिशा लागण्याचा व मत प्रसिद्ध करणाराचें मन दूषित होण्याचा बहुतेक अंशीं संभव असतो. बुद्धीला सौंदर्यविषयक शिक्षण देण्याच्या कामीं ह्या अखिल विश्वाचे व कलांचे ठायीं असणारा भव्यपणा आणि सौंदर्य हीं स्वाभाविक आणि उत्कृष्ट साधनें आहेत, असें ह्यापूर्वींच निरूपण केलेलें आहे. हास्य व विनोद उत्पन्न करणाऱ्या गोष्टी वरील कामीं केवळ गौण होत. मनुष्यांस हंसूं न येणें हें दुर्दैवाचें लक्षण आहे. परंतु अप्रिय गोष्टींनीं आपल्या मनास धक्का बसूं लागला व तो शांतपणानें सहन करण्याची पाळी आली, तर तशा प्रसंगीं हास्यासारखा दुसऱ्या कशाचाही उपयोग होत नाहीं. परंतु खदखदां हंसण्यांतच काल घालविल्यानें ह्या बिकट संसारयात्रेंत सुख होतें असें नाहीं. ज्याप्रमाणें भाजीपाला रुचकर लागण्यास आंत मसाला असतो त्याप्रमाणेंच कष्टमय संसारयात्रेंत मधून मधून मनोवृत्ति

उल्हासित करण्यास हास्यरस पुढें सरसावतो. नुसता मसाला खाल्यानें ज्याप्रमाणें सुख होत नाहीं, तसेंच सदासर्वकाळ हास्यरसाला आपल्या मनःसंपुटांत स्थल दिल्यानें सुख होणार नाहीं. ज्याप्रमाणें द्रव्यलोभी मनुष्य पै पासून द्रव्यसंचय करितो त्याप्रमाणें सर्व प्रकारच्या सद्गुणांचा विपुल सांठा करण्याविषयीं विद्यार्थ्यानें जपलें पाहिजे. केवळ हास्यविनोदांतच गढून जाऊन अथवा वस्तुमात्रांतील केवळ हास्यास्पद भागाचीच नेहमीं निवड करून आपलें मन भ्रष्ट होऊं देऊं नये. नेहमीं वस्तूंची उपहासास्पद बाजूच पाहण्याची संवय असणें ह्यापरती उथळ मनाची साक्ष देणारी निःसंशय बाब कोणती? कारण वस्तूची उपहासास्पद बाजू तेव्हांच दिसण्यासारखी असते. विनोदी कादंबऱ्या आणि मानवी स्वभावाचीं हास्योत्पाक वर्णनें ह्यांस ह्या देशांत अलीकडे फार ऊत आला आहे. हीं एकाद्या सभ्य व मनोहर प्रहसनाप्रमाणें कधीं कधीं विश्रांतीच्यावेळीं मनोरंजनार्थ वाचणें इष्ट आहे; परंतु क्षुल्लक आणि तिरस्कारार्ह अशा कल्पित मनुष्यांचीं चरित्रें वाचण्यापेक्षा खऱ्या विद्यार्थ्यानें गायन वादन इत्यादि ललित कलांचा अभ्यास व व्यसंग करणें हें मानसिक आरोग्यास अधिक हितावह आहे. तसेंच निव्वळ शास्त्रांचा कंटाळवाणा अभ्यास केल्यानें आलेलें शैथिल्य घालविण्याच्या कामीं केवळ मनोरंजक पुस्तकें वाच-

ण्यापेक्षां वाजाच्या पेटीनें एक दोन राग वाजविणें अथवा एकाद्या प्राचीन महात्म्याच्या साधूक्तीची चटकदार लहानशी कविता करणें हें जास्त हितावह आहे. केवळ मनोरंजक पुस्तकांचें वाचन हें आयुष्यांतील अत्यंत उद्योगशून्यतेचे वेळीं आणि अत्यंत आळशी मनुष्यासच विशेषेंकरून योग्य होय.

मनाच्या ज्या शक्ति वाढविण्याकडे विशेष लक्ष देणें अवश्यक आहे, त्यांपैकीं वर सांगितलेल्या शक्तीच्या खालोखाल महत्त्वाची अशी स्मरणशक्ति ही होय. जसें संपत्ति मिळवून ती राखण्याची शक्ति नसल्यास ती मिळविणें निरुपयोगी आहे; तसेंच जें आपल्याला लक्षांत ठेवितां येत नाहीं तें शिकणें निरुपयोगी आहे. सुदैवानें मानसिकशक्तींमधील हीच शक्ति प्रयत्नानें निःसंशय वाढवितां येते. आणि जरी निर्बल कल्पनाशक्ति व अशक्तबुद्धि यांस साहाय्यभूत इतर साधनें नाहींत, तरी निर्बल स्मरणशक्तीस मदत करण्यास इतर साधनें आहेत. कल्पनाशक्तीवर मुद्रित झालेले मुद्दे मनांत सतत वागविणें असल्यास खालील गोष्टींकडे विशेष लक्ष द्यावें. ( १ ) कोणत्याही गोष्टीचा मनावर जो ठसा मारावयाचा तो होतां होईल तितका स्पष्ट, व्यक्त व खोल असावा. जें वरवर व अस्पष्ट रीतीनें पाहिलेलें असेल तें ध्यानांत ठेविण्याची आशा करणें नलगे. अस्पष्ट व मंद कल्पना सतत मनांत येऊं दि-

त्यानें त्या स्वतः लौकरच लुप्तप्राय होऊन जातात, इतकेंच नव्हे, तर त्यांचे योगानें इतर स्पष्ट कल्पनांवरही अभ्रें येऊन कांहींच दिसेनासें होतें. एकाद्या गहन विषयांतील निरनिराळ्या सर्व मुद्यांचें अल्प व अस्पष्ट ज्ञान असण्यापेक्षां त्या विषयाच्या एकाच मुद्याचें परिपूर्ण ज्ञान असलेलें बरें. ( २ ) पद्धति आणि वर्गीकरण यासारखा स्मरणशक्तीस मदत करणारा दुसरा कोणताही उपाय नाहीं. वर्ग नेहमीं थोडे असतात व व्यक्ति पुष्कळ असतात. एकाद्या वर्गातील व्यक्तींच्या अंगीं जो अत्यंत महत्त्वाचा साधारण धर्म असेल तो ध्यानांत ठेविला ह्मणजे आपणांस वर्गाचें ज्ञान होतें, आणि स्मरणशक्तीस त्याचें ओझें न होतां तें सहज ध्यानांत राहतें. ( ३ ) तिसरी महत्त्वाची गोष्ट " घोंकणें " ही होय. ज्याप्रमाणें एकाच ठोक्यानें खिळा बसला नाहीं तर त्याजवर तो नीट बसेपर्यंत एका पाठीमागून एक अनेक ठोके मारणें अवश्य आहे; त्याप्रमाणें एकदां घोंकून लक्षांत रहात नाहीं असें झाल्यास दोनदां, तीनदां, पांचदां, दहादां तात्पर्य पाठ होईपर्यंत घोंकणें अवश्य आहे. पिच्छा पुरविला तर स्मरणशक्तीस असाध्य असें कांहींच नाहीं. " देवाला " इंग्रजी शब्द " गॉड " आहे, हें ज्याच्या ध्यानांत रहात नाहीं त्यानें हा शब्द दिवसांतून सात वेळां अथवा आठवड्यांतून सात वेळां घोंकला ह्मणजे त्याला त्याचा

विसर पडणार नाहीं. मनुष्याची स्मरणशक्ती ज्या मानानें दुर्बळ असेल त्या मानानें त्यानें घोकंपट्टीच्या साहाय्यानें तीस मदत करण्याचा निश्चय केला पाहिजे. ज्याप्रमाणें एकाद्या मंद पशूला हांकण्यास काठीचा उपयोग करावा लागतो त्याप्रमाणें मानसिकशक्तींना आघातानें प्रोत्साहन द्यावें लागतें; नाहींतर त्या स्तिमित होतात. ( ४ ) पुन्हां जर स्मरणशक्ति दुर्बल असेल तर कार्यकारणभाव समजण्याची शक्ति कदाचित् सबल असण्याचा संभव असतो; या शक्तीचा जर शहाणपणानें उपयोग केला तर आपली स्मरणशक्ति दुर्बल असल्यामुळें बाह्यातकारीं आपणास जो तोटा वाटत असतो तो भरून जाऊन उलटा आपला वास्तविक नफाच होतो. ज्यांची स्मरणशक्ति तीक्ष्ण असते त्यांना त्यामुळें समाधान वाटण्याचा बराच संभव आहे; आणि त्यांच्या पोपटपंचीचे चमत्कारिक खेळ पाहून लोक कदाचित् थक्कही होऊन जातील; परंतु ज्याला कार्यकारणभाव समजल्याशिवाय गोष्टी लक्षांत रहात नाहींत तो त्यांतील कार्यकारणभाव शोधूं लागतो; व असा कार्यकारणभाव कळल्यावर ज्या गोष्टी त्यांची परंपरा असयुक्तिक व अव्यक्त असल्यामुळें त्याच्या स्मरणांत रहात नव्हत्या त्यांची तो कार्यकारणसंबंधानें सयुक्तिक सांगड घालून त्या लक्षांत ठेवितो. ( ५ ) कोणत्याही गोष्टीचें स्मरण ठेवण्याचे कामीं कधीं कधीं त्या

गोष्टीशीं कांहीं आकस्मिक संबंधही उपयोगी पडतो. उदाहरणार्थ एकादा विद्यार्थी आबिडास हें हेलिसपॉंडच्या आशियाकडील किनाऱ्यावर आहे हें आबिडास व आशिया या दोन्ही शब्दांचें पहिलें अक्षर "आ" आहे या आकस्मिक संबंधाचे साहाय्यानें लक्षांत ठेवितो. परंतु या युक्तचा साधारण प्रतीच्या शिक्षकास तृप्त करण्यास योग्य असल्या तरी त्यांनीं तरतरीत मनाचें कधींही समाधान होणार नाहीं. स्मृतीला साहाय्यभूत अशा कवितेसारख्या कृत्रिम पद्धति काढून त्यांच्या योगानें योग्य गोष्टींचें स्मरण ठेवणें मला इष्ट वाटत नाहीं. कारण अशा पद्धतींतील अनियमित व उपहासास्पद चिन्हांनीं मनुष्याचें मन ग्रासून जातें. इतिहासांतील तारखा लक्षांत ठेवण्याचे कामीं या पद्धतींचें बहुतकरून अवलंबन करितात. परंतु यापेक्षां फायदेशीर असा दुसरा मार्ग आहे. तो कोणता ह्मणाल तर कार्यकारणसंबंध. अथवा प्रसिद्ध पुरुषांच्या नांवाचा ऐतिहासिक गोष्टींशीं असणारा कालसंबंध यांच्या साहाय्यानें त्यांच्या तारखा ध्यानांत ठेवणें हा होय. उदाहरणार्थ—साक्रेटिसानें विष प्राशन केलें त्या वेळीं प्लेटो २९ वर्षांचा होता, हें ध्यानांत ठेवणें बस्स आहे. त्याचप्रमाणें प्लेटोचा शिष्य अरिस्टॉटल हा म्यासिडोनमधील फिलिप राजाचा जो प्रसिद्ध मुलगा अलेक्झांडर त्याचा अध्यापक होता आणि याच अलेक्झांडरानें

आपल्या विजयशाली सैन्याच्या मदतीनें फ्रेटो साक्रेटिसांची ग्रीक भाषा आणि सिंधु नद्याच्या कांठची ब्राह्मणांची संस्कृत भाषा यांची भेट करून दिली; अशा व्यवस्थितपणें या गोष्टींचा संबंध जोडला ह्मणजे त्या ध्यानांत ठेवण्यास सुलभ होतात. (६) सरतेशेवटीं इतकेंच सांगावयाचें कीं, स्मरणशक्ति कितीही दांडगी असली तरी कोणतीही गोष्ट लिहून ठेविली असतां स्मरणशक्तीस खात्रीलायक विपुल मदत होते. जें बोलावयाचें तें लिहून आणून वाचीत गेल्यानें स्मरणशक्ति सशक्त होत नाहीं इतकेंच नव्हे, तर कांहीं अंशीं ती त्यामुळें दुर्बल होण्याचाच संभव आहे. परंतु हव्या तेव्हां उपयोगीं पडाव्या ह्मणून निरनिराळ्या गोष्टी लिहून अगर छापून ठेवणें इष्ट आहे. कारण असें केल्यानें जेव्हा आपणांस जरूर लागते तेव्हां पुष्कळ गोष्टींचा संग्रह आपणांस सहज उपलब्ध होतो. ह्मणून विद्यार्थ्यानें होतां होईल तितकें लौकरच आपल्या कांहीं विशेष पुस्तकांत दर छापील पृष्ठामागें एक कोरें पान घालावें व दुसऱ्या कांहींस सूचीपत्र जोडावें; किंवा अशाच दुसऱ्या कांहीं मार्गानें जरूरीच्या वेळीं थोडक्या श्रमानें लौकर माहिती मिळेल अशी कांहीं तजवीज करावी. जर आमचे अध्यापक आपल्या शिक्षण पुस्तकांतील छापील पृष्ठास एक पृष्ठ कोरें घालून त्याजवर यथार्थ व चकित करणाऱ्या वाक्यांच्या स्प-

ष्टीकरणास योग्य अशा व्यवहारांत दृष्टिगोचर होणाऱ्या गोष्टी अथवा पुस्तकांतील आख्यायिका टिपून ठेवून त्यांचा वेळेवर उययोग करतील, तर त्या ते जीं व्याख्यानें देतात त्यांची किंमत वाढविल्याशिवाय रहाणार नाहींत. असें केल्यानें हल्लींच्या त्यांच्या व्याख्यानांत साधारणतः जीं स्थळें निरस व संदिग्ध आढळतात त्या स्थळांतील निरसपणा व संदेह घालविण्याचे कामीं उपयोगीं पडणाऱ्या पुष्कळ नव्या जुन्य गोष्टी, त्यांची स्मरणशक्ति दुर्बल असली तरी त्यांस आपल्या संग्रहांतून काढितां येतील. राजनीतिशास्त्राचा अभ्यास करणारांनीं त्याचप्रमाणें अरिस्टॉटलच्या "राजनीति" पुस्तकांत जागजागीं कोरीं पानें घालून तें लक्षपूर्वक वाचण्यास आरंभ केल्यानें त्यांस बराच फायदा होईल. असें केलें ह्मणजे केवळ अर्वाचिन व नूतन सार्वजनिक घडामोडींच्याच परिचयानें जो हट्टवाद व पक्षपात साहजिक उत्पन्न होण्यासारखा असतो त्याची भीती बाळगण्याचें कारण नाहीं.

दुसरी महत्त्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे सभ्य, जोरदार व मनोहर भाषेचा उपयोग करण्याची संवय ही होय. या गोष्टीकडे शाळांतील व पाठशाळांतील शिक्षणामध्यें फारच दुर्लक्ष होतें. ह्मणून चांगली भाषासरणी कशी प्राप्त करून घ्यावी, व वक्तृत्व ह्मणजे काय याबद्दल चार शब्द सांगतों. मनुष्य स्वभावतःच बोल-

का प्राणी आहे; आणि चांगली भाषासरणीही मनुष्यांस बोलतां येण्याची जी स्वाभाविक शक्ति आहे तिला योग्य शिक्षण दिलें असतां प्राप्त होतें. भाषासरणी चांगली होण्याला चांगले वक्ते व लेखक यांचा निकट परिचय अत्यंत अवश्यक आहे. प्रत्येक मनुष्याची भाषा बहुधा त्याची ज्या मनुष्यांशीं संगति असते त्या मनुष्यांवर पुष्कळ अंशीं अवलंबून असते; व हा सिद्धांत विशेषतः बालपणासंबंधानें तर सर्वांशीं सत्य आहे; ह्मणून ज्यांचे विचार उन्नत असून ज्यांच्यावर वाग्देवीची पूर्ण कृपादृष्टि आहे अशा ग्रंथकारांच्या ग्रंथांचें सर्वोत्कृष्ट परिशीलन करा ह्मणजे त्यांतील भाषास्वारस्य व विचारगांभीर्य यांचा तुम्हांस थोडासा तरी गंध लागल्यावांचून राहणार नाहीं. मात्र कोणाच्याही भाषासरणीचे तुह्मीं बंदे गुलाल होऊन जाऊं नका. ज्याप्रमाणें प्रत्येक मनुष्याच्या चेहेऱ्यांत कांहींतरी विशेष असतेंच त्याप्रमाणें प्रत्येक मनुष्याच्या भाषासरणींत कांहीं विशेष असावयाचेंच. त्याचा मात्र लोप होऊं देतां कामां नये. शिवाय भाषासौंदर्याचा उन्नत विचारांशीं कांहीं संबंध नसल्यामुळें दुसऱ्याच्या अभावीं पहिलें प्राप्त करून घेतां येईल अशा समजुतीनें भाषासौंदर्याकडेच व्यर्थ फाजील लक्ष देऊं नका. विषय प्रतिपादन चातुर्यानें व सभ्यपणानें करण्याबद्दल जेवढी काळजी घ्यावयाची त्यापेक्षां आपण जें बोलणार तें

विषयास धरून व महत्त्वाचें आहे किंवा नाहीं हें पाहण्याची जास्त काळजी घेतली पाहिजे. साक्रेटिसानें या बाबतींत तरुण ग्रीक लोकांस जो उपदेश केला आहे तो असाः—' तुह्मांस कांहीं बोलावयाचें असेल तर तें कसें बोलावें हें प्रथम लक्षांत आणा; ' प्राचीन कारिंथीयन ख्रिश्चन लोकांस सेंट पालनेंही ह्याप्रमाणेंच उपदेश केला आहे, व अर्वाचीन काळींही गोएथचें जर्मन लोकांस असें सांगणें आहे कीं:—

आर्या.

झटुनी यत्न करीं तूं सन्मार्गें सिद्धि साध्य व्हायाला ॥
पोकळ वाचाळपणा करुनि न तूं ह्मणव मूर्ख अपणाला ॥ १ ॥
परिपक्क अभिप्राया वाचा यत्नांशिवाय फुटत असे ॥
साहित्य शास्त्र नियमां शिकण्याची गरज त्यास अल्प नसे ॥२॥
हृदयांतील अर्थाला अनुसरून जर वदे तुझी वाणी ॥
शब्द निवडण्याची तूं खटपट करिसी निरर्थ कां ह्मणुनी ॥३॥

परंतु हें ध्यानांत धरून मनोहर व्यवस्था, अर्थगांभीर्य व विपुल वैचित्र्य ह्या सर्वांच्या एकवाक्यतेनें उत्पन्न होणाऱ्या चांगल्या भाषासरणींत आपले विचार प्रकट करण्याची हातोटी साधण्यासाठीं जितके प्रयत्न करावे तितके थोडे. निदान या देशांतील सुशिक्षित लोकांस व साधारणपणें सर्व देशांतील सुशिक्षित लोकांस लेखनद्वाराच भाषणपटुत्व प्राप्त होतें. स्वतंत्र देशांत धर्मोपदेशक, वकील, मुत्सद्दी ह्या सारख्या धंद्याचेच मनुष्यांस नव्हे तर बहुधा प्रत्येक मनुष्यास आपले वि-

चार समाजांत प्रकट करण्याचा कधीं ना कधीं तरी प्रसंग येणें संभवनीय आहे, व समाजांत बोलण्याची संवय लहानपणापासून लागली नाहीं तर आपले विचार समाजापुढें प्रकट करितांना कांहींशी भीति व अडचण वाटूं लागते. आणि जरी ही संवय बहुतेक लोकांस श्रमानेंच प्राप्त होते तरी त्यानें तिचें महत्व कमी होत नाहीं. ह्या संबंधें महत्वाच्या गोष्टी म्हटल्या ह्मणजे लहानपणींच आरंभ करणें व टिपणाच्या सहाय्याशिवाय बोलणें ह्या होत. टिपणाचें साहाय्य घेऊन बोलण्याची संवय लागल्यानें अलिकडल्या पुष्कळ सुशिक्षित लोकांच्या भाषणांत अगदीं अशिक्षित रानटी लोकांच्या भाषणांतही दिसणारें स्वाभाविकत्व व वक्तृत्व दिसेनासें झालें आहे. आपले विचार मानसिक कपाटांत अशा व्यवस्थित रीतीनें ठेवण्यास शिकावें कीं ते विचार टिपणावांचून केव्हांही अचूक सांपडण्यास कठिण पडूं नये. एकाद्या टिपणावर मुद्याचे कांहीं शब्द लिहून ते डोळ्यांपुढें ठेविल्यानें स्मरणशक्तीस प्रथमारंभीं थोडेसें सहाय्य होण्याचा संभव आहे. परंतु असलें सहाय्यही होतां होईल तितकें न घेणें बरें. बोलणारानें नेहमीं श्रोतृजनांच्या मुखाकडे पाहिलें पाहिजे. जेव्हां टिपणाकडे पहावयाचें असतें तेव्हां त्याला ही गोष्ट साधत नाहीं. ही उपयुक्त संवय लहानपणापासून संपादावयास स्कॉटलंडमधील पाठशाळांची पुष्कळ

दिवसांपासूनची वादविवाद सभांची ( डिबेटिंग सोसाइटीज ) जी उपयुक्त पद्धती आहे तिजपेक्षां अधिक चांगला असा दुसरा मार्ग नाहीं हें उघड आहे. संवयीनें निपुणता प्राप्त होईल, आणि निपुणतेनें भीति नाहींशी होईल. जेव्हां एकाद्या तरुण मनुष्यास सभेंत प्रथमतःच बोलावयाचा प्रसंग येतो तेव्हां स्वाभाविकच त्याचे ठायीं लाज व भीति उत्पन्न होते व ह्यामुळें त्याची जीभ अडखळण्यास लागून वर्णोच्चार साफ उमटत नाहीं. परंतु संवयीनें हीं सर्व नाहींशीं होतात. तरुण मनुष्य बोलतांना भीतीनें थोडासा घाबरला तरी एकवार चालेल पण त्याचे भाषणांत धाष्टर्य किंवा अविनय दृष्टीस पडणें हा मोठा दोष आहे. आपल्या सर्व दर्जाच्या बांधवांचे मनावर आपल्या भाषणाचा चांगला परिणाम व्हावा किंवा झाला पाहिजे असा उद्देश मनांत बाळगल्यानें ' हें काम मोठ्या जोखमीचें आहे ' असा जो नम्रतेचा विचार मनांत येतो त्याचें निर्मूलन करणें कोणत्याही व्याख्यात्यास इष्ट नाहीं. परंतु आपल्या मुखांतून निघणाऱ्या शब्दांच्या योग्यतेबद्दल जो पूज्यभाव आपल्या मनांत असावयास पाहिजे म्हणून वर निर्दिष्ट केलें त्याबद्दलच्या विचारांनीं कदाचित् उलट अहितकारक व्यर्थ काळजी मात्र उत्पन्न होऊन भाषेच्या अस्वाभाविक युक्ततेची मनास शुष्क हुरहुर गेल म्हणून माझा तरूण वक्त्यांस असा उपदेश आहे

कीं त्यांनीं आपण कोण आहों वगैरे विचार न करित आपल्या विषयाची पूर्ण माहिती करून घेऊन व आपल्या भाषणानें कांहींतरी चांगला परिणाम करावयाचा अशी बळकट उमेद धरून एकदम वक्तृत्वपीठावर उभें रहावें; आणि आपल्या ईश्वरावर भरंवसा ठेवून भाषणास सुरवात करावी. तथापि स्पष्ट, जोरदार, व मनोवेधक असें भाषण करितां येण्याच्या बाबतींत एकाद्या वाक्पटूपासून कांहीं शिकतां येण्यासारखें नाहीं असें नाहीं. माझ्या म्हणण्याचा उद्देश इतकाच कीं, केवळ सुबोध आणि सरळ भाषण करणें स्वाभाविक आहे. म्हणूनच त्याबद्दल कांहीं विशेष काळजी बाळगण्याचें कारण नाहीं. तथापि वाक्पटुत्व म्हणजे वक्तृत्व ही कवाइती सारखीच किंवा नृत्यासारखीच एक कला आहे; म्हणून त्या कलेंत प्राविण्य संपादावयास विशेष शिक्षणाचीच अवश्यकता आहे.

पुस्तकें हीं खऱ्या ज्ञानप्राप्तीचीं साधनें नव्हत असें पूर्वीं म्हटलें आहे; तथापि अर्वाचीन सामाजिक स्थितींत लहान मुलांच्या मनास सुशिक्षित करण्याचे कामीं पुस्तकांचा बराच उपयोग होतो. व तो तसा होत रहाणारच; आणि म्हणूनच पुस्तकांची निवड कशी करावी व त्यांचा उपयोग कसा करावा ह्याबद्दल प्रस्तुतस्थळीं कांहीं सूचना करितों. प्रथम हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, जरी एकाद्या पुस्तकसंग्रहालयांतील कपाटें

पुस्तकांनीं अगदीं खचून भरलेलीं असलीं तरी प्रत्येक शाखेपैकीं फारच थोडीं पुस्तकें चांगलीं असतात. यांच्या संबंधानें बाकीचीं केवळ गौण असतात, अथवा परावलंबी असतात; आणि ज्याप्रमाणें वनगुडें ज्या झाडांवर वाढतात त्यांस तीं उपायाचे ऐवजीं अपायच करितात; त्याप्रमाणें असल्या पुस्तकांनीं फायदा न होतां तोटाच होतो. उदाहरणार्थ—बायबल प्रथम उदयास आलें तेव्हांपासून आजपर्यंत जगांत ख्रिस्ती धर्मावर खंडोगणतीं पुस्तकें झालीं असतील, पण त्या सर्वांत बायबलांत सांगितलेल्या गोष्टींपेक्षां नवीन अथवा अधिक चांगलें कांहींच दृष्टीस पडत नाहीं; व तीं सर्व जरी उद्यांच्या उद्यां जाळून टाकिलीं तरी त्यामुळें ख्रिस्ती धर्माची कांहींएक हानी न होतां उलट झाला तर कांहीं फायदाच होईल. ज्या भपकेदार पुस्तकांवर प्रथम लोकांच्या अगदीं उड्या पडल्या आहेत त्यांपैकीं पुष्कळांत निदान शहाणपणा इतका तरी मूर्खपणा भरलेला आहे. आणि बहुतेकांत शुष्क व निरर्थक उक्ति बरीच आढळते. म्हणून स्वतंत्र व अति उच्च आणि उदात्त विचारांनीं भरलेलीं अशीं महत्वाचीं पुस्तकें वाचा म्हणजे इतर गौण पुस्तकें वाचण्याची जरुरी नाहीं असें तुह्मांस कळून येऊन मोठा आनंद होईल. कारण ह्या साहाय्यभूत पुस्तकांचे योगानें कधीं कधीं वरील पुस्तकांचें स्पष्ट ज्ञान होतें. त्याचप्रमाणें कधीं क-

र्धी जास्त घोंटाळा मात्र उडतो. ज्या तरुण मनुष्याची खिस्ती धर्मविषयक माहिती करून घेण्याची इच्छा असेल त्यानें डा० कर अथवा स्टाफर्ड ब्रूमकृत धर्मविषयक व्याख्यानांच्या उत्तरार्धासंबंधानें सफईनें बोलतां येण्याविषयीं प्रयत्न करण्यापेक्षां ग्रीक न्यू टेस्टामेंट हें पुस्तक तोंडपाठ करणें चांगलें. धर्मविषयक इतर पुस्तकें चांगलीं आहेत, परंतु त्यांजवांचून अडेल असें नाहीं. कारण त्यांच्याशिवाय ख्रिश्चन धर्माचें सर्वोत्कृष्ट शिक्षण प्राप्त करून घेतां येईल. बायबलाची मात्र अशी गोष्ट नाहीं. म्हणून ज्या पुस्तकांवर मनुष्यांच्या विचारांची गति अवलंबून आहे, आणि ज्यांच्या योगानें मनुष्याच्या स्थितींत मोठमोठे फरक घडून आले आहेत अशा महत्त्वाच्या पुस्तकांकडेच तुह्मीं आपलें लक्ष द्या. राजनीति भीष्मापासून शिका; गणितासाठीं भास्कराचार्यांकडे पहा; व तत्त्वज्ञान, ईश्वरज्ञान यांकरितां शुक व्यासादिकांची ओळख करून घ्या. कवितेचा रसास्वाद घेण्यासाठीं मोरोपंत, वामनादी कवींचा व्यासंग करा. आणि भौतिकशास्त्रांत पाश्चात्य देशांचें शिष्यत्व पत्करा. शिवाय ज्यांच्या डोक्यांतून महत्त्वाचा कांहीं नवीन विचार जरी निघाला नाहीं, तथापि लोकांत वागत असलेल्या ढोबळ चुका दाखविण्याचे कामीं आणि आचार व विचार ह्यांमधील संगतीचें महत्त्व लोकांचे नजरेस आणून देण्याचे कामीं ज्यांनीं आपल्या हयातींत

उपयुक्त मेहनत केली आहे, अशा प्रसिद्ध पुरुषांकडेही नीट लक्षपूर्वक पहा. परंतु विचारसृष्टींतील व क्रियासृष्टींतील अशा प्रकारच्या कल्पक तत्त्वज्ञांचा व शोधकांचा परिचय करून घेण्याची उत्कट इच्छा जरी तुमच्या मनांत वसत असली, तरी विद्यार्जनाचे प्रथमावस्थेंत त्यांची तुमची गांठ पडणें अशक्य आहे; असें समजून तुम्हांस दुःख होईल त्यास इलाज नाहीं. ह्या उच्चस्थानच्या माहात्म्यांचा परिचय करून घेण्यास तुम्हांस पायरी पायरीनेंच गेलें पाहिजे. ह्या पायऱ्या ह्मटल्या ह्मणजे लहान लहान पुस्तकें होत. ह्मणून लहान लहान पुस्तकांचा तिरस्कार करूं नका. ज्ञानाच्या उच्च किल्ल्यावर जाऊन पोहोंचण्यास ह्या लघुपुस्तकरूपीं पायऱ्यांची अवश्यकता आहे; व त्यांजवरून एकदम उड्या मारीत जाणें सुरक्षित नाहीं. उदाहरणार्थ—एखादी भाषा शिकतांना मोठें मोठें व्याकरण घेऊन एकदम वाचूं लागण्यापेक्षां प्रथमतः लहान व्याकरणाचाच उपयोग करणें बरें. तसेंच शारीरशास्त्रांतील बिकट गोष्टींची प्रथमतःच माहिती करून घेण्यापेक्षां त्या शास्त्राचीं मूलतत्त्वें जीं शरीररचना, हाडें व सांगाडा, त्यांची प्रथम उत्तम ओळख करून घ्यावी. प्रथम हें फार कठिण वाटेल हें खरें; तथापि त्यानें पुढील त्रास वांचेल. परंतु लहान लहान पुस्तकांचा नीट पूर्ण अभ्यास करणें, ह्मणजे तीं घोंकून पाठ करणें नव्हे. घोंकंपट्टीनेंच तयार केल्या पाहि-

जेत अशा कांहीं गोष्टी असतात हें खरें, परंतु ह्या गोष्टी सर्वोत्कृष्ट असतात असें नाहीं; अथवा त्यांपासून मानसिक उन्नतीही होत नाहीं. घोकंपट्टी करणें ह्मणजे केवळ हमाली करणें होय, ह्मणून त्याची प्रत्येक बुद्धिमान प्राण्यास लाज वाटली पाहिजे. घोकंपट्टीचा जरी फार लोक आश्रय करितात, तरी तिची अवश्यकता नाहीं. ज्यांना विचार करितां येत नाहीं अथवा ज्यांस विचार करण्याची इच्छा नसते, तेच लोक विशेषतः हिचे भक्त बनतात. उलटपक्षीं माझा तुह्मांस असा उपदेश आहे कीं, साधल्यास वाचनाचे पूर्वी किंवा निदान वाचनाचे वेळीं तरी विचार करीत जा. भूमितीच्या सबंध बारा पुस्तकांतील सिद्धांतांची सिद्धता घोंकून तोंडपाठ केल्यानें विचारशक्तीस जो फायदा होईल त्यापेक्षां जरासा वेळ घोंटाळून जर तुम्हाला त्रिकोणाचे तिन्ही कोन दोन काटकोनाबरोबर आहेत व वस्तुस्थिति अशी आहे कीं, ते तसे असलेच पाहिजेत, असें कळलें तर त्यानें जास्त फायदा होईल. पुस्तकांच्याच बाबतींत तुम्हांस अशी दुसरी गोष्ट सांगतों कीं, साधेल तितकें करून तुह्मीं पद्धतवार व कालानुक्रमानें पुस्तकें वाचीत जा. व्यवस्थित रीतीनें वाचल्याशिवाय निरनिराळ्या गोष्टींचा संबंध मनांत बिंबत नाहीं. आणि वाचनाची स्वाभाविक व सुबोध अशी व्यवस्थित रीत ह्मटली ह्मणजे उत्पत्ति प्रथम व नंतर वृद्धि ही होय. उदाहर-

णार्थ, फ्लूटार्ककृत थोर मनुष्यांचीं चरित्रें, थीससपासून तों अगदीं क्लिओनेमिस व अॅरिटसपर्यंत कालानुक्रमानें वाचल्यानें तुम्हांस जें ग्रीस देशाच्या इतिहासाचें ज्ञान प्राप्त होईल तें थर्वाल अथवा ग्रोट यांपासून होणाऱ्या ज्ञानापेक्षां फारच अधिक महत्त्वाचें असेल. परंतु अर्थांतच हा अथवा दुसरा कोणताही नियम सर्वच उदाहरणांस सारखा लागू पडणार नाहीं. व्यवस्थित वाचनाला अपवाद ह्मटला ह्मणजे रुचि हा होय. इतिहासांतील एकादा विशेष भाग वाचण्याची तुमची जर जात्याच उत्कट इच्छा असेल तर तो अलबत वाचा, मात्र तो काळजीपूर्वक व समग्र वाचा. ज्याप्रमाणें सांखळींतील एक दुवा हातीं आल्यानंतर इतर दुवे क्रमाक्रमानें साहजिकच हस्तगत होतात त्याप्रमाणें कोणत्याही विषयाचे निरनिराळे समग्र भाग आपल्या आवडीप्रमाणें वाचून झाल्यानंतर त्याची व्यवस्थित रचना लावून, त्यांस कालानुक्रमानें एकाच माळेंत गुंफण्याची तुम्हांस साहजिकच अवश्यकता वाटेल. बहुश्रुतपणा संपादन करण्यासाठीं ह्मणून अव्यवस्थित वाचन कधीं कधीं चालेल. अशा प्रकारच्या वाचनानें फक्त करमणूक होते, अथवा कांहीं उपयुक्त गोष्टी कळतात. परंतु त्यांचा मानसिक शिक्षणाचे कामीं तिळमात्रही उपयोग नाहीं. अशा प्रकारच्या वाचनाकडे अलीकडे लोकांचें मन बरेंच वेधून गेलें आहे. पण या वाचनानें मनाचें कांहीं-

एक हित न होतां उलटें अहितच होत आहे. सोळा-व्या व सतराव्या शतकांतील विद्वान लोकांचा पुस्तक-संग्रह फारच कमी होता. परंतु त्यांजजवळ जें कांहीं होतें त्याचा त्यांनीं योग्य उपयोग केला. " एक ना धड भाराभर चिंध्या " याप्रमाणें विविध विषयांचा परिचय करून घेण्याची ज्यांची इच्छा असते, त्यांचें वाचन एकाद्या उजाड प्रदेशांत भक्षार्थ हिंडणाऱ्या बुभुक्षित कुत्र्याप्रमाणें होय. खऱ्या वाचणारांची जेकबशीं तुलना करण्यास हरकत नाहीं. जेकबनें रात्रभर एका देवदूताशीं युद्ध केलें आणि त्याचा त्या युद्धांत एक पाय जरी जायबंदी झाला, तरी आपणांस युद्ध करण्याचा अनुभव मिळाला असें समजून त्याला आनंद झाला.

साधारण मानसिक उन्नत्ति करण्यासाठीं जें वाचावें लागतें त्याहून निव्वळ धंद्याविषयींचें वाचन भिन्न आहे म्हणून त्यासंबंधें कांहीं सूचना करणें व्यर्थ होणार नाहीं. कोणत्याही एका विशेष धंद्यास एकाएकीं हात घालण्याची तरुण मनुष्यांस स्वाभाविकच उत्कट इच्छा असते. परंतु धंदे करणाऱ्या मनुष्यांचा अनुभव व धंद्यांतील उत्कर्षाचा इतिहास ह्यांवरून पूर्णपणें असें सिद्ध झालें आहे कीं, धंदा पत्करण्यासंबंधाचा हा उतावीळपणा फार घातक आहे यांत संशय नाहीं. एकाद्या विचारी तरुण मनुष्यास थोडासा विचार केल्यानंतर असें दिसून येईल कीं, विद्यार्थीपणांत ज्या कांहीं

गोष्टी निरुपयोगी किंबहुना भारभूतही वाटतात, त्या आपल्या भावी व्यवसायाची उपयुक्त उपकरणें होऊन त्यांजपासून त्याकामीं अनेक प्रसंगीं चांगला फायदा होतो. भाषांची स्थिती विशेषेंकरून अशीच आहे. त्या प्रथम वस्तूंचें ज्ञान संपादन करण्याच्या कामीं आड येतात असें दिसतें. परंतु मनुष्य जसजसें आपलें धंद्याविषयीं ज्ञान वाढवितो अगर दृढतर करितो तसतशी भाषेची अवश्यकता अधिकाधिक भासते. नुसत्या भाषा शिकणें हीच इतिकर्तव्यता होय असें जर समजलें तर भाषांचें महत्त्व फाजील मानल्यासारखें होईल. भाषा ह्या बुद्धिमान व विचारी मनुष्याच्या हातांतील आऊतें होत. या दृष्टीनें भाषांची किंमत फाजील करावी तितकी थोडीच. शिवाय केवळ धंदेवाला मनुष्य नेहमीं कोत्या दृष्टीचा असतो इतकेंच नव्हे, तर त्यास एका अर्थानें कृत्रिम मनुष्य ह्मटलें तरी चालेल. कारण त्याला आपल्या धंद्यांतील विशेष गोष्टींशिवाय कांहींच दिसत नाहीं. त्याला सृष्टीचें ढोवळ ज्ञानही नसतें, व इतर मनुष्यांच्या सहवासानें घडणारे इष्ट परिणामही त्याचेठायीं लेशमात्र नसतात. केवळ आपल्या धंद्यांतच प्राविण्य मिळविलेला मनुष्य समाजांत बहुधा शून्यवत् असतो. तो आपल्या आवडत्या धंद्यांत इतका कांहीं गढून गेलेला असतो कीं त्याच्या आंगचे इतर मानवी धर्म मुळींच दृष्टीस पडत नाहींत. जर असला स्वच्छंदी

मनुष्य शेतकरी असला तर त्याला शेतकीशिवाय दुसऱ्या कोणत्याही गोष्टींविषयीं बोलतां यावयाचें नाहीं; अथवा जर तो विद्यार्थी असला तर ज्याप्रमाणें भंगट मनुष्याला भांगेवांचून दुसरें कांहीं सुचत नाहीं त्याप्रमाणें त्याला पुस्तकांशिवाय दुसरें कांहींच दिसत नाहीं. म्हणून केवळ धंद्याच्या अभ्यासांत एकदम पडूं नये इतकेंच नव्हे, तर या दुकानदारीच्या बिकट भानगडींत पडण्याचें होतां होईल तितकें टाळावें. केवळ धंद्याच्याच पाठीस लागलें असतां मन कसें संकूचित होतें हें थोड्याच अनुभवांतीं कळून येईल. म्हणून साधेल तितकें विस्तृत व खुल्या प्रदेशांतच आनंदानें भ्रमण करावें म्हणजे शरीरास व मनास आरोग्य होईल. परंतु जर मनुष्याचें मन केवळ धंद्याच्याच अभ्यासानें अगदीं ग्रासून जाईल आणि साधारण शिक्षणास त्यामध्यें मुळींच जागा रहाणार नाहीं तर त्यानें असें पक्कें समजावें कीं, धंद्याचा अभ्यास कितीही चांगला झाला तरी केवळ तद्विपयक अभ्यासानेंच धंद्याचें पूर्ण ज्ञान कधींही प्राप्त होणार नाहीं. कारण कोणत्याही धंद्याची कसरत कितीही सफाईदार आली तरी तिच्या योगानें त्या धंद्याचें अत्यंत मनोहर हृद्गत कधींही समजावयाचें नाहीं. धंद्याचें विशेष ज्ञान, आणि साधारण मनुष्याचा स्वभाव व त्याच्या मनाचा कल ह्यांविषयींचें साधारण ज्ञान, यांची सांगड होईल तेव्हांच एकाद्या धंद्याचें हृद्गत क-

ळेल. ही गोष्ट वकिलीच्या धंद्याचे उदाहरणानें तेव्हांच स्पष्ट होईल. कारण कांहीं गोष्टींत कायद्या इतका पारिभाषिक, कृत्रिम, व भूतदयाहीन जरी दुसरा धंदा सांपडणें कठिण आहे तथापि इतर बाबतींत मनुष्याचे हक्क व स्वातंत्र्य या विस्तृत विषयाशीं त्याचा फारच निकट संबंध आहे; आणि अनेक प्रसंगीं अशा गहन व व्यापक प्रश्नांचा वकिलास खल करावा लागतो कीं, त्यास केवळ कायद्याचेंच उत्तम ज्ञान पुरेसें होत नाहीं; तर अनेक अन्य विषयांचें साधारण ज्ञान त्यास अवश्य लागतें. त्याचप्रमाणें वैद्याला जसें निरनिराळीं औषधें व त्यांचीं रसायणें यांचे गुण व रोगाचें निदान व चिकित्सा यांचें ज्ञान असणें अवश्य आहे तसेंच मानवी स्वभाव व मानवी अंतःकरण यांचीही पूर्ण ओळख असणें जरूरीचें आहे. आणि धर्मज्ञानसुद्धां केवळ व्यवहारोपयोगी, व अंधपरंपरेस अत्यंत अनुसरून असलें तर त्यांत भूतदयेचा, श्रद्धेचा, भक्तीचा किंवा सुविचाराचा अंशही दृष्टीस पडावयाचा नाहीं. आणि एकजात अनुभवानेंही असें प्रतीतीस आलें आहे, कीं सर्व प्रकारचें शिक्षण मिळालेला सुशिक्षित विद्यार्थी एकाद्या धंद्यांत आरंभीं कितीही अयोग्य दिसला तथापि अखेरीस तो त्या धंद्यांतच वाढलेल्या लोकांस मागें सारल्याशिवाय रहात नाहीं. कारण एकाच धंद्यांत वाढलेल्या मनुष्याची दृष्टि संवयीमुळें कोती होऊन फार लांब पों-

चेनाशी होते. त्यामुळें आपल्या कामाचीं मूलतत्वें काय आहेत अथवा मनुष्याच्या साधारण हिताहितांशीं किंवा मानवी बुद्धीशीं आपल्या कामाचा काय संबंध आहे हें त्यांस कळत नाहीं. केवळ धंदेशिक्षणानेंच हा जो अहितकारक दुष्परिणाम घडतो, त्याजवर प्रतिबंधक उपाय अनेक आहेत. ते असेः—समाजांत मिसळणें, देशाटन करणें, आणि प्रसिद्ध ग्रंथकर्त्यांशीं व विशेषेंकरून प्रसिद्ध कवि व इतिहासकार यांच्याशीं चांगला परिचय करणें, कारण त्यांच्या संगतीनें त्यांचें मनुष्यजातीविषयींचे उत्तम व निर्मल विचार आपणांस कळून आपल्या अंगीं अभिमान व ईर्षा उत्पन्न होते, इतकेंच नव्हे तर आपलें अंतःकरणही उदार व विकसित होतें.

भाषाविषयाचा मी अध्यापक असल्यामुळें 'भाषांचा अभ्यास कसा करावा' यासंबंधी उपयुक्त सूचना मीं कराव्या असें पुष्कळांस वाटत असेल, व ते त्यांचा स्वीकार करण्यासही मनापासून तयार असतील; असें जाणून हा मानसिक शिक्षणाचा भाग आटोपण्यापूर्वीं त्या प्रकारच्या कांहीं सूचना करण्याचा माझा बेत आहे. भाषेचा अभ्यास कसा करावा, प्रथम कोणत्या गोष्टींकडे लक्ष द्यावें, व कोणत्या गोष्टी मागून शिकल्या असतां चालतील ह्याविषयीं मी जे नियम देणार आहें ते अनेक वर्षांच्या स्वानुभवानें सिद्ध झाले आहेत, ह्मणून

कोणत्याही भाषेचा अभ्यास कारितांना त्यांप्रमाणें चालण्यास कांहींएक हरकत नाहीं.

( १ ) साधेल तितकें करून चांगल्या शिक्षकापाशीं शिकण्यास आरंभ करा. असें केलें असतां तुह्मांस प्रथम ज्या अडचणी येतील व ज्यांच्या योगानें कदाचित् तुमची निराशाही होण्याचा संभव आहे त्या अडचणी तो एका क्षणांत दूर करून तुमचा बराच काळ व त्रास तो वांचवील; आणि शिवाय प्रथम जे अशुद्ध उच्चार तोंडीं बसतात व जे पुढें मोठ्या प्रयासानें सोडावेच लागतात त्यांस चांगल्या शिक्षकाच्या साहाय्यानें प्रथमपासूनच टाळतां येतें.

( २ ) दुसरी गोष्ट अशी कीं, ज्या परक्या भाषेचा तुह्मीं अभ्यास करीत असाल त्या भाषेंतील आपल्या सभोंवतालच्या प्रत्येक वस्तूच्या नांवाचा स्पष्टपणें व मोठ्यानें उच्चार करा; व त्यावेळीं मधेंच स्वभाषेचा उपयोग करून धेडगुजरी बोलणें लक्षपूर्वक टाळा. ह्मणजे ज्या भाषेचा तुम्ही अभ्यास करीत असाल त्या भाषेंतच प्रथमपासून आपल्या सभोंवतालच्या पदार्थांविषयीं बोलण्याचा प्रघात ठेवा; आणि भाषा शिकण्याचे कामीं कान व जीभ यांचा पुस्तकें व मेंदु यांच्यापेक्षां फारच अधिक उपयोग होतो हें कधींही विसरूं नका.

( ३ ) प्रथम ज्या नामांचीं निरनिराळ्या विभक्तींचीं रूपें फारच सोप्या सरळ व नियमित रीतीनें होत अ-

सतील तीं कशीं चालवावीं हें पाठ करा. उदाहरणार्थः— संस्कृत भाषेंतील अकारान्त नामें घ्या. हीं चालविणें फारच सोपें आहे; म्हणून त्यांचीं रूपें प्रथम पाठ करा.

( ४ ) ह्या नामांचीं प्रथमेचीं व द्वितीयेचीं रूपें पाठ करतांक्षणींच एकाद्या साध्या व सरळ चालणाऱ्या धातूचें प्रथम पुरुषाचें रूप घेऊन त्याच्याशीं वरील नामाच्या द्वितीया विभक्तीचें रूप जोडून जें लहानसें वाक्य तयार होईल तें स्पष्ट व मोठ्यानें म्हणा; व त्याचप्रमाणें एकाद्या साध्या धातूचें तृतीय पुरुषाचें रूप घेऊन प्रथमा विभक्तीशीं जोडून लहान लहान वाक्यें बनवा. जसें ' पुस्तकं पश्यामि '—मी पुस्तक पहातों; किंवा ' नरोगच्छति '—एक मनुष्य जातो.

( ५ ) नंतर वरील नामांप्रमाणेंच चालणारीं विशेपणें त्यांस लावून वाक्यें थोडथोडीं वाढवीत जा. जसें ' सुंदरं पुस्तकं पश्यामि '—मी सुंदर पुस्तक पहातों; किंवा ' खञ्जो नरो गच्छति '—एक लंगडा मनुष्य जात आहे.

( ६ ) ह्याप्रमाणें वर्तमान, भूत व भविष्य म्हणजे लट्, लङ् व लट् ह्या काळांचीं सोप्या धातूंचीं रूपें हळू हळू पाठ करा व तीं व सोपीं नामें ह्यांच्या मदतीनें लहान लहान वाक्यें नेहमीं तयार करीत असा. आणि साधेल तितकें करून परक्या भाषेंतच, स्वभाषेचा उपयोग न करितां विचार करीत जा. भाषेचें ज्ञान सं-

पादन करण्याच्या ह्या सुयुक्तिक व अवश्य पद्धतीमध्यें अनेक वेळां एक अडचण प्राप्त होते; ती ही कीं ह्या नवीन मार्गाचा निश्चयानें पिच्छा पुरविणें. परंतु ही अडचण पोकळ असून प्रयत्नांतीं तेंव्हांच दूर होईल.

(७) ह्याप्रमाणें सोपीं नामें व धातु व लहान लहान वाक्यें ह्यांमध्यें कान व जीभ हीं एकदां प्रवीण झालीं म्हणजे मग पायरी पायरीनें त्यांपेक्षां कठिण कठिण रूपांची ओळख करून घ्यावी. परंतु वरील प्राविण्य प्राप्त होण्याचेपूर्वी ह्या मार्गास लागतां कामां नये.

(८) कोणत्याही विषयासंबंधाचे केवळ नियम पाठ करण्यांत कांहीं अर्थ नाहीं, तर लगेच त्यांचीं उदाहरणें व उपयोग हीं माहीत करून घेतलीं पाहिजेत. अथवा कान व जीभ यांच्याद्वारें भाषेचा जो परिचय होत असतो त्यावरूनच भाषेच्या विशेष उपयोगाचे नियम बसवावे व ते पाठ करावे. मात्र हे नियम होतां होईल तितके थोडे व व्यापक असावे.

(९) निरनिराळ्या नियमांचे अपवाद भाषेच्या उपयोगांत जसजसे येत जातील तसतसें शिकणें हें चांगलें. परंतु कांहीं अनियमित धातूंच्या रूपांप्रमाणें कांहीं अपवाद इतके वारंवार येतात कीं त्यांच्या शिवाय पुढें जातांच येत नाहीं. अशा प्रकारचीं नेहमीं येणारीं व अवश्य लागणारीं अपवादक रूपें लौकरच मुद्दाम पाठ करणें बरें. बहुतेक भाषांत ‘ अस् ’ धातु ह्या प्रकारचा

आहे. म्हणून त्याचीं रूपें आरंभींच मुद्दाम पाठ करणें इष्ट आहे.

(१०) नंतर प्रथम संस्कृत भाषेंतील चवथ्या व पांचव्या तंत्रांतल्या प्रमाणें किंवा हितोपदेशांतल्या प्रमाणें साध्या व सोप्या भाषेनें लिहिलेल्या गोष्टी व संभाषणें वाचण्यास सुरवात करावी. परंतु ह्याप्रमाणें वाचनास सुरवात झाली ह्मणजे, त्या भाषेंत विचार करणें व बोलणें हीं मागें पडतां कामा नयेत. तथापि अनेक विद्यार्थ्यांची नेहमी अशी स्थिति होते ही गोष्ट फार शोचनीय आहे. ही स्थिति बदलण्याचा उत्तम उपाय ह्मटला ह्मणजे हा कीं सृष्टींतील निरनिराळे पदार्थ घ्यावे अथवा मनोहर पदार्थांचीं चित्रें घ्यावीं, आणि स्वभाषेचा उपयोग न करितां अन्य भाषेंत त्यांच्या भागांचें साध्या व छोट्या छोट्या वाक्यांनीं वर्णन करित असावें.

(११) ह्याप्रमाणें वाचनाची व वर्णनाची कसरत वारंवार—दोनदां, चारदां, हजारदां—करण्यास मागें घेऊं नये. आपलें नवीन भाषेचें ज्ञान जोंपर्यंत बाल्यावस्थेंतच आहे तों पर्यंत त्या भाषेंतील कोणतेंही वाचनीय पुस्तक एकदांच वाचून फेंकून देऊं नये.

(१२) आपणांस रुचतील अशींच पुस्तकें साधल्यास नेहमी वाचा. कारण वाचनाचा विषय आवडता असला ह्मणजे भाषाज्ञान दुप्पट जलद होतें. वाचना-

च्या विषयाची पूर्वी थोडीशी ओळख असली ह्मणजे वाचलेलें समजण्यास फारच मदत होते. ह्यामुळेंच स्कॉच् लोकांप्रमाणें ज्या ख्रिस्ती लोकांस बायबलाचें पूर्ण ज्ञान असतें त्यांस परकीय भाषा शिकण्याचे कामीं त्या भाषेंतील बायबलाच्या भाषांतराचा अत्यंत उपयोग होतो.

( १३ ) आपल्या वाचनांत येणारे परकी भाषेंतील विशेष व त्याच अर्थाचे स्वभाषेचे विशेष यांमध्यें काय फरक आहे हें लक्षपूर्वक पहात जा; ह्या कामीं आपण वाचीत असलेल्या पुस्तकाचें स्वभाषेंतील उत्तम भाषांतर फारच उपयुक्त आहे. ह्या प्रकारचे जे फरक दृष्टीस पडतील त्यांचेखालीं स्मरणार्थ पेनसिलीची किंवा शाईची रेघ मारा; आणि कांहीं दिवसांनंतर आपण वाचलेल्या पुस्तकाचें स्वभाषेंतील भाषांतर घेऊन त्याचें पुन्हा मूळ भाषेंत उलट भाषांतर करतांना पूर्वी खालीं रेघ मारलेल्या भाषाविशेषांचा उपयोग करा. मात्र असें करतांना मूळ पुस्तक पुढें असूं नये. तर ते भाषाविशेष स्मृतींतूनच निघाले पाहिजेत.

( १४ ) आपल्या अवलोकनांत येणाऱ्या भाषाविषयक गोष्टींची संगति लावण्यासाठीं अथवा त्यांतील चुका दुरुस्त करण्यासाठीं त्या भाषेच्या व्याकरणाचा उपयोग फायदेशीर वाटेल तोंपर्यंत करावा. परंतु होतां होईल तोंपर्यंत व्याकरण प्रथम पाहूं नये; प्रथम आप-

णच लक्षपूर्वक प्रयत्न करावा आणि नंतर व्याकरणाची मदत घ्यावी.

( १५ ) केवळ भाषेच्या प्रचारावरून दिलेले जे नियम व्याकरणावरील अनेक पुस्तकांत नमूद केलेले असतात ते नुसते पाठ करण्यांत कांहीं अर्थ नाहीं; तर ते नियम सर्व भाषांत साधारण असोत किंवा एकाच भाषेंत आढळोत, त्यांची उपपत्ति काय, ते कोणत्या तत्वांवर अवलंबून आहेत हें जाणण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

( १६ ) भाषेची उपपत्ति, रचना व अनेक भाषांच्या तुलनेनें तत्वविवेचन करण्याची पद्धति ह्यांचा अभ्यास करा. त्यांच्या अभ्यासानें जीं तत्वें तुह्मांस माहीत होतील त्यांचे मदतीनें परकी भाषेचा अभ्यास विचारपूर्वक करितां येईल; नाहीं तर तो अभ्यास बराच त्रासदायक व स्मरणशक्तीस भारभूत होईल.

( १७ ) तथापि संवय मुख्य होय. प्रथम भाषेशीं उत्तम परिचय झाला पाहिजे; तो सतत वाचन व सतत भाषण यांशिवाय होणें नाहीं. ज्या ठिकाणीं किंवा ज्या वेळीं आपण शिकत असलेल्या भाषेंत संभाषण करण्यास दुसरा तज्ज्ञ मनुष्य नसेल तेव्हां स्वतःशींच त्या भाषेंत बोलावें. सारांश नेत्र व बुद्धी यांसच नवीन भाषेचें शिक्षण द्यावयाचें नसून कर्ण व वाणी यांसही तिचें शिक्षण मिळालें पाहिजे. केवळ प्रसिद्ध व उत्तम

पुस्तकें तेवढींच वाचावीं असें नाहीं. तर जें काहीं हातीं लागेल त्याचा अधाश्याप्रमाणें सारखा फडशा पाडीत जावें. एकच पुस्तक सूक्ष्म रीतीनें तयार करणें बस्स नाहीं. तर नवीन भाषेच्या साधारण सर्व भागांचें मनःपूत अवगाहन केलें पाहिजे. ह्याचें कारण असें कीं, कोणत्याही भाषेंत साधारण प्रचारांतील विषयांसंबंधींचे लेख स्वतंत्रपणें समजूं लागल्याशिवाय आणि त्या भाषेंत त्याच विषयासंबंधानें अस्खलित भाषण करतां आल्याशिवाय त्या भाषेच्या बारीक बारीक खुब्या व तिचें खरें रहस्य समजावयाचें नाहीं. उदाहरणार्थ, शेक्स्पिअर कवीच्या नाटकांतील पाठांतरें अथवा त्याच्या नाटकांवरील टीकाकारांच्या सूक्ष्म क्लृप्त्या ह्यांच्या नादीं लागण्यास प्रथम तीं नाटकेंच पंधरा वीस वेळां नीट लक्षपूर्वक वाचलीं पाहिजेत.

(१८) भाषण, वाचन, भाषांतर, प्रतिभाषांतर, ह्या ज्या गोष्टी वरतीं सांगितल्या त्यांजविषयीं प्रयत्न केल्यानें अखेरीस परकी भाषेंत स्वतंत्र लेख लिहिणें आपोआप साधेल. स्वतंत्र लेखनासंबंधानें इतकें ध्यानांत ठेवावें कीं तो विषय कोश व भाषाविशेषांचीं पुस्तकें वाचल्यानें साध्य होणारा नाहीं; त्यास पुढें कोणता तरी एक कित्ता ठेवून त्याचें अनुकरण केलें पाहिजे. तत्वज्ञानाच्या संभाषणासंबंधानें प्लेटो अथवा विनोदी भाषणासंबंधानें लुशिअन, किंवा वादविवादासंबं-

धानें शंकराचार्य, अथवा सृष्टिवर्णनासंबंधानें बाण अशा प्रख्यात ग्रंथकर्त्यांची, निरनिराळ्या भाषांतील निरनिराळ्या सरणींच्या संबंधानें निवड करून त्यांच्यांतून उत्तम उत्तम शब्द व उत्तम उत्तम वाक्यें अथवा शब्दसमुच्चय वेंचा आणि त्यांच्याच पद्धतीनें स्वभाषेचा मध्येंच उपयोग न करितां, नवीन भाषेंत स्वतंत्रपणें कांहीं तरी लिहित जा. ह्याप्रमाणें त्यांच्या मदतीनें लेख लिहिण्याची सफाई प्राप्त झाली ह्मणजे मग तुह्मांस त्या भाषेंत मूळ ग्रंथकर्त्याप्रमाणें आपले विचार आपल्याच शब्दांनीं मनोहर रीतीनें हळू हळू प्रगट करितां येऊं लागतील. स्वभाषेंतील उत्तम ग्रंथांचेंही नवीन भाषेंत भाषांतर करण्यास हरकत नाहीं, तथापि ह्या मार्गाचें प्रथम अवलंबन करतां येत नाहीं. कारण स्वभाषेंतून परकी भाषेंत भाषांतर करण्याचें काम तींतून स्वभाषेंत भाषांतर करण्याचे कामापेक्षां फारच कठिण आहे; ह्मणून त्या कामीं यश येण्याकरितां परकी भाषेचे शब्द आपल्या कर्णांत एकसारखे घुमून त्यांचें पूर्ण स्वारस्य आपणांस माहित झालें पाहिजे. तात्पर्य, नवीन भाषा आपली पूर्णपणें अंकित झाल्याशिवाय त्या भाषेंत स्वभाषेंतली खुबी वठवितां यावयाची नाहीं.

भाग १ समाप्त.

---

# शारीरिक शिक्षण.

अस्तित्वांत असलेल्या हरएक वस्तुजातास—मुक्ता-

शीं कांहीं तरी आधार असल्याशिवाय त्याचें—अस्तित्व टिकावयाचें नाहीं, ही गोष्ट गणित-शास्त्रांतल्या ठराविक सिद्धांताप्रमाणेंच अगदीं स्पष्ट व सिद्ध आहे. उदाहरणार्थ—लता व वृक्ष यांची वाढ होण्यास मुळांची आवश्यकता आहे. दरवाजा उपयोगांत येण्यास बिजागऱ्यांची जरूरी आहे. सारांश, आपलें अस्तित्व कायम राखण्यास अत्यावश्यक अशा आधाराची—मग तो आधार वस्तुजाताशीं तुलना करितां किती कां लहान ठरेना—वस्तुजातास आवश्यकता आहे. एकाद्या घराच्या घटनेकडे लक्ष द्या ह्मणजे झालें. घर बांधणें झाल्यास पायाची अत्यावश्यकता आहे. तो असल्याशिवाय घर उभारतां यावयाचें नाहीं. वस्तुतः त्या पायाचा स्वतंत्ररीत्या कांहींही उपयोग नसून जेव्हां तो आपल्या पूर्णावस्थेंत असतो ह्मणजे जेव्हां त्याच्यावर घर बांधून होतें तेव्हां तो बहुतेक अदृश्य होतो, अशीच स्थिति असते. घर व त्याचा पाया ह्या परस्परांमध्यें जे संबंध आढळतात तेच संबंध वस्ततः मनुष्याचें विचारसामर्थ्य व शरीर, मानसिक उत्साह व शारीरिक आरोग्य ह्यांमध्यें वास्तव्य करितात. आतां हा सादृश्यभाव जर खरा असेल—आणि तो तसा आहे ह्यांत संशय नाहीं-तर आपली प्रकृति सुदृढ ठेवण्याची विद्यार्थ्यांनें इतर कोणत्याही गोष्टीपेक्षां जास्त काळजी घेतलीच पाहिजे. असें असतां आपल्या शरीरप्रकृतीची काळजी घेणें—शब्दपर्यायानें बोलावयाचें ह्मटलें ह्मणजे—आपल्या देहांतील रक्तमांसाचें विधिनियमानुसार परि-

पोषण करणें-ही गोष्ट सर्वांच्या अखेरीस-विद्यार्थ्यांच्या नजरेस येऊन नंतर त्यांजकडून तिचा मनःपुरःसर विचार होऊं लागतो हें सर्व प्रसिद्ध आहेच. आणि विद्यार्जनाची लालसा ज्या ज्या प्रमाणानें अधिक अधिक असते त्या त्या प्रमाणानें विद्यार्थ्यांचें सदरहू शरीरप्रकृति नीट राखण्याच्या क्रियेकडे दुर्लक्ष होतें; व वेळेवर मिळणारी इशारत ( Signal ) न पोंचल्यामुळें ज्याप्रमाणें अग्निरथाचा नाश होण्याचा समय येतो त्याप्रमाणें सदरहू दुर्लक्ष झाल्यामुळें आपली काय स्थिति झाली आहे हें समजण्यापूर्वींच त्याला नाशिवंत स्थितीप्रत पोहोंचण्याची पाळी येते. ह्मणून विद्यार्थ्यानें सर्वसाधारणतः व्यायाम विरहित असे धंदे व विशेपतः वशा संवई ह्यांची सतत व कडकडीतपणानें केलेल्या मेंदूच्या कामाशीं सांगड जुळल्यास त्याचा परिणाम कमजास्त प्रमाणानें शरीर-संपत्तीस विघातक होतो हें अनुभवसिद्ध तत्व मनांत बिंबवून आपल्या-विद्याभ्यासंगास सुरवात करावी. ही ज्याची शरीर-संपत्ति सुदृढ आहे अशा मनुष्याची स्थिति झाली. जे जात्याच काडीपेलवान असतात व ते तसे असल्यामुळें व्यायाम वगैरे गोष्टी त्यांस न आवडून त्यांच्या मनाची प्रवृत्ति नेहमी पुस्तकांत गढून जाण्याची असते.-त्यांनीं जर सदरहू वर निर्दिष्ट केलेले अनुभवसिद्ध तत्वाकडे कानाडोळा केला तर तात्काळ त्यांच्या मानासिक शक्ति

दुर्बल होऊन शरिराची वाढही व्हावी तशी होत नाहीं. इतक्या अनुभवसिद्ध गोष्टी कळल्यावरही जर एकादा विद्यार्थी ज्याप्रमाणें एकादा सुतार आपली तासणी निसण्यावर घांसून नेहमीं व्यवस्थित राखतो अथवा एकादा निपुण गोलंदाज आपला दारूगोळा भिजल्याशिवाय ठेवितो त्याप्रमाणें आपली शरीरप्रकृति नीट राखण्याविषयीं दृढ निश्चयानें काळजी न घेतां आड रानांत शिरेल तर त्याच्या शरीर-संपत्तीच्या वाईटपणाचें खापर त्याच्याच डोक्यावर फुटेल. सदरहू बाबतींत स्वतःच्या अनुभवानें अवगत झालेल्या व प्रचारांत आणण्यास योग्य अशा ठरलेल्या कांहीं महत्त्वाच्या गोष्टींचा निरनिराळ्या मथळ्याखालीं स्थूलमानानें उल्लेख करणार आहें.

शरीराच्या प्रत्येक अवयवाची—वस्तुतः जगांतील हरएक जीवन कार्याची—वाढ व जोम ह्या गोष्टी व्यायामावर अवलंबून आहेत. अखिल जीवित्व चैतन्यमय आहे; व ह्या चैतन्याचा पूर्ण अभाव मृत्यूखेरीज नाहीं. मनुष्यमात्राच्या व्यवसायबलावरून त्याच्या शक्तीची कल्पना होते. शरीराचा प्रत्येक अवयव व शक्ति हीं त्यांस अनुरूप अशा काम करण्याच्या स्थितींत असलीं ह्मणजे आपण निरोगी आहों असें समजावयाचें; व ह्या निरोगीपणाचा बऱ्याच प्रमाणावर अस्तित्वांत असलेल्या जीवशक्तीशीं संयोग झाला ह्मणजे ज्याला सशक्त-

पणा म्हणतात, त्याची आपली प्रतीति घडते. एकादा मनुष्य सशक्त असल्याशिवाय निरोगीही असण्याचा संभव आहे. परंतु सर्व साधारणतः निरोगीपणापासूनच शक्ति प्राप्त होते. म्हणजे अर्थातच रोगीस्थितीपासूनच अशक्ततेची उत्पत्ति आहे असें ठरतें. जगांतील एकंदर वस्तुजाताकडे आपली नजर फेंकली असतां आपणांस असें दिसून येईल कीं, वस्तुजताचे अंगीं दृग्गोचर होणारी पुष्टि पुष्टीपासूनच उत्पन्न झालेली आहे. ही पुष्टि जीवशक्तीच्या सततच्या व्यायामानें उत्पन्न होते. आणि जेव्हां तिला अजिबात प्रतिबंध करणारीं अथवा तिचा पाहिजे तितका जोर न चालू देणारीं कारणें उद्भवतात–उदाहरणार्थ, झाडांची बाब मनांत आणली असतां, समजा, झंझावात अगर इतर वायू उत्पन्न झाल्यानें–तेव्हां तिची वाढ खुंटते व पुढील उत्पत्तीची अर्थातच आशा सोडणें भाग पडतें. ह्यापासून विद्यार्थ्यानें तात्पर्य इतकें घ्यावयाचें कीं, खुर्चीवर सतत बसल्यानें अथवा पुढें ठेवून बसून लिहावयाच्या टेबलाजवळ एकसारखा सहवास केल्यानें अगर कमरेला बांक आणून बराच काल पुस्तकांशीं लग्न लावून घेतल्यानें शरीरास कधींही पुष्टि येणार नाहीं. असें केल्यानें ज्या प्रकारानें रुधिराभिसरण व्हावयास पाहिजे आणि ज्या प्रकारचें स्नायूंना चलनवलन पाहिजे त्या गोष्टी घडत नाहींत. योग्य प्रकारें रुधिराभिसरण होण्यास व जरूर तें

चलनवलन स्नायूंना मिळण्यास फक्त व्यायामच पाहिजे. आणि हा व्यायाम जर आपण केला नाहीं तर विधिनियमानुसार होणाऱ्या शासनास आपण पात्र होऊंच होऊं. प्रत्येक विद्यार्थ्यानें निदान दररोज दोन तास तरी उघड्या हवेंत फिरण्याचा कृत-संकल्प केला पाहिजे; व त्यानें जर ह्याप्रमाणें आपलें वर्तन ठेविलें नाहीं तर योग्य कालांतच वातादि विकार त्याचेठायीं उत्पन्न होऊन आपण विधिनियमाचें उल्लंघन केल्याविषयीं त्याला कळून येईल. आणि इतकें कळूनही जर ज्याप्रमाणें मातापिता अगर इतर वडील माणसांचा सदुपदेश झुगारून देऊन एकादा कुपुत्र कुमार्गांत रंगेल बनून राहतो, त्याप्रमाणें विद्यार्थी आपला वर्तनक्रम न सुधारतां विधिनियम उल्लंघन करण्याच्या क्रियेंतच रंगेल राहील तर त्यास शासन मिळाल्याशिवाय राहणार नाहीं. एकादे वेळीं आपल्या हातून मोठा गुन्हा झाला असूनही मनुष्याकडून आपणांस त्या गुन्ह्याबद्दल माफी मिळूं शकेल; परंतु विधिनियम उल्लंघन केल्यास त्याबद्दल कधींही माफी मिळावयाची नाहीं.— आरोग्याला अपायकारक व आळशी अशा बसूपणांत विद्यार्थीजन मोठ्या कौतुकानें काल कां घालवितो हें समजत नाहीं. विचार करावयाचा असला तर ती क्रिया बसण्यापेक्षां उभ्यानेंच जास्त फायदेशीरपणें करतां येण्याजोगी आहे. वाचना संबंधें—वि-

चार करावयाचा ह्मणजे विद्यार्थ्यानें आपल्या पाठीला पोंक आणून व छातीची घडी करून कधींही वाचूं नये. हल्लीं तर पूर्वींपेक्षां ही गोष्ट जास्त साध्य झाली आहे. हल्लींप्रमाणें हलक्या वजनांचीं व लहान आकाराचीं पुस्तकें पूर्वीं मिळत नव्हतीं व त्यामुळें तीं जड व जाडी अवजारें हातांत बराच काल घेऊन वाचण्यास जड पडत असे. मोरोपंताच्या कठिण केका अथवा भवभूतीचे नाटकांपैकीं एकाद्याचें अध्ययन खुर्चीवर बसून डुलक्या खात खात करण्यापेक्षां खोलींत इकडून तिकडे व तिकडून इकडे फेऱ्या घालीत करणें बरें. कारण अशा प्रकारें अध्ययन केल्यास तें कंटाळवाणें न होतां उल्हासानें होऊन उत्कृष्ट होतें. वस्तुतः बसूपणाची संवय फारच घाणेरडी आहे, ह्मणून तिला मोठ्या कौतुकानें आपला सौंगडी समजून आपलीशी करून घेणें घातुक होय. परंतु जेव्हां आपण बसतों अथवा आपणांस बसावेंच लागतें तेव्हां कांहीं झालें तरी ताठ बसण्याची संवय ठेवावी, व छाती योग्य तेवढी पुढें काढून बसावें. त्यांत कसूर करूं नये. तसेंच जेव्हां आपण भाषांचा अभ्यास करितों अथवा सुंदर सुंदर काव्यें वाचतों तेव्हां आपणांस जेवढ्या मोठ्यानें ह्मणून शब्दांचा उच्चार करवेल तेवढ्या मोठ्यानें तो करीत जाण्याचा सांप्रदाय ठेवावा. आपणांपैकीं पट्टीच्या विद्वानांस हा सांप्रदाय संमत आहे. एवढेंच नव्हे

तर तो तसाच असला पाहिजे असें त्यांचें मत आहे. अशा प्रकारें वर्णोच्चार मोठ्यानें केल्यापासून दोन प्रकारचे फायदे होतात. पहिला आपल्या फुफ्फुसांस ह्यामुळें सदृढता येते; व दुसरा शाळा अगर पाठशाळां मधून ज्या गोष्टीची—निंदेस पात्र अशी उपेक्षा केली जाते ती गोष्ट साध्य होते हा. ही उपेक्षा होत असलेली गोष्ट ह्मणजे वर्णोच्चार बरोबर झाला कीं नाहीं हें तो मोठ्यानें केल्यामुळें लोकांकडून आपणांस कळतें व ह्या योगानें आपल्या चुकांची दुरुस्ती होऊन कर्णेंद्रियाला वर्णोच्चारांत असणारे भेद कळतात ही होय. वस्तुतः पाहूं गेलें असतां, बहुतेक उदाहरणांत विद्यार्थ्यांस जें ज्ञान मिळवावयाचें असतें तें ज्ञान व ज्या बसूपणाच्या संवयी त्यास लागण्याचा संभव असतो त्या संवयी ह्यांमध्यें अवश्यक असा कोणताच संबंध नसतो. विद्यार्थ्यांच्या कर्तव्यांपैकीं विवक्षित भाग बजावितांना त्याला पुस्तकांशीं सारखी टक्कर देऊनच असावें लागतें व त्यामुळें कांहीं काल मान लववणें व पाठीला जरासें तरी वळण देणें भाग पडतें, ही गोष्ट मला निःसंशय कबूल आहे. परंतु असें आहे ह्मणून सदा सर्वकाळ अशाच रीतीनें काल घालविणें इष्ट होणार नाहीं. अगदीं जरूर तेवढाच काल अशा प्रकारें घालवावा. उदाहरणार्थ, आपणाला एकादें इंग्रजी काव्य लावावयाचें आहे असें घेऊन चालूं या. ह्या

बाबतींत आपण असें करावें कीं प्रथमतः शब्दकाठिण्य दूर करण्यासाठीं अगर त्याची व्याकरण—शास्त्र नियमानें फोड करून घेण्यासाठीं लागणारा कालच पुस्तकांशीं मान लववून व पाठीला पोंक आणून जरूर तर बसावें, नंतर बसण्याची कांहीं जरूरी नाहीं. पुढील वाचनमननादि कार्यें छाती योग्य तेवढी पुढें काढून खुलेपणानें वाटेल तेथें करितां येतात. विशेषतः अशीं कामें मुंबईच्या ब्याकबेवरील समुद्रकिनाऱ्याच्या एकाद्या खडकावर बसून अगर पुण्याच्या पर्वतीवरील एकाद्या पडक्या भिंताडाशीं वाऱ्याच्या तोंडावर स्थानापन्न होऊन अगर ह्यासारख्या इतरत्र स्थलीं असणाऱ्या जागीं अधिष्ठित होऊन चांगलीं होतील. अशा प्रकारच्या स्थलीं अधिष्ठित होऊन अशा प्रकारच्या वाचनमननादिकांची तृष्णा कमी होणें शक्य नसून उलटपक्षीं पंचमहाभूतांपैकीं कित्येकांच्या खड्या पहाऱ्यांतच काल जात असल्यामुळें ती प्रबलतर होऊन वाढीस लागते. आपल्या स्वतःच्या जन्मभाषेशिवाय इतर कोणत्याही भाषेचा अभ्यास करूं लागलें असतां पहिल्या वाचनाचे वेळीं त्यांतील कठिण शब्द कोशांतून काढून—त्याचें टांचण स्वतः करून ठेवावें. असें केल्यानें दुसऱ्या वाचनाचें काम सुखावह व सुगम रीतीनें टांचणाच्या—मदतीशिवाय होतें. शरीरप्रकृति नीट राखावयाची असल्यास आणि विद्यार्जन चांगल्या प्रकारें करणें असल्यास विद्यार्थ्यानें

विशेषतः विशेष रीतीनें खबरदारी घेतली पाहिजे, अशी बाब ह्मटली ह्मणजे ज्याप्रमाणें तंबाखू ओढणारा मनुष्य कोठेंही गेला तरी तंबाखूच्या दुर्गंधीला नेहमीं समागमें वागवितो त्याप्रमाणें जिकडे जाईल तिकडे आपल्या पुस्तकांतील विषयांना आपणापुढें न ठेवणें ही होय. त्यांकडे योग्य कालीं व योग्य स्थलींच एकतंत्रपणें लक्ष्य दिलें पाहिजे. पुष्कळ अविचारी व अपक्व विद्यार्थ्यांत वरील प्रकारचा दुर्गुण आढळतो. पुस्तकपठनावरच लुब्ध होऊन व्यवहार विसंवादित बनण्याच्या ह्या स्पर्शजन्य रोगाचा आपणांस विटाळ न होऊं देण्याचा उत्तम मार्ग ह्मटला ह्मणजे आपखुषीनें चैनीखातर शिपाईगिरीचें काम करणाऱ्या मंडळींत Volunteer Corps शिरणें हा होय. ह्या मंडळीच्या समागमानें दोन फायदे होतात. पहिला फायदा हा होतो कीं, पांडित्य प्रदर्शनाची आपल्या अंगीं असणारी झांक साफ निघून जाते. दुसरा फायदा ह्मटला ह्मणजे नागरिक ह्या नात्यानें व तरुण मनुष्यानें केलीं पाहिजेत अशीं सर्व कर्तव्यें करण्याचे कामांत आपण पूर्ण तरबेज होतों हा होय. मशियांतील अर्वाचीनकाळांमधील लोकांना लष्करी शिक्षणाची फार अवश्यकता वाटते व ह्मणूनच प्रत्येक मनुष्यानें कांहीं विवक्षित काल लष्करी पेशांत घालविलाच पाहिजे असा त्यांनीं कायदा केलेला आहे. प्राचीनकालांतील ग्रीक

लोकांनाही प्रशियांतील लोकांप्रमाणें सदर कायदा संमत होता. परंतु आह्मीं ह्या बाबतींत दुर्दैवी आहों. परिस्थित्यनुसार पोटाच्या पाठीस लागणें भाग पडल्यामुळें आह्माला ह्या जगांतील त्रासदायक नाटकांत भूमिका घ्यावी लागते. अर्थात अशी भूमिका घेतल्यावर नागरिक ह्या नात्यानें व तरुण बांड ह्मणून करावयाच्या आमच्या कर्तव्यास आह्मीं आंचवतों. अलीकडे अग्निरथांतून व अग्निनौकेमधून प्रवास करण्याचें फारच स्वस्त व सोपें झालें आहे. प्रवास केल्यानें नानाविध गोष्टींचें आपणांस ज्ञान प्राप्त होतें व सृष्ट्यवलोकनानें प्राप्त होणाऱ्या अकल्पित सुंदर कल्पना उपलब्ध होतात. असें असूनही वर्षानुवर्षे विद्यार्थीजन ह्या अमूल्य संधीचा फायदा न घेतां सदोदित पुस्तकांशीं डोकें घांशीत बसतो ही त्याची कृति अक्षम्य आहे. जर पुस्तकाची अवश्यकता असेलच तर तें खुशाल आपल्या खिशांत बाळगावें; परंतु असल्या पुस्तकी ज्ञानावरच अवलंबून राहण्याची संवय होतां होईल तों लावून घेऊं नये. नेहमीं सृष्टीच्या प्रत्यक्ष अवलोकनानें ज्ञान संपादन करणें हें जास्त इष्ट आहे. अशा अवलोकनानें आपणांस सभोंवतील सृष्टींतील वस्तुजाताचे आपल्या मनावर हळूहळू आघात होऊन आपले विचार व मन हीं प्रगल्भ होतात. परंतु अर्वाचीनकालीं प्रचलित असणाऱ्या प्रवास करण्याच्या

संवईपासून शिक्षणप्राप्ति व शारीरारोग्य हे जे द्विगुणित फायदे उपलब्ध होतात त्यांचा उपभोग घेण्यापूर्वीं गानवादनादि कलांचा रसास्वाद घेणें जरूरीचें नाहीं. भूगर्भशास्त्र, वनस्पतिशास्त्र, प्राणिशास्त्र, व जडाजड शास्त्राच्या सर्व शाखा ह्यांचा अभ्यास उघड्या जागेंतच सर्वोत्कृष्ट रीतीनें होतो. ह्या शास्त्रांचा यथातथ्य अभ्यास करण्याचे कामीं उत्साहपूर्वक व चपलतेनें लांब लांबपर्यंत जाण्याची संवय अत्यावश्यक आहे; व ही संवय ह्मणजे अर्थातच शूर वीरांनीं करावयाच्या कृतीचा " श्री ग " आहे. इतिहास व पुराण वस्तुशास्त्र ह्यांच्या अध्ययनास एकादी डोंगरांतील गुहेसारखी जागा अगर एकादा आश्रम किंवा मोडकळलेल्या बुरजाचा कांठ ह्या जागा जास्त सोईकर आहेत. जो विद्यार्थी घरीं बसून पुस्तकी पांठातरें करूनच ज्ञानप्राप्ती करितो—व विशेषतः हल्लींच्या दळणवळणादि साधनें कमजास्त प्रणाणानें सर्व जगभर वाढलेल्या काळांत—तो मरेपर्यंत क्षीणशक्ति राहून अकालिक मृत्यूमुखीं पडतो; एवढेंच नव्हे तर सुदृढ प्रकृतीच्या माणसांच्या आश्चर्यास वगैरे तो पात्र होतो.

आपलें शरीर लवचिक व दृढतर राखण्यास खेळ व तालीम ह्यांसारखें रामबाण औषध सांपडणें दुर्लभ आहे. पुष्कळ लोक जेवणाचे पूर्वीं दररोज रपेटीस जातात; तिजपासून फायदा आहे ह्यांत जरी संशय नाहीं तरी

सरसकट सर्वत्रांस फायदा होईल असें नाहीं. ज्यांना ह्या रपेट करण्याचा बोजासा वाटतो त्यांना तालमेचे खेळ खेळल्यानें अवश्यक त्या व्यायामाचा फायदा होऊन शिवाय चारचौघांत मिसळल्यापासून होणाऱ्या लाभाची प्राप्ति होते. मुलांनीं व तरुण मनुष्यांनीं " गुलिका क्रीडा " ( cricket ) नांवाचा खेळ, तसेंच आट्यापाट्या, चेंडू, विटीदांडू वगैरे खेळ खेळावे. शांत स्वभावाच्या माणसांनीं व गंभीर वृद्ध अविवाहितांनीं ज्याला इंग्रजींत बाऊल ह्मणतात ( सपाट जमिनीवर गोळ्या फेंकण्याचा क्रिकेटसारखा खेळ आहे ) त्याचें अवलंबन करावें. व सर्वसाधारणतः सर्वत्रांनीं कोणच्याही कालीं खेळण्याचा खेळ ह्मटला ह्मणजे कंटुक-क्रीडा ( Golf ) नामक खेळ हा होय. व्यायामासाठीं नाविकाचें काम करणें हें अलबत उत्तम आहे. पण त्याचा अतिरेक होतां कामा नये. बेताबातानें अशा प्रकारचा व्यायाम केल्यास तो किती सुखकर होतो व त्याचा अतिरेक झाल्यास काय परिणाम होतो ह्या गोष्टीची ओळख करून घ्यावयाची असेल, तर डेक्कन कॉलेजांत अध्ययन केलेल्या एकाद्या विद्यार्थ्यास त्या संबंधें माहिती विचारल्यात ती मिळूं शकेल. वर्षाकालांत बिलिअर्डसचा ( Billiasds ) खेळ सर्वोत्कृष्ट होय. ह्या खेळांत डोळ्यांची तीक्ष्णता, स्पर्श करण्याचें कौशल्य, व अंदाजाची सूक्ष्मता ह्या गोष्टी निःशंकपणें वर्णनीय

असतात. ह्या सर्वांशीं तुलना करितां गंजिफांचा खेळ फारच क्षुद्र आहे. त्यापासून अगदीं जास्तींत जास्ती फायदा ह्मटला ह्मणजे स्मरणशक्ति वर्धमान होण्यास थोडेंसें सहाय्य होण्यापलीकडे कांहींही नाहीं. बुद्धिबळांच्या खेळाला क्वचितच कर्मणूक ह्मणतां येईल. कारण, तो निव्वळ अभ्यास असून त्यांत मेंदूला बरेच श्रम पडतात. उडाणटप्पूपणानें मानसिक चापल्य ज्याच्या अंगीं वास्तव्य करीत असतें अशा एकाद्या मनुष्यास ह्या खेळांत मोठेपणा वाटत असेल, परंतु पद्धत्यनुसार विचार करण्याचा ज्याला प्रसंग असतो त्याला ह्या खेळापासून क्वचितच आरामप्राप्ति होईल.

आतां " कसें व काय खावें प्यावें " ह्या अगदीं दररोजच्या प्रचारांतील बाबींसंबंधें थोडेंसें लिहिण्याचा माझा विचार आहे. खाण्यापिण्याच्या बाबतींत आपण बहुधा अनियमित वागतों, ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. आपणांस कांहींतरी खावयास असल्याशिवाय आपलें चालावयाचें नाहीं, व जें खावयाचें तें सत्वस्थ व पुष्टिकर असलें पाहिजे, हें उघड सांगावयास पाहिजे असें नाहीं. " कसें व काय खावें प्यावें " ह्यासंबंधें समग्र माहिती आपणांस पाहिजे असेल तर ती वैद्यराजाकडे गेल्याशिवाय आपणांस मिळावयाची नाहीं. परंतु ह्यासंबंधें सर्वमान्य तत्त्व ह्मटलें म्हणजे " अतीशय साधें अन्न सर्वोत्कृष्ट आहे " हें होय. तूप, दूध,

गहूं, ज्वारी व तांदूळ ह्यांचें सेवन मेंदूला हितावह व रक्तवृद्धीच्या कामीं अत्यंत उत्तम आहे असें अनुभवांतीं सिद्ध झालेलें आहे. देशकालमानानें खाण्याच्या पदार्थांत फेरबदल करणें जरूर आहे. आह्मां भारतवर्षीयांस सदरीं वर नमूद केलेलेंच अन्नसेवन इष्ट आहे. सेवनाचे पदार्थ अगदीं उत्कृष्ट असले तरी त्यांचा उपयोग करतेवेळीं आपल्या हातून त्या बाबतींत बऱ्याच चुका होतात. कोणतेंही काम करूं लागलें असतां ज्यांच्या पाठीस वाघ लागलेला आहे अशा प्रकारचे कांहीं लोक आपणांस आढळतात. स्वस्थतेनें कोणतेंही काम करण्याचें ह्यांच्या गांवींही नसतें; आणि म्हणून ते खाऊं लागले तरी सुद्धां घांसावर घांस कोंबून जेवण शक्य तेवढें जलद आटोपतात. व्यावहारिक अथवा तात्विक कोणत्याही दृष्टीनें पाहिलें तरी हें वाईट आहे. जो अशा प्रकारें जेवतो त्याला जेवणापासून होणारें सुख व अन्नपचनाचा फायदा ह्या दोन्ही बाबतींत दुःखी असावें लागतें. व्यवसायपरिप्लुत नगरांतील कर्तव्यव्यापृत जन व प्रजापक्षाचे वाली ह्या नात्यानें राजपक्षाशीं वाग्युद्ध व त्यासारख्या प्रजापक्षाच्या कल्याणार्थ अव्याहत खटपटींत चूर असणारे **अमेरिकेंतील** लोक ह्या शरीरप्रकृतीस अहितकारक मार्गांत रत असलेले आढळतात. विद्यार्थी व वाचनाचे शोकी ह्याच प्रकारचे असतात. कांहीं कांहीं वाचनावर आसक्त झाले-

ले लोक नुसतें झपाझप जेऊनच थांबत नाहींत, तर ह्या झपाझप जेवणाचे वेळींहीं वाचनक्रियेला खळ पडूं देत नाहींत. अशा प्रकारें मेंदू व पोट ह्या दोहोंना एकाच कालीं सृष्टिकर्त्याच्या सृष्टिसंबंधें केलेल्या नियमांविरुद्ध काम करण्यास लावल्यानें साहजिकच तीं दोन्ही अशक्त होतात. चहा, दूध, काफी वगैरे पीत असतांना मोरोपंताच्या सुंदर कविता वाचल्यानें सुख होऊन मनालाही आनंद होतो; परंतु जेवण आणि चहा वगैरे पिणें ह्या दोन्ही गोष्टी सारख्या नव्हत. जेवणाचे कामांत स्थीरपणा अवश्यमेव असला पाहिजे. त्या वेळीं दुसरी कोणतीही उपाधी पाठीमागें असतां कामा नये. चनसेलर थरलो ह्याचें असें मत आहे कीं, मनुष्यानें आपलें मन एका कालीं एका कामावर ठेविलें पाहिजे. कोणाही सहृदय वाचकास थरलोचें मत ग्राह्य असणारच. जेवतांना मनाला आनंदित करणारें संभाषण अथवा शक्य असल्यास सुंदर सुस्वर गायन ह्या गोष्टी इष्ट होत. आपल्या समाजांत सर्वसाधारणतः दृग्पथांत येणारें जेवणाचे वेळचें रडणें व एकमेकांची बोलण्याची कीच ह्या गोष्टी हरएक कौटुंबियानें टाळण्याविषयीं यत्न करीत असावें. जेवतांना चिंता उत्पन्न करणारे विषय अथवा गूढ विचारांशिवाय ज्यांची संदिग्धता दूर होत नाहीं असे सिद्धांत मनांत वागविणें अनिष्ट होय. ह्या दृष्टीनें एकांतवासी मनुष्याप्रमाणें जे-

वण्यापेक्षां चारचौघे पंक्तीला घेऊन जेवणें फारच सुखकर होतें. पाश्चात्य देशांतील विश्वविद्यालयांमध्यें मनाला आल्हाद उत्पन्न करण्याजोगी एका विशिष्ट प्रकारची जेवणाची जागा तयार केलेली असते; व ह्या जागेंत सर्व विद्यार्थी एकाच वेळीं जमून मोठ्या आनंदानें भोजनविधि उरकतात. पाश्चात्यांचें अनुकरण इतर कांहींप्रमाणें ह्याही बाबतींत करण्यासारखें आहे. आपणांमध्यें रांगोळ्या घालून उदबत्त्यांच्या सुंदर सुवासांत समाराधना व मेजवान्या करण्याचा जो आपल्या पूर्वजांनीं कित्ता घालून दिला आहे तोही ह्याच तत्वावर असला पाहिजे. आतां अन्नाच्या प्रकाराविषयीं विचार करूं. नेहमीं आपल्या खाण्याच्या पदार्थांत बदल असला पाहिजे. असा बदल केल्यानें नूतनता उत्पन्न होऊन भुकेचें उद्दीपन होतें. सृष्टिनियमांचें निरीक्षण करूं गेलें तरी सृष्टींत सौंदर्य ह्मणून ज्यांत आहे त्यांत एकसम-समान-रूपतेचा अभाव आहे. शिवाय व्यावहारिक दृष्टीनेंही आपल्या पोटाला एका विवक्षित प्रकारच्या अन्नाचा बंदा गुलाम बनविणें वाईट आहे. मनुष्य कोणत्याही स्थितींतील असला तरी तो नेहमींच सारख्या परिस्थितींत असतो असें नाहीं. प्रवास वगैरेंत ज्याच्या घरीं चार शागीर्द असतात व जो दररोज पंचपक्वान्नांचें जेवण जेवतो त्याला सुद्धां दक्कू—भात खाऊन स्वस्थ बसावें लागतें. ज्यास आपलें आवडतें पक्वान्न खाऊन

त्या सुखाचा सदोदित अव्याहत उपभोग घेण्याची इच्छा असेल त्याला आपलें आवडतें घर सोडून इतर कोठेंही प्रवास करण्याची सोय नाहीं. त्याचा प्रवास वगैरे सर्व कांहीं त्याच्या घरांतच होणार. इंग्लंडसारख्या शीत देशांत अन्नपचन वगैरे होण्यासाठीं भोजनाचे वेळीं मद्याचा एखादा प्याला झोंकल्यास हरकत नाहीं. परंतु त्या प्याल्याची आपल्या ह्या भरतखंडांत केव्हांही काडीमात्र अवश्यकता नाहीं. प्रत्यक्ष इंग्लंडांतही मद्यपान ज्यांस कधींही माहीत नाहीं असे कांहीं वंद्य थोर पुरुष सांपडतील. अर्थसंचयाचे दृष्टीनें सुद्धां मद्यप्राशन न करणें हें फारच चांगलें आहे. असें वागल्यानें संकटसमयीं उपयोगीं पडण्यास आपणाजवळ चार पैसे शिल्लक असतात.

खोल्यांमधून वाजवीपेक्षां फाजील विद्यार्थी राहिल्यानें व पाहिजे त्याहून कमी प्रमाणानें हवा खोल्यांत खेळल्यानें काय अनिष्ट परिणाम ओढवतात ह्याबद्दल विद्यार्थ्यांस सावध करण्याच्या उद्देशानें चार शब्द सांगण्यापेक्षां जास्त अगत्याच्या अशा फारच थोड्या बाबी असतील असें मला वाटतें. अशुद्ध हवेपासून शुद्ध रक्ताची कालत्रयींही उत्पत्ति होणार नाहीं; व अशुद्ध रक्तानें सर्व शरिराची नासाडी होते. परंतु हवेंत असणारे अशुद्ध पदार्थ बऱ्याच प्रमाणावर जरी आपल्या शरिरांत गेले तरी त्यांचा तात्कालिक परि-

णाम आपल्या अनुभवास येत नसल्यामुळें विचारशून्य व निष्काळजी लोक—अशा प्रकारचे बहुतेक सांपडतील हें मी भीत भीत म्हणतों—ते अशुद्ध पदार्थ ह्मणजे एक प्रकारचें विषच आपण शरिरांत घेत आहों असें मनांत न आणतां त्यांना आपल्या शरिरांत एकसारखें घेतच असतात ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. ज्या दुःखद गोष्टींचा परिणाम सव्याज भोगावा लागतो त्या अत्यंत भयंकर होत; ह्मणून ज्यांना नेहमीं लहान लहान कोठड्यांतून राहण्याचा प्रसंग असतो त्या विद्यार्थ्यांनीं बाहेर जातांना आपल्या कोठड्यांच्या खिडक्या उघड्या टाकून जात जावें अशी माझी सूचना आहे. आणि निजावयाच्या खोलींतील खिडक्या त्यांमधून वाहणाऱ्या हवेचे आघात प्रत्यक्ष आंतील निजणारावर होणार नाहींत अशा प्रकारें बसविलेल्या असतील तर कोणत्याही ऋतूंत रात्रंदिवस त्या अलबत उघड्या ठेवाव्या. कांहीं कांहीं स्थळीं रात्रौ हवेचे अनारोग्य प्रवाह वाहात असतात, अशा स्थळीं मात्र हा नियम उपयोगीं पडणार नाहीं.

आतां, झोंपेविषयीं चार शब्द सांगणें आवश्यक होईल काय ? पुष्कळांना अवश्यकता आहे असें वाटणार नाहीं. ह्या बाबतींत सृष्टिक्रमच मार्गोपदेशक ह्मणून बस्स आहे असें आपण धरून चालावें. जेव्हां झोंप येईल तेव्हां निजावें व कोंबडा आरवावयाचे वेळे-

स अथवा सूर्यकिरणांच्या तेजानें डोळयांवरील झोंपेची झांक मोडते तों उठावें. ही सर्व स्थिति जर सृष्टिकर्त्याच्या आज्ञेनुसार वर्तन घडलें तरच साध्य होणार. परंतु मनुष्य सृष्टिकर्त्याच्या आज्ञांचें पुष्कळ तऱ्हेनें उल्लंघन करीत असल्यामुळें झोंपेसंबंधीं सर्वसाधारणपणें उल्लेख करणें निरुपयोगीं ठरतें. झोंपेच्या बाबतींत विशेषतः विद्यार्थी सृष्टिकर्त्याच्या आज्ञांचें उल्लंघन करितात. त्यांचा धंदा जात्याच झोंपेमध्यें आडकाठी आणणारा आहे. ज्यांना विचार करावयाचा असतो असे लोक झोंपेच्या कामांत हलगर्जीपणानें वागतात. ह्या त्यांच्या वर्तनाबद्दल कडकडीत उपायांची योजना करणें अत्यवश्यक आहे. वाजवीपेक्षां फाजील काफी घालून तयार केलेला काफीचा प्याला ज्याप्रमाणें झोंपेचा कट्टा शत्रू आहे त्याप्रमाणेंच डोक्याचा ताप हा झोंपेचा पक्का हाडवैरी आहे. म्हणून विद्यार्थ्यांनीं आपल्या अभ्यासाच्या वेळापत्रकांत अशी योजना करावी कीं ज्यांत ज्यास्त मानसिक ताप होतो असें वाचन झोंपी जावयाचे पूर्वी वाचावयाचें म्हणून नमूद करूं नये. झोंपी जावयाचे पूर्वी थोडें व सोपें आणि निद्रा उत्पन्न करणारें असें वाचन वाचावें. ह्याहीपेक्षां चांगला मार्ग ह्मटला ह्मणजे झोंपी जावयाचे पूर्वी एक तास रपेट करणें अथवा प्रिय सुहृदांजवळ आनंदानें घटकाभर संभाषण करणें हा होय. असें केल्यानें कोणत्याही कु-

त्रिम उपायांच्या योजनेशिवाय जरूर तेवढी झोंप साहजिकच मिळाल्याखेरीज राहणार नाहीं. झोंप नक्की किती घ्यावी ह्याबद्दल कोणताही एक नियम असा करितां येणें शक्य नाहीं. सर्वसाधारणतः आलेल्या अनुभवावरून पाहूं गेलें असतां सहा तासांपेक्षां कमी अथवा आठ तासांपेक्षां जास्त झोंप घेणें इष्ट नाहीं. रात्रौ बराच वेळपर्यंत मुद्दाम जाग्रण केल्यामुळें अवश्यमेव उत्पन्न होणारा थकवा व आंग मोडून येणें ह्या दोषांचा संसर्ग न होऊं देण्यास आपणांस स्वाभाविक किती झोंप पाहिजे हें जो विद्यार्थी दररोज दोन तास रपेट करितो व शिवाय आठ नऊ तास डोक्याचें काम करतो त्यास कळून येतें. ज्या प्रातःकालच्या उठण्यानें कांहीं सुप्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें वाचलीं असतां त्यांच्या आयुष्यक्रमांत सौंदर्य आणल्याचें दिसतें त्यासंबंधें मला फारच थोडें लिहतां येईल; कारण माझ्या दुर्दैवानें मला त्या सद्गुणाचा कधींही लाभ घेतां आला नाहीं. कांहीं त्रास झाल्याशिवाय व स्वाभाविकपणें प्रातःकालीं उठण्याची सवय चालवितां आली तर निःशंकपणें ती शरीरसंपत्तीस हितावह आहे. कांहीं विशिष्ट स्थितीमध्यें तर प्रातःकालचाच काल गूढ शोध व धर्मनिष्ठ आत्मैकाग्रता ह्यांस अत्युत्तम गणलेला आहे. स्नानसंध्येचा कालही आपल्या धर्मशास्त्रज्ञांनीं ह्याच तत्वावर ठरविलेला आहे.

पाश्चात्य देशांत कांहीं विशिष्ट प्रकारच्या सोईचीं स्नानगृहें ( Hydropathic Institutions ) असतात. सुप्रसिद्ध अशा अनेक स्नानगृहांत जाऊन तीं कोणत्या तत्वांवर प्रचारांत आलीं आहेत व तेथील जलोपचारपद्धतीचा शरीरसंपत्तीस आरोग्य आणण्याच्या कामीं कसा उपयोग होतो ह्या गोष्टींचा मी काळजीपूर्वक विचार केलेला असल्यामुळें त्यासंबंधें चार शब्द लिहिल्यास माझें लिहिणें धाडसाचें ठरणार नाहीं. ह्या विशिष्ट प्रकारच्या स्नानगृहाचा उपयोग केल्यानें व्यायाम, विश्रांति, करमणूक व अन्योन्यसंघट्टन हीं सुखें प्राप्त होऊन त्वचेचा घर्मस्राव करण्याचा जो साधारण धर्म आहे त्यास प्रोत्साहन मिळतें. व्यायामादि वर निर्दिष्ट केलेल्या सुखाचें एकसमयावच्छेदेंकरून झालेल्या संमीलनाचा शरिरावर घडणारा परिणाम अत्युत्तम तऱ्हेनें आरोग्यावह होणार नाहीं असा कोणता सहृदय वाचक ह्मणेल ? आतां, अशा विशिष्ट प्रकारच्या स्नानगृहाचा उपभोग सदोदित घेतां येणें मोठ्या खर्चाचें काम असल्यामुळें सर्वांसच तो सदोदित मिळेल असें नाहीं; परंतु ह्या स्नानगृहांमधून प्रचारांत असलेल्या पद्धतींपैकीं कांहीं पद्धति कांहींएक विशेष खर्च न लागतां आपणांस दररोज प्रचारांत आणतां येण्याजोग्या आहेत हें विद्यार्थ्यांस सुचविणें अगत्याचें आहे. जेथें पाणी विपुल असेल तेथें दररोज प्रातःका-

ळीं स्नान केल्याशिवाय राहूं नये. प्रातःस्नानापासून शक्ति वाढते व मनाला उत्साह प्राप्त होतो. कित्येकांना नुसती धोंडभट्टी करून दोन दोन चार चार दिवस राहण्यांत मोठी प्रौढी वाटते; परंतु ती त्यांची प्रौढी शरीरसंपत्तीच्या कामीं विघातक आहे. पाण्याची महर्गता असल्यास टुवाल अगर राजापुरी पंचा अथवा त्यासारखा खरखरीत फडका घेऊन तो पाण्यांत भिजवावा; आणि तो साफ पिळून काढल्यानंतर त्यानें अंग पुसावें. अशा प्रकारच्या अंग पुसण्यानें जरी प्रत्यक्ष स्नानाइतका हितावह परिणाम घडला नाहीं तरी जवळ जवळ त्याइतकेंच कार्य होतें. टुवाल, पंचा अथवा खरखरीत फडका प्रथमतः अंगाभोंवतीं गुंडाळून घेऊन त्यानें अंग साफ घांसावें; आणि नंतर त्याच रीतीनें दुसऱ्या एका कोरड्या टुवालानें अगर फडक्यानें पुनः एकवार अंग घांसून काढल्यास त्वचेवरील मळ्या वगैरे घाणेरडे पदार्थ निघून जाऊन स्वच्छता होते. ज्याला सोसेल त्यानें खुशाल थंड पाण्यानें स्नान करावें; परंतु ज्याला तें मानवणार नाहीं त्यानें रेंटारेंटी न करितां उष्णोदकाचा उपयोग करावा. प्रकृति, ऋतुमान आणि स्थल ह्यांच्या धोरणानें सदरीं वर दिलेल्या नियमांत बदल होणें शक्य आहे. हा बदल कसा व केव्हां करावा ही गोष्ट समजावून घेण्यास वैद्यशास्त्रज्ञाचा सल्ला घेतला पाहिजे; त्या बाबतींत माझें

ह्मणणें प्रमाण होणार नाहीं हें मी उघड रीतीनें कबूल करतों.

आतां, शारिरारोग्यासंबंधें ह्याशिवाय मला जें कांहीं सांगावयाचें आहे त्याचा ह्याहून सर्वांशीं भिन्न अशा भागांत समावेश होतो. नुसत्या पोटाची सुश्रूषा नीट ठेविल्यानें मनुष्य निरोगी असणार नाहीं. नाजूक, सूक्ष्म व गुंतागुंत झालेल्या घटनेचें आश्रमस्थान जें शरीर, ह्याचा मनाशीं अतिनिकट संबंध असल्यामुळें ज्याप्रमाणें वाफेच्या यंत्राला गति देण्याच्या कामीं चूकभूल झाल्यास त्याच्या योगानें यंत्रांतील सर्व चक्रें मोडून एकच घोंटाळा होतो, त्याप्रमाणें वस्तुस्थितीचे आघात मनावर झाल्यास त्यांचा परिणाम शरिरावर होऊन सर्वत्र अव्यवस्था होते. शरिराचा कोणताही व्यापार अव्याहत रीतीनें बराच कालपर्यंत चालविण्यास सुविचारसंबद्ध इच्छेवर कडकडीत दाब असलाच पाहिजे. सर्व शरिराचें स्वामित्व ज्या मनाकडे आहे त्याच्या देखरेखीची शरिराच्या शक्तींशीं फारकत होतांच त्या परस्परांमध्यें एक दुबळ द्वंद्व उत्पन्न होऊन शरिराच्या शक्तींचा सर्वांशीं पराजय होतो. मनोवृत्तिशकट जर सुयंत्रपणें चालला तर शारीरशकट सुद्धां तसाच चालेल. स्वेच्छाचारसमुद्रांत अविचारानें निमज्जन केलें नाहीं तर अनियंत्रतेच्या योगानें अकालीं होणारा शरीरधातुक्षय होत नाहीं.

ह्मणून जर आपण निरोगी असावें अशी आपली इच्छा असेल तर आपण चांगुलपणानें वागलें पाहिजे. जर चांगुलपणाची इच्छा असेल तर आपण शहाणपणानें वागलें पाहिजे. जर शहाणा होण्याची इच्छा असेल तर धर्मश्रद्धा व भक्तिभाव ह्यांची अवश्यकता आहे; कारण ईश्वराच्या भीतीपासून शहाणपणाचा उगम आहे. ह्या सर्वांचा ऊहापोह पुढील भागांत होईल.

**भाग २ समाप्त.**

---

# नैतिक शिक्षण.

आत्मोन्नतीच्या तीन भागांपैकीं अत्यंत महत्वाचा भाग नीतिशिक्षण हा होय. मनुष्यप्राण्याला हरएक बाबतींत चलनवलन मिळण्याला नीतीच कारण होते; इतकेंच नव्हे, तर मनुष्यप्राण्याच्या अंतरिंद्रियांचा सर्व अधिकार नीतीकडे आहे. नीति हीच तेथील स्वामिनी होय. म्हणूनच मानवी उन्नतीच्या सर्व प्रकारांत नीति हें प्रधान तत्त्व आहे. एखादा मनुष्य कितीही तेजस्वी असो, हुषार असो, शक्तिमान असो, उदार असो, जर तो नीतिमान नाहीं तर त्याच्या इतर गुणांना कवडीचीही किंमत नाहीं. ज्या उच्च पदवीला पोंचण्याची तो इच्छा करितो—आणि जरी कदाचित् मह-

त्प्रयासानें त्याचा हेतु सिद्धीस गेला तरी–ती पदवी नीतिमत्तेशिवाय केवळ दुर्गुणाचा झेंडा रोंवण्याची जागा बनते. पहिल्या नेपोलियन राजानें सर्व यूरोपखंडभर झंजावाताप्रमाणें धुमश्चक्री मांडिली व अनेक प्रचंड राज्यरूपी वृक्ष समूळ पाडून टाकिले, हें खऱ्या उन्नतीवांचून मानवी आकृतींत अमानुष शक्ति असूं शकेल याचें उदाहरण आहे. आतां स्वभावसिद्ध तो कुमनुष्य होता असें आपणाला ह्मणतां येत नाहीं; परंतु राज्यविस्तार व राजकीय प्रमुखत्व यांचें वेड लागल्यामुळें स्वार्थत्यागाच्या योगानें प्राप्त होणाऱ्या अत्युच्च उन्नतीची प्राप्ति करून घेण्यास त्याला संधी सांपडली नाहीं; म्हणून नीतिमत्तेच्या राज्यांत तो भिकारी व क्षुद्र ठरला. प्रबल राजे किंवा राजकार्यधुरंधर राजमंत्रि केवळ नीतितत्वाच्या अभावामुळें या अत्युच्च उन्नतीला मुकतात असें नाहीं; तर हार्टलेसाहेब यांनीं असें ह्मटलें आहे कीं, सृष्टिशास्त्र, गणितशास्त्र, भूगर्भशास्त्र इत्यादि अनेक शास्त्रें इतकेंच नव्हे, पण धर्मशास्त्रांत देखील पारंगत झालेल्या महाविद्वानांचा पोकळ डौल, गर्व, उद्धटपणा, असूया व मत्सर यांना कोणीही मागें टाकूं शकणार नाहीं; ह्मणजे ते देखील नीतिमंदिरांत क्षुद्रजंतूच ठरतात. यांत आश्चर्य वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. उन्नतीप्रत पोंचविणाऱ्या इतर गोष्टींच्या शिक्षणाप्रमाणें नीतीचेंही स्वतंत्र शिक्षण मिळा-

लें पाहिजे. आणि ज्याअर्थी आपलीं इंद्रियें ताब्यांत ठेवणें महा दुर्घट आहे व आपले सर्व व्यवहार इंद्रियांच्या इच्छेनुरूप होतात, त्याअर्थी हें उघड आहे कीं, नीतिमत्ता हा पोरखेळ नव्हे. नीतिमत्तेची अत्युच्च पदवी प्राप्त करणें ह्मणजे महा दुर्घट व ह्मणूनच मानवी उन्नतावस्थेची परमावधी होय. लार्ड बायरनला कवि होणें सोपें होतें, तें केवळ " मनःपूतं समाचरेत् " अशापैकींच होतें. त्यानें खगराजाप्रमाणें कल्पनारूपी आकाशांत यथेच्छ भ्रमण केलें; परंतु हट्टी व लहरी स्वभावाला ताब्यांत ठेवणें, मनाची भयप्रद अस्वस्थता मोडून टाकणें व त्याचप्रमाणें सज्जन मनुष्यासारखें सुस्वभावानें वागावयाला शिकणें ह्या गोष्टी त्यास फार कठिण होत्या. आणि त्या साध्य करण्याविषयीं त्यानें कधीं यत्न केला होता असें आढळत नाहीं; म्हणून तीव्रबुद्धि व मानसिक औदार्याची थोडीबहुत झांक हे गुण अंगीं असतांही त्याचें जीवित केवळ निर्फळ झालें, व सर्व जगामध्यें उदाहरण घेण्याला धडा होऊन राहिलें आहे. स्वार्थत्यागाचा अभाव असल्यामुळें ज्याची जीवित-नौका खडकावर आदळून सर्व जगाला त्या खडकाची इशारत देत आहे, असा दुसरा गृहस्थ वालटर सावेज लॅन्डर हा होय. हा आंग्लवाग्वधूला विभूषित करण्यामध्यें केवळ अग्रेसर होता. परंतु हा गृहस्थ इतका हट्टी, लहरी व चमत्कारिक स्वभावाचा होता कीं, त्या-

च्याजवळ दूरदृष्टि व भाषासौंदर्य हे गुण असतांही तो जन्मभर वेडापिसा असे. तर या भवसागरांत आपली जीवन-नौका खडकावर आदळूं नये अशी ज्याची इच्छा असेल त्यानें एक मुख्य तत्त्व लक्षांत ठेविलें पाहिजे तें हें कीं, " एका गोष्टीची गरज आहे. " ती गरज द्रव्याची नव्हे; शक्तीची नव्हे, हुषारीची नव्हे, कीर्तीची नव्हे, स्वातंत्र्याची नव्हे किंवा आपण ज्याची गरज आहे ह्मणतों त्या आरोग्याचीही नव्हे; तर मनोनिग्रह, इंद्रियांचें केवळ आकलन ह्यांची होय; व यापासूनच तरणोपाय आहे, आणि जर यापासून तरणोपाय होणार नाहीं तर आपला पात व्हावयाचा हें खचित. जर कोणी माझी नैतिकस्थिति सुधारली नाहीं तरी ती कांहीं बिघडणार नाहीं असें ह्मणून स्वस्थ बसेल तर मात्र फसेल. कारण कीं ती निःसंशय बिघडावयाचीच. स्वभावरूपी बगीच्यांतील स्वार्थत्यागवृक्षाला सिंचन करून योग्य जतन न केल्यास त्याची टवटवी नाहींशी होऊन व पानें सुकून तो खचित खुरटून जाईल. तर आपण कंबर बांधूं या, आणि मानवी प्राण्याला योग्य असें आचरण करूं या. ईश्वरकृपेनें आपणांस मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे, तर उदारचरित व शुद्धाचरण करण्याविषयीं प्रयत्न करूं या.

प्रथमतः नीति आणि धर्मबुद्धि यांचा संबंध थोडक्यांत सांगितला पाहिजे, कारण तो बरोबर समजला

जात नाहीं. आंग्ल-तत्ववेत्त्यांपैकीं एका शाखेंतील बेन्थामादि तत्त्ववेत्यांनीं धर्म व नीति ह्यांचा संबंध तोडून नीतीला स्वातंत्र्य देण्याची सुरुवात केली. पण हा प्रयत्न अप्रयोजक आहे एवढेंच नव्हे, तर अशा प्रकारचीं तत्त्वें प्रतिपादन करणाऱ्यांच्या बुद्धीची अप्रगल्भता व मनाचा कोतेपणा यांचा दर्शक आहे. आतां या प्रचंड विश्वाची यांत्रिक रचना केवळ दैववशात् जमणाऱ्या परमाणूंचें एकीकरण आहे असें मानणारा जुन्या काळच्या एपिक्युरससारखा एखादा व्यवहारकुशल मनुष्य जगाच्या दृष्टीनें चांगला ठरेल आणि आचरणानेंही शुद्ध असूं शकेल. हल्लीं देखील नैसर्गिक नियम, अनपवादिक अनुचार, स्वाभाविक सिद्धि, पोषक परिस्थिति व पोपक परिस्थितीचें अतर्क्य संमेलन, अशाच प्रकारचे आणखी कित्येक अर्थरहित शब्द वापरून विश्वरचनेचा उलगडा करणाऱ्या कित्येक तत्त्ववेत्यांसारखीं सद्गुणी माणसें थोडींच सांपडतील. परंतु त्यांचा सद्गुण स्वाभाविक नीतीमुळें प्राप्त झालेला नसतो. मानवी प्राण्याच्या स्वाभाविक बुद्धीला नीतिमत्तेचा हा प्रकार अयोग्य अथवा अमानुष किंवा राक्षसी भासूं लागतो. हा प्रकार ह्मणजे जसा एखादा चांगला प्रजाजन मनोभावानें करभार देतो, योग्य वेळीं सैनिकाची चाकरी बजावितो, प्रसंगीं राजाकरितां शौर्यानें लढतो, पण राजापुढें मान वांकविण्यास नाकारितो, तशांतला

होय. अशा मनुष्यास जरी आपण राजद्रोही किंवा बंडखोर म्हटलें नाहीं तरी त्याजविषयीं थोडासा तिरस्कार उत्पन्न होतो; व आपण त्याला वक्र स्वभावाचा अथवा व्यवहारशून्य म्हणतों. निरीश्वरवाद्यांची तरी तीच स्थिति आहे. मग ते काल्पनिक निरीश्वरवादी असोत अथवा व्यावहारिक असोत. ते तर बहुतेक वक्र स्वभावाचे व नासक्या मेंदूचे होत. ते तर आपल्या मानेला फांस लावण्याकरितां सुंदर रेशमी दोर तयार करितात कीं काय असें म्हणावें लागतें. हे केवळ ईश्वरप्रेरणेला पराङ्मुख अशीं चालतीं बोलतीं यंत्रें होत. ह्यांच्या डोक्यांतील मेंदू कुजून निर्वीर्य झालेला असतो. हे आपल्या अल्पज्ञानाच्या नेहमीं घमेंडींत असतात; ह्यांना जें कांहीं दिसेल किंवा वाटेल किंवा ज्याचा ते स्वतः शोध लावतील त्यापलीकडे सर्व अंधःकार आहे अशी त्यांची दृढ समजूत असते; परंतु त्यांची ज्ञानदृष्टि, त्यांचें विचाररूपी सूक्ष्मदर्शक यंत्र, व त्यांचें निरीक्षण या सर्वांच्या आटोक्याबाहेर अशी एक वस्तु आहे कीं जिचा उलगडा बिलकुल होत नाहीं; ती कोणती ह्मणाल तर जीव; आणि जीव ह्मणजे शक्ति देणारी बुद्धि; आणि शक्ति देणारी बुद्धि ह्मणजे शब्दपर्यायानें ईश्वर होय. ही मुख्य गोष्ट विसरणें ह्मणजे जेम्स वाटच्या बुद्धीशिवाय बाष्पयंत्राची कल्पना करणें होय. अथवा एखाद्या शहराला पुरवठा करणाऱ्या जळाचा

मार्ग शोधून काढणें असल्यास ज्या नदीपासून अथवा सरोवरापासून त्याची उत्पत्ति आहे ती नदी अथवा तें सरोवर हीं विसरण्याप्रमाणें होय; अथवा प्रधान गोष्ट विसरून अंगभूत गोष्टीचें अवलंबन करण्याप्रमाणें होय. याकरितां ह्या काळच्या व्यवहार आणि नीति ह्यांची कशी तरी सांगड घालणाऱ्या प्रगतीच्या नीति-तत्त्वांवर कोणीही समाधान मानूं नये. उदार नीतीचा उगम नैतिक प्रेरणेंत आहे, आणि त्या उगमाचा पोषक परमेश्वर आहे.

नरदेहरूपी ईश्वरी देणगीचें यथायोग्य सार्थक करूं इच्छिणाऱ्या मानवी प्राण्यास त्याच्या महत्त्वाकांक्षेचे जे हेतु होऊन राहिले आहेत अशा सद्गुणांपैकीं कित्येकांविषयीं आपण विवेचन करूं या. या संसाररणांत जयापजयाची संधि वेळोवेळीं येत असते असें नाहीं. ती विवक्षित वेळींच येते. फुलांना बहर मुख्यत्वेंकरून वसंत ऋतूंतच येतो. त्याचप्रमाणें कित्येक सद्गुणांचा उद्भव तारुण्यांतच झाला पाहिजे, व जर तो तारुण्यांत झाला नाहीं तर उतार वयांत त्याला कधींही बहर यावयाचा नाहीं.

प्रथमारंभीं, वर नमूद केलेल्या सद्गुणांच्या शिरोभागीं वास्तव्य करणारा असा जो आज्ञाधारकपणा त्यासंबंधें विचार करूं. हल्लींच्या काळीं स्वातंत्र्याविषयीं बराच ऊहापोह होत असतो; आणि खरोखर स्वातंत्र्य

ही अमोलिक चीज आहे; व सर्व प्राण्यांना तिची आवड आहे. पण स्वातंत्र्य ह्मणजे काय हें समजणें अत्यंत आवश्यक आहे. कोणताही प्राणी आपल्या स्वाभाविक शक्तीचा उपयोग करीत असतां एखादा स्वैर अथवा दुःखद अडथळा न येणें याचें नांव स्वातंत्र्य. अशा प्रकारचें स्वातंत्र्य उत्कृष्ट तर खरेंच, परंतु तेवढ्यानेंच मनुष्याच्या इतिकर्तव्यतेपैकीं कांहीं विशेष गोष्ट झाली असें नाहीं. स्वातंत्र्य केवळ संसारचक्राच्या आरंभबिंदूचें दर्शक आहे. तें संसाररूपी रंगभूमी मात्र तयार करतें; परंतु मनुष्यानें तेथें कोणती भूमिका घ्यावी अथवा तिची कशी बतावणी करावी याविषयीं कांहींच सांगत नाहीं. एकदां आपण या रंगभूमीवर प्राप्त झालों ह्मणजे मात्र सर्व गोष्टी मर्यादित असतात. शास्त्रें ह्या तिच्या मर्यादा होत. आणि प्रत्येक मनुष्याचा आयुष्यक्रम सुरळीत चालावा हा शास्त्रांचा मुख्य उद्देश आहे. जीं शास्त्रें अथवा कायदे मनुष्यांना पाळावे लागतात ते त्यांनीं स्वतः स्वसंतोषानें केलेले नसून समाजाच्या बऱ्याकरितां त्यांजवर लादलेले असतात. तर जो कोणी एखाद्या समाजसंस्थेचा संस्थक ( member ) होणार आहे, त्यानें आज्ञा पाळणें ह्मणजे काय हें प्रथम शिकलें पाहिजे. आज्ञा पाळणें हें तत्त्व सर्व ठिकाणीं सारखेंच आढळून येतें. कायदा, सेनाखातें, धर्मखातें, राजकारस्थान, फार काय, मानवी

कृतीची प्रत्येक शाखा हीं केवळ या तत्वाचीं मूर्तिमंत उदाहरणें होत. मनुष्याच्या खासगी व्यवहारांत त्याला स्वातंत्र्य आहेच. त्यांत त्याला स्वातंत्र्य न देणें ह्मणजे त्याला केवळ यंत्र बनवणें व त्याचें मनुष्यत्व नाहींसें करणें होय; पण जर तो सामाजिक या नात्यानें वागतो आहे तर समाजाचें ऐक्य राखण्याच्या बंधांपासून त्याला मुक्त रहातां येणार नाहीं. जरी कोणी धर्मगुरु, न्यायाधीश, सेनापति अशासारख्या उच्च पदवीला पोंचला असला तरी देखील त्या उच्च पदवीला पोंचल्यामुळेंच त्याला त्या बंधनाचा केवळ गुलाम व्हावें लागतें. शरीरव्याधी, मग ती डोक्याला काय किंवा पायाला काय, सारखीच; तसेंच सामाजिकाच्या नात्यानें समाजनायक व दुसरा एखादा क्षुद्र मनुष्य सारखेच. प्रत्येक अवयवानें आस्थेनें आपलें काम करणें हेंच त्याचें कर्तव्य आणि त्यांतच त्याचें संरक्षण आहे. याकरितां प्रत्येकानें आपलें सामाजिक कर्तव्य विसरतां कामा नये. सेंटपालनें हें तत्व गंभीर व जोरदार रीतीनें जगापुढें मांडिलें आहे. दरवाजाची बारीक फट तशीच रुंदावूं दिली तर कालांतरानें त्याचें मोठें थोरलें भगदाड बनतें हें लक्षांत ठेवा. प्रसिद्ध रोमन इतिहासकार (टासिटस) यानें असें ह्मटलें आहे कीं, प्रसिद्ध विजयी पुरुषाच्या (जूलिअस सीझरच्या) चरित्रांतील ध्यानांत ठेवण्यालायक गोष्ट ही आहे कीं, तो आज्ञा पाळ-

णें व आज्ञा करणें ह्या दोन्ही गोष्ट सारख्याच जाणत असे. आज्ञा पाळणें व आज्ञा करणें ह्या गोष्टी परस्पर विरुद्ध खऱ्या, पण पहिली ही दुसरीची शाळा आहे. पहिली समजल्याखेरीज दुसरी समजण्याला मनुष्य लायक होत नाहीं. ज्याला नेहमीं आज्ञा करण्याचीच सवय आहे, त्याला अधिकाराचा फायदेशीर उपयोग होण्याला तो कोठपर्यंत चालविला पाहिजे व तो कोणत्या गोष्टींनीं मर्यादित आहे हें बिलकुल कळत नसतें. याकरितां आज्ञा पाळणें ही पायरी चढल्याशिवाय आज्ञा करणें या पायरीवर जातां कामा नये. पूर्वी रोमन लोक अधिकाराला जितका मान देत असत तितका मान तरुणांनीं ह्या काळीं देणें हा सद्गुण समजला जाईल; व हा असा तसा नसून मोठा उमदा व अल्पवयास शोभादायक सद्गुण आहे. वरिष्ठांकडून झालेली आज्ञा केवळ वरिष्ठाची आज्ञा म्हणून पाळिली पाहिजे, व योग्य वेळीं आस्थेनें बजावली पाहिजे. प्रत्येक कामांत आस्था, व्यवस्थितपणा व वेळेची किंमत जाणणें ह्यासारखी तरुण मनुष्यांस दुसरी शिफारस नाहीं; आणि यांत कांहीं आश्चर्य नाहीं. कारण जर प्रत्येक मनुष्य आपलें काम योग्य वेळीं व्यवस्थित रीतीनें करील तर समाजचक्र सुखासमाधानानें सुरळीत चालेल. आतां कोणी असें ह्मणेल कीं, समाजांतील कोणतीही अव्यवस्था जे विशेष बुद्धिमान आहेत त्यांना आपल्या चातुर्यानें

मोडतां येणार नाहीं काय? तर प्रत्येकानें एवढें लक्षांत ठेवावें कीं, अवज्ञेमुळें होणाऱ्या नुकसानीची भर बुद्धिवैभव व हुषारी कधींही करूं शकत नाहीं. घड्याळाचीं यंत्रें सुरळीत चालतील तरच वेळ बरोबर समजणार आहे; आणि तीं अधेंमधें चालूं लागतील तर किती वेळ झाला हें कोणालाच सांगतां यावयाचें नाहीं. तुमचेवर सोंपविलेल्या कामावर जर दुसऱ्याचें काम अवलंबून आहे, तर तुमचें काम योग्य वेळीं झालें तरच त्याला त्याचें काम योग्य वेळीं करितां येईल; कारण त्याला तुमचेवर अवलंबून राहिलें पाहिजे. यासाठीं आपलें काम वेळचेवेळीं करीत जा. कोणत्याही समाजांतील मनुष्याचें अत्युत्तम शिफारसपत्र ह्मणजे हें होय कीं " हा मनुष्य जें करावयाचें तें योग्य वेळीं करतो व ज्या वेळीं हजर व्हावयाचें त्या वेळीं हजर असतो. "

तरुण मनुष्याला आवश्यक असा दुसरा सद्गुण खरेपणा होय. ग्रीस देशांतील महान् तत्त्ववेत्ता प्लेटो यानें असें म्हटलें आहे कीं, देव आणि मनुष्य यांना खोटेपणाचा स्वाभाविक तिरस्कार आहे; व माझेंही मत तसेंच आहे. लहान मुलें स्वभावतः खरेंच बोलतात. पण भीति, पोकळ गर्व, स्वतःच्या लाभास अनिष्टकारक अशी गोष्ट व अशा प्रकारच्या आणखी कित्येक गोष्टींचा मनावर संस्कार झाल्यामुळें खरेपणाची स्वाभा-

विक बुद्धि नष्ट होऊन तीं मुलें पुढें दुर्गुणी व निरुपयोगी अशीं माणसें बनतात. जॉन स्टुअर्ट मिल हा इंग्लंडांतील व्यापारी लोकांविषयीं असें म्हणतो कीं, ह्यांचा बहुतेक व्यवहार खोटेपणाचा असतो; तरी पण सर्व यूरोपखंडांत आपल्या नीच कृतीबद्दल जर कोणास वाईट वाटत असेल तर ते व्यापारी लोकच होत. व्यवहारांत शिरण्यापूर्वी प्रत्येक तरुण मनुष्याचे मनांत असें बिंबलें पाहिजे कीं जगांत सत्यालाच किंमत आहे; नुसता भपका सत्याबरोबर टिकाव धरूं शकत नाहीं. लोकांशीं व्यवहार करतांना प्रत्येकानें आपण आहों त्यापेक्षां अधिक दाखविण्यापेक्षां, दिसतों त्यापेक्षां अधिक होण्याची काळजी घ्यावी. जो वास्तविक दरिद्री असून श्रीमंतीचा डौल घालतो तो खोटेपणाचें आचरण करितो. आतां खोटेपणा त्याला एखादे वेळीं फायदेशीर होईल; परंतु मुलामा केलेल्या भांड्याप्रमाणें त्याचें खरें स्वरूप लौकरच बाहेर पडतें. जगाच्या घडामोडींत मुलामा शुद्ध धातूबरोबर कधींही टिकाव धरूं शकणार नाहीं हें पक्कें लक्षांत ठेवा. हा व्यावहारिक खोटेपणा अंगीं येण्याचें मुख्य कारण व्यापारी लोकांना द्रव्याचा लोभ. पण तरुण लोकांना—ज्यांच्याकरितां आह्मी मुख्यत्वेंकरून लिहीत आहों—आळस, पोकळ गर्व अथवा भ्याडपणा हें होय. तर या तीन गोष्टी आपणांत न येतील अशाविषयीं प्रत्येकानें काळजी घेतली पाहिजे.

आळशी मनुष्य योग्य वेळीं कोणतीही गोष्ट तयार करीत नाहीं आणि गरज लागली कीं भलतीच पुढें करितो. ह्याप्रमाणेंच शाळेंतील एखादा विद्यार्थी कवितेचा अर्थ सांगूं लागला कीं हळूच टिपांकडे पाहून अर्थ सांगतो. शिक्षकाला विद्यार्थ्याच्या डोक्यांत काय आहे हें पाहिजे असतें आणि तुह्मी पुस्तकांत काय आहे तें सांगतां, तर हा निव्वळ खोटेपणा नव्हे काय ? सर्व दिखाऊ, वरकांती व तांत्रिक काम खोटेपणा होय; आणि त्याची प्रत्येकास लाज वाटली पाहिजे. पोकळ गर्व हा खोटपणाचा आणखी एक प्रकार आहे. लोकांमध्यें अधिक चांगला दिसण्याच्या इच्छेनें तरुण मुलें ज्ञान व अनुभव नसल्यामुळें वास्तविक कळत आहे त्यापेक्षां आपणांस पुष्कळ अधिक कळतें असा आव घालितात व आपल्या ज्ञानलवाला बहुश्रुतपणाचा पोषाख चढवून आपणाविषयीं नसता मोठेपणा उत्पन्न करितात; हा देखील खोटेपणाच होय. प्रत्येक मनुष्यानें आपलें अज्ञान कबूल करण्यास कधींही विलंब करूं नये. ह्यापासून अंतीं त्याचा फायदा होतो. आपलें अज्ञान कोणत्याही मिषानें एकदां छपविण्याची सवय लागली कीं, पुढें तें स्वतःलाही कळत नाहींसें होतें व सर्व आयुष्य सत्यापलापांत जातें. तारुण्यांत गर्व होणें स्वाभाविक आहे; परंतु त्याचा तोरा पुढें मागें उतरतोच; कारण समाजांतील कोणत्याही मनुष्याचा फाजील तोरा

उतरण्याविषयीं समाजाचें एकमत असतें. पण गर्वापेक्षां धैर्याच्या अभावामुळें ( भ्याडपणामुळें ) तरुणास फटफजिती होण्याची फार धास्ती वाटते. परंतु त्याला असें समजत नाहीं कीं, एक वेळ थोडाबहुत भ्याडपणा पत्करेल. आणि आयुष्यक्रमांत प्रथमतः आपल्याला जें काय वाटतें तें बोलून दाखविण्यास ज्यांना भीति वाटते, ते पुढें पुढें जें बोलून दाखविण्याची त्यांना भीति वाटत असते, त्याचा विचारच करीतनासे होतात. आतां नैतिक धैर्य ( जसें मनांत वाटतें तसें जगांत सांगणें व वागणें ) हा अमोलिक गुण खराच; आणि तो समाजांत फारच थोड्यांच्या अंगीं आढळतो. कारण समाजांतील सर्वमान्य चालीरीति, समाजपद्धति, त्याचप्रमाणें सूक्ष्म परंतु दृढ अशीं प्रेमबंधनें, ह्यांच्या अस्तित्वामुळें नैतिक धैर्याला हवा तसा अवकाश मिळत नाहीं. अशा वेळीं चातुर्य व दृढनिश्चय हे दोन्ही गुण असतील तर नैतिक धैर्य दाखवितां येईल. पण ते प्रत्येकाजवळ असतातच असें नाहीं. आतां सदोदित जेवढें ठाऊक आहे तेवढें सर्व खरें सांगणें योग्य होणार नाहीं. जेव्हां समाजाचा फायदा, समाजपद्धति अथवा समाजाचा उद्देश ह्यांना खरेपणा विघातक असेल तेव्हां त्याच्यासारखी घातुक गोष्ट कोणतीच नाहीं. “ दुष्टाशीं दुष्ट व सुष्टाशीं सुष्ट ” हें तत्त्व नेहमीं लागू करावें. वरिष्ठाचा अपमान होण्याची भीति असतांही सत्याचें अवलंबन करण्याच्या कि-

त्येक वेळा आहेत. अशा एखाद्या वेळीं जर कोणी खरें न बोलेल तर तो निव्वळ भ्याड होय; व नऊ हजार नऊशें नव्याण्णव लोक आपल्यासारखे आहेत ह्मणून भ्याडपणाचा दोष कमी होतो असें समजून त्यांत आनंद मानणें इष्ट नाहीं.

"आळशी होऊं नका" यापेक्षां तरुण मुलांस दुसरा चांगला उपदेश असेल असें मला वाटत नाहीं. हा उपदेश निषेधवाचक ह्मणजे 'अमुक करा' असें सांगत नाहीं हें खरें. तरी वाईट तेवढ्याचाच निषेध केल्यानें शेवटीं चांगल्या गोष्टींचाच मनांत प्रवेश होतो. मनुष्यानें एखादी गोष्ट अमुक प्रकारची असेल तरच मी करीन, अशा प्रकारच्या कडक नियमांनीं आपला व्यवहार मर्यादित करूं नये; कारण हा प्रकार मनाच्या लघुत्वाचें दर्शक आहे; व यापासून मनाचा अधिक संकोच मात्र होतो. पण वेळेचा काटकसरीनें उपयोग करावयास शिकणें अत्यंत महत्वाचें आहे, आणि हें शिक्षण व्यवस्थितपणा व बातबेत यांनीं साध्य होण्यासारखें आहे. जो अमुक कामाला अमुक वेळ खर्च करावयाचा म्हणून ठरवून ठेवितो, तो बहुतकरून चुकत नाहीं. आतां कोणत्याही कामाला किती वेळ खर्च करावयाचा हें कामाच्या योग्यतेवर आहे. पण साधारणपणें एक काम संपेपर्यंत एकसारखें न करितां त्याचा कांहीं भाग दररोज करीत जावें. दररोज एक तास

याप्रमाणें कोणतेंही काम करीत गेलें तरी रुजत घातलेल्या बीप्रमाणें वर्षाअंतीं त्याचा प्रचण्ड वृक्ष बनेल. हें कर, तें सोड, अशा प्रकारची धांवपळ करणें म्हणजे व्यवस्थितपणावांचून पांचपंचवीस कामें हातीं घेणें व मुळींच काम न करणें, हीं बहुतेक सारखींच. आळशी मनुष्य चोराला दार उघडणाऱ्या पहारेकऱ्याप्रमाणें आहे. याला उपाय " मला मूर्खपणा करण्याला वेळ नाहीं, मला शुष्कवाद करण्याचें प्रयोजन नाहीं, मला एकाच गोष्टीचें चर्वितचर्वण करण्याचें प्रयोजन नाहीं, " असें प्रत्येकास वाटणें हा होय. कार्य-वैचित्र्यामुळें मनुष्याला सुखप्राप्ति होते. एक काम संपल्यानंतर थोडीशी विश्रांति घेऊन नंतर दुसऱ्या कामास लागा. आळस नाहींसा होण्याला जगांत माझ्यावर मोठें थोरलें जोखीम आहे असें प्रत्येकाचे मनांत बिंबलें पाहिजे. जगाविषयीं कोणाच्या कशाही कल्पना असोत, तरी पण जग हें केवळ चेष्टा करण्याची जागा नव्हे हें खचित. सभोंवार जिकडे तिकडे उद्योग चालू असतां आपण निरुद्योगी राहणें ह्मणजे आपला नाश करून घेणें होय. " जीवित क्षणभंगुर आहे. कला दीर्घ काल राहणारी आहे. काळ कधींही विश्रांति घेत नाहीं. अनुभव नेहमीं सारखा येत नाहीं. ज्ञानप्राप्ति होणें दूरापस्त आहे." हीं दूरदर्शी हिपोक्रेटचीं वाक्यें आहेत. हीं वाक्यें इ. सनापूर्वी पांचशें वर्षांपासून एका रुग्णाल-

याच्या प्रवेशद्वारावर खोदलेलीं आहेत व तीं अजून देखील एखाद्यास व्यवहारांत उपयोगीं पडण्यासारखीं आहेत.

एखादें सत्कृत्य करणें झाल्यास तें झटून केलें जात नाहीं याचें कारण मनाचा कोतेपणा होय. सत्कृत्य कां असेना, तें मला आवडत नाहीं ह्मणून मी त्याला मदत करणार नाहीं, असें कांहीं मनुष्यांचें मत असतें. बरेच लोक निव्वळ डबक्यांतील बेडकाप्रमाणें असतात. त्यांना त्यांचें घर, त्यांचें कुटुंब, त्यांचा धंदा, फार तर त्यांचा गांव, यापलीकडे ते कधींही जात नाहींत व त्यांना जाण्याची इच्छाही नसते. अशा लोकांच्या क्षुद्र व कोत्या विचारांकडे पाहिलें ह्मणजे समाजाची उन्नति होण्याला कोणत्या कोणत्या गोष्टींची गरज आहे हें समजतें. प्रसिद्ध कवि व तत्ववेत्ता गोथ हा जरी मरणसमयीं ऐशीं वर्षांचा होता तरी त्याचे शेवटचे उद्गार "अधिक प्रकाश" (ज्ञान) हे होते. प्रत्येक तरुण मनुष्यानें आपलें मन एखाद्या धंद्यांत पडल्यामुळें कोतें होऊं देऊं नये व "अधिक प्रकाश" (ज्ञान) हे शब्द नेहमीं लक्षांत बाळगावे. पुष्कळ लोक बुद्धिमान असतात, परंतु बुद्धीचा सदुपयोग कसा करावा हें त्यांना ठाऊक नसतें. चांगला योद्धा आहे, पण युद्धाचा प्रसंगच येत नाहीं अथवा आल्यास आपल्या देशाविरुद्ध लढतो, तर त्याचा काय उपयोग? अशा लो-

कांना समंजसपणा पाहिजे, आणि ही चीज अंगीं वसत असेल तरच त्यांच्या गुणाची किंमत होते. प्रसिद्ध धर्मोपदेशक यानें असा उपदेश केला आहे कीं, " दुःखी दिसेल त्याबरोबर दुःखी व्हा व आनंदी दिसेल त्याबरोबर आनंद करा. " या उपदेशाप्रमाणें आपण चालूं लागलों तर प्रत्येकजण आपणाविषयीं कळकळ व आस्था बाळगील. प्रत्येकाला कवित्वशक्ति येणार नाहीं हें खरें; परंतु कवितेचा आस्वाद घेण्यापुरतें सामर्थ्य अंगीं आणतां येईल. कदाचित् उपदेश करितां येणार नाहीं, पण उपदेशाप्रमाणें वागतां येईल. ह्यांतच स्वतःचें व समाजाचें हित आहे. कवि चांगल्यावाईटाच्या मिश्रणांतून हंसक्षीरन्यायानें चांगल्या व सुंदर वस्तूंचीच निवड करितात. त्याप्रमाणें तरुण मनुष्याला सद्गुणाची निवड केली पाहिजे. तरुण मनुष्यानें कूपमंडुकाप्रमाणें एखाद्या मायाजालांतून दुसऱ्याविषयीं अकारण द्वेष प्रगट न होईल याविषयीं सावध रहावें. दुर्गुणाचा द्वेष करणें वाईट नाहीं; परंतु द्वेष मुळींच न करणें सर्वांत उत्तम. चांगला मनुष्य जितकें होईल तितकें करून आपणांतील शत्रुभाव नाहींसा करण्याविषयीं प्रयत्न करितो व आपल्या शत्रूचे देखील गुण घेण्यास मागें पुढें पाहत नाहीं. तुह्मी इतर समाज अथवा पक्ष यांची टवाळी करण्यांत आनंद मानूं नका. अशा प्रकारच्या टवाळींत मोठेपणा भासतो खरा, पण वास्त-

विक तो पोरकटपणा होय. कोणताही मनुष्य जगाच्या दृष्टीनें मूर्ख ठरला, अथवा एखाद्या तिरस्कृत पक्षाला त्याचें पाठबळ असलें, एवढ्यावरून त्याजविषयींची पूज्यबुद्धि नष्ट होऊं देऊं नका. सर्व जग त्याची निंदा करीत आहे,—सत्पुरुषांनाही असे प्रसंग आलेले आहेत. ( तुकाराम, रामदास, ज्ञानेश्वर, साक्रेटिस, यांना देखील आरंभीं जननिंदा सोसावी लागली)— म्हणून तर तो तुमच्या गौरवास अधिक पात्र असला पाहिजे. "मनुष्यप्राण्यास मान द्या" हें ख्रिस्ती धर्मपुस्तकांतील पवित्र व सुंदर वाक्यांपैकीं एक आहे. परंतु प्रत्येकाला जाणल्याशिवाय त्याला मान देणें तुमचे हातून होणार नाहीं. आणि जर तुह्मीं दुसऱ्याचे डोळ्यांनीं पहाल तर तुह्मांला कोणत्या मनुष्यांत कोणता गुण आहे हें जाणतां यावयाचें नाहीं. हें जाणणें याचें नांव **तत्त्वज्ञान** आणि तीच मनुष्यप्राण्याची अमोलिक संपत्ति. ही संपत्ति एकदां प्राप्त झाली कीं, सत्यानें वागून मनुष्यमात्रावर प्रेम ठेवितां येईल व "बोले तैसा चाले" यासारख्या शब्दाप्रमाणें तुमची कृति होईल.

हल्लींच्या काळीं कोणाचाही उपहास करणें हेंच ज्यांचें ब्रीद बनलेलें असतें असे कांहीं तरुण बांड आढळतात. हा केवळ तारुण्यांतील मद नसून पुढें जाण्यासारखा नसेल व स्वभाव बनून राहील तर अशा

तरुण बांडांना कोणत्याही देशांत कोणीही विचारणार नाहीं. प्लेटोनें असें ह्मटलें आहे कीं " पूज्यबुद्धि व आश्चर्य हीं ज्ञानाची कारणें होत. " जसजसें कोणत्याही गोष्टीचें आश्चर्य अधिक, तसतसें ती जाणण्याविषयीं उत्सुकता अधिक. लहानपणीं आश्चर्य वाटणें हेंच स्वाभाविक आहे. आश्चर्य न वाटणें ही गोष्ट बाह्य दृष्टीला तीव्र बुद्धीशी वाटते, पण वास्तविक ती तीव्र बुद्धि नसून उथळ बुद्धीच्या अंगभूत असणारे मूर्खपणा, बेपर्वा, आत्मश्लाघा व पोकळ डौल यांचें दर्शक आहे. अशा निसर्गविरोधी व खोडसाळ स्वभावाला औषध ह्मटलें ह्मणजे प्रत्येक तरुण मनुष्यानें पूज्यबुद्धि धारण करणें हें होय. हल्लींच्या काळीं प्रजासत्ताक तत्वांची महति वाटत असल्यामुळें या गुणाची चीज नाहीं; तरी हा गुण आत्म्याचें मुख्य जीवित आहे.

आपण केवळ क्षुद्र जंतु आहोंत, आणि मोठें होण्याचा मार्ग म्हटला ह्मणजे विश्वाच्या मोठेपणाची कल्पना करून त्याच्याशीं एकरूप होणें हा होय. सेंट जॉन यानें आपल्या पत्रांतील एका सुंदर लेखांत असें लिहिलें आहे: " आपण ईश्वराचे भाग्यवान पुत्र आहोंत व पुढें काय होईल हें आजच सांगतां येत नाहीं; परंतु जेव्हां तो आपणांस दर्शन देईल तेव्हां आपण तद्रूप बनूं; कारण तेव्हां आपणास त्याचें सत्यस्वरूप कळणार आहे. " सद्गुणी मनुष्याकडे पूज्यबुद्धीनें अव-

लोकन करणें ह्मणजे सद्गुणाप्रत पोंचणें होय; अशा ठिकाणीं सालस मनुष्यास जें कांहीं दिसतें त्याचा तो गौरव करितो. स्टोईक ( सुखाला तुच्छ मानणाऱ्या ) तत्ववेत्त्याचें असें मत आहे कीं, " पहाणें—अनुकरणें—पूज्य मानणें" हा मनुष्याचा परमार्थ आहे. अहा ! किती सुंदर विचार ! किती गोड शब्दांनीं व्यक्त केला आहे ! पण जेथें पहावयाचेंच नाहीं, तेथें पूज्यबुद्धि कोठून ? आणि जर पूज्यबुद्धि नाहीं तर अनुकरण तरी काय म्हणून ? पूज्यबुद्धि उत्पन्न व्हावयाला कोणत्याही गोष्टींत गम्य असून मानसिक औदार्य पाहिजे. परंतु यांत अर्थ नाहीं, त्यांत अर्थ नाहीं, हा मूर्ख आहे, त्याला कळत नाहीं, अशा प्रकारची तिरस्कार करण्याची एकदां सवय लागली कीं ती एका पक्षाला अंध करते आणि दुसऱ्याचा घात घेते.

नीतिशास्त्रांतील कांहीं गोष्टी ईश्वरनिर्मित असतात व कांहीं शिक्षणानें साध्य होणाऱ्या असतात. प्रीति व पूज्यबुद्धि, ज्यांविषयीं आह्मीं वर लिहिलेंच आहे, ह्यांचा ईश्वरप्रेरित गोष्टींत समावेश होतो. पण संयमन, ज्याच्याविषयीं आपणाला बोलावयाचें आहे, ही दुसऱ्या प्रकारची गोष्ट होय; ह्मणजे शिक्षणानें प्राप्त होणारी आहे. या गुणाची तरुणांस वास्तविक योग्यता समजत नाहीं; करितां त्याच्या अभावामुळें त्यांना थोडीबहुत क्षमा केली जाते; पण त्यामुळें त्या गुणाला क-

मीपणा येतो असें मात्र नाहीं. ते, वेळींच ह्मणजे संकट येण्यापूर्वीच जर ह्या गुणाची प्राप्ति करून घेणार नाहींत तर संकटसमयीं त्याची खरी किंमत कळून तो प्राप्त करण्याविषयीं लौकरच उद्युक्त होतील. गरम रक्ताच्या तरुणाला " अति तेथें माती " हा उपदेश अतिशय सोपा व तितकाच बेचव वाटतो; कारण शत्रूच्या तरवारीवर बेधडक तुटून पडणाऱ्या आडदांड तरुणाला जयप्राप्ति होण्यास शौर्याप्रमाणें सावधगिरीही ठेविली पाहिजे हें काय कळे ! जुन्या काळच्या शांत, व्यवहारकुशल, त्याचप्रमाणें मार्मिक, विचारी, ज्याचें मत सर्व गोष्टींत आधार मानिलें जात आहे, अशा आरिस्टाटलाचा मनुष्यप्राण्याला व्यवहारांत अत्यंत उपयोगीं पडणारा नियम हा आहे कीं, सद्गुण अथवा चांगुलपणा हा अत्यल्प व अतिशय या दोन अखेरींचा मध्य होय. ज्यांनीं संसाररूपी रंगभूमीवर नुक्ताच प्रवेश केला आहे—मग ते कितीही हट्टी असोत—त्यांचे मनोविकार कितीही प्रबल होवोत—इंद्रियांचें साम्राज्यही होवो—अथवा कोणत्याही तऱ्हेची मानसिक समता नष्ट होवो—त्यांनीं ह्या नियमाचा खुशाल अवलंब करावा ह्मणजे ते जसजसे प्रौढ होत जातील तसतसा त्यांचा संयम दृढ होत जाईल. अधाशीपणामुळें प्राप्त झालेला दुबळेपणा स्वाभाविक क्रियांचा दुरुपयोग केल्याची साक्ष देतो व त्याबद्दल यथायोग्य शासन मिळतेंच. अ-

धाशीपणा—मग तो कोणत्याही प्रकारचा असो—केवळ आत्मघाताचा आरंभ आहे. अधाशीपणा मानवदेहरूपी इमारतीखालीं वाहणारा प्रवाह असून त्या इमारतीचा पाया समूळ नाहींसा करणारा आहे. अभ्यासासही हीच गोष्ट लागू आहे. पुष्कळ दिवस सतत मानसिक श्रम केल्यानें—मुख्यत्वेंकरून ज्ञानार्जनाचा अप्रयोजक व कृतघ्न प्रकार, ज्याला घोकंपट्टी ह्मणतात, ती केल्यानें—मेंदू निःशक्त होतो, पचनशक्ति मंद होते व सर्व शारीरक्रिया कमजोर व गलित होतात; ह्मणून वेळींच सावध व्हा; राक्षसी कृतीचा परिणाम देखील राक्षसीच होतो; आणि एकदां हें मानवदेहरूपी तारूं खडकावर आदळून भंग झालें कीं, मग तें जरी कितीही कुशलतेनें नीट केलें तरी तें पहिल्याप्रमाणें वादळांत टिकाव धरूं शकणार नाहीं. ज्ञानार्जन चांगलें खरें, परंतु सदोदित केवळ ज्ञानार्जनाच्या पाठीस लागणें चांगलें नव्हे. "फाजील शहाणपणाची हांव कां धरितां व आयुष्य सरण्यापूर्वीं कां मरतां ?" हें कोणाचे शब्द आहेत हें लक्षांत ठेवा.

सर्व यूरोप खंडांत इंग्लंड देश संपत्तिमान आहे. तो इतका कीं, सिडने स्मिथ शहाणा व समंजस खरा, पण त्यानें देखील " इंग्लंड देशांत गरिबी केवळ गुन्हा आहे " असे उद्गार काढले. यावरून तात्पर्य काय कीं, मनुष्यानें बाह्य वैभवाला न भुलतां व्यवहारांत शि-

रण्यापूर्वीं नीतिशास्त्रांतील आद्यतत्व मनांत पक्कें बिंबविलें पाहिजे; तें हें कीं, मनुष्यमात्राचें खरें वैभव त्याच्याजवळच्या गोष्टींत नसून त्याच्या अंगच्या गोष्टींत आहे. "स्वर्गसुख आपणापाशींच आहे, अन्य ठिकाणीं नाहीं;" याकरितां परराष्ट्राच्या व्यापाराच्या घडामोडीमुळें आपलें नीतिमत्तारूपी वातावरण कलुषित होऊं देऊं नका. या घडामोडीमुळें मनुष्याची योग्यता त्याच्या अंगच्या गुणावर न करितां बाह्य भपक्यावर करण्याची साहाजिक सवय लागते. उच्च प्रदेशावर असणारा खुजा मनुष्य देखील उंच दिसतो; पण तो केवळ त्याच्या उच्च स्थितीचा फायदा होय. जो केवळ द्रव्यवान आहे त्याची हीच स्थिति आहे. त्याला लोकांमध्यें एका प्रकारचें वजन प्राप्त झाल्या कारणानें आपल्या नांवाला रावसाहेब अथवा रावबहादूर अथवा अशा प्रकारची दुसरी पदवी तो लटकावूं शकेल. पण त्याला त्याच्या परिस्थितीच्या बाहेर काढा आणि त्याकडे निरपेक्ष दृष्टीनें अवलोकन करा, म्हणजे तुम्हांला असें वाटेल कीं बरोबरी करण्याला हा फारच क्षुद्र प्राणी आहे. तर हें पक्कें लक्षांत ठसवा कीं केवळ संपत्तीवर मोठेपणा मिळविणाऱ्या संपत्तिवानासारख्या तिरस्कार्य वस्तु जगांत थोड्याच सांपडतील. तो बाह्य वैभवाला मान देतो एवढ्यावरूनच तो खऱ्या वैभवाला आंचवतो व मानवी योग्यतेची कसोटी चुकतो.

हरतऱ्हांनीं पैसा मिळवा, पण तो इतक्यापुरताच कीं, साधारण मध्यम स्थितींतील लोकांप्रमाणें संसार चालून अल्पस्वल्प संकट आल्यास दोन पैसे दुसऱ्यापाशीं मागण्याचा प्रसंग न यावा; पण पैसा ! पैसा ! पैसा ! असें पैसा मिळविण्याचें वेड लावून घेऊं नका. अर्थसंचय नरजन्माचें सार्थक नव्हे. याविषयीं साक्रेटिस, प्लेटो, आरिस्टाटल वगैरे सर्व तत्त्ववेत्त्यांचें एकमत आहे. ज्याला पैशाची महती वाटते तो स्वतःला हीन समजतो. बुद्धिवैभवादि भूपणांनीं प्राप्त होणाऱ्या नीतिमंदिरांतील उच्च स्थानापासून कधींही ढळूं नका; ह्मणजे कालान्तरानें जेव्हां खऱ्या परीक्षेची वेळ येईल तेव्हां एखादा जहागिरदार अथवा नवकोट नारायण तुमचेपुढें तोरा मिरवूं शकणार नाहीं.

सद्गुणराशींतील प्रत्येक रत्नाची पारख करण्याचा माझा हेतु नाहीं. त्याकरितां तुह्मांला आरिस्टाटलाकडे जावें लागेल. परंतु नीतिमंदिराला विशेष शोभा देणाऱ्या एका सद्गुणाचा आपणाला विचार करावयाचा आहे; तो नीतिमंदिरांत द्वारपाळ होऊन राहिला असल्यामुळें त्याजला वगळतां येत नाहीं; तो कोणता ह्मणाल तर निष्ठा. कोणत्याही मनुष्यास एखादें काम करणें असल्यास त्याला जर त्या कामाची पिच्छा पुरवितां येणार नाहीं, ह्मणजे त्याच्याजवळ निश्चय नसेल, तर त्याचे सद्गुण व्यर्थ होतात. आंग्ल कवि वर्डस्वर्थ

सहल करावयाला निघाला असतां आकाश अभ्राच्छादित झालेलें पाहून मुद्दाम डोंगरावर जाण्याचा त्यानें विचार केला; आणि याचें कारण त्यानें असें दिलें आहे कीं थोडासा पाऊस जरी पडला तरी फार तर शारीरिक पीडा करील, परंतु अल्पशी अडचण आली कीं आपला बेत एकदम सोडून द्यावयाचा ही गोष्ट स्वभावाला घातक होते. अल्पशा अडथळ्यानें धीर खचून जावा अशा प्रकारचें जीवित कंठण्याचें हें जग नव्हे; कोणत्याही कामांत अडचणी येणारच. त्यांच्यांशीं झुंजणें ह्मणजे खरें जीवित आणि त्यांतून पार पडणें हीच जीविताची सफलता. विघ्नभयामुळें कोणत्याही कामाचा आरंभ करण्यास डगमगूं नका. कोणत्याही गोष्टीचा प्रारंभच कठिण असतो. एका संस्कृत कवीनें म्हटलें आहे:—

प्रारभ्यते न खलु विघ्नभयेन नीचैः ॥
प्रारभ्य विघ्नविहिता विरमन्ति मध्याः ॥
विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः ॥
प्रारभ्य चोत्तमगुणा न परित्यजन्ति ॥ १ ॥

**अर्थ**—हलक्या प्रतीचे लोक विघ्नभयामुळें कोणत्याही कामांत हात घालीत नाहींत; मध्यम प्रतीचे लोक आरंभ करितात परंतु विघ्नें येऊं लागलीं कीं, तें काम मध्येंच टाकितात; परंतु उत्तम प्रतीचे जे असतात ते कितीही विघ्नें आलीं तरी आरंभलेलें कृत्य पुरें केल्यावांचून कधींही थांबावयाचे नाहींत.

जसें कृत्य महत्वाचें असेल तशा अडचणीही महत्वाच्या उद्भवतात. ह्याकरितां महत्कृत्यें करण्यांतच थोरवी

आहे; आणि जे दृढनिश्चयी असतात तेच त्यांना हात घालतात. "उत्कट इच्छा हें बळ आहे" अशी इंग्रजींत ह्मण आहे; निश्चय आणि अनुकूल परिस्थिति असली कीं जय हात जोडून उभा राहीलच. पण जरी परिस्थिति अनुकूल नसून निश्चय असेल, तरी देखील जयप्राप्तीला दास व्हावें लागतें. शिवाजीचा इतिहास वाचा ह्मणजे ही गोष्ट तुमच्या चांगली प्रत्ययास येईल. एका लहानशा सरदाराचा पोर तो काय! पण त्यानें अवरंगजेबासारख्या कावेबाज व प्रतापी दिल्लीपतीला जेरीस आणावें ना! दैवावर हवाला ठेवून स्वस्थ बसणाऱ्या लोकांस दैव कधींही साहाय्य करीत नाहीं. "असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी" असें ह्मणून स्वस्थ बसणारा कधींही वर आला नाहीं.

आतां मनुष्याला नीतिमान् कसें होतां येईल याविषयीं कांहीं सुलभ मार्ग सुचवून हा विषय आटपता घरूं.

प्रथमतः तुमच्या मनांत असें पूर्ण वागलें पाहिजे कीं जीविताला शोभा व धन्यता देणारी अशी एक गोष्ट आहे, ती नैतिक शक्ति होय; आणि ही शक्ति केवळ संवयीनें प्राप्त होते. आतां तुह्मांला कदाचित् वाटेल कीं या कामांत शास्त्र, पुराण, इतिहासपुस्तकें यांची बरीच मदत होईल, पण ती केवळ चूक आहे. इतिहासपुराणादि तुह्मांला नीतीला प्रवृत्त करतील,

फार तर मार्गदर्शक स्तंभाप्रमाणें आरंभीं मार्ग चुकूं देणार नाहींत; परंतु यापेक्षां त्यांचा कांहींएक उपयोग नाहीं. मार्गक्रमण करणें तुमच्या पायांचें काम आहे आणि तें त्यांनांच केलें पाहिजे. वाट दाखविण्यास मार्गस्तंभ असेल तर वाईट नाहीं; परंतु त्यावांचून मार्ग क्रमितां येईल तर फार बरें. कारण या संसारयालेंत रानें, वनें, दऱ्या, खोरीं यांतून प्रवास करावा लागतो; आणि अशा ठिकाणीं मार्गस्तंभ आढळतील अशी आशा करणें केवळ मूर्खपणाचें आहे! मार्गस्तंभाच्या आशेवर संसाराटवींतून प्रवास करणारा प्राणी हतभागी होय. आतां आपणास ज्या दिशेला जावयाचें आहे ती दिशा मात्र चुकूं देतां कामा नये. याकरितां कंबरा बांधा आणि हें सर्वमान्य तत्त्व सिद्ध करा, कीं मनुष्य चालतां चालतां चालावयास शिकतो, बोलतां बोलतां बोलावयास शिकतो, खेळतां खेळतां खेळावयास शिकतो, तसेंच उदार कृत्यें करितां करितां उदारप्रकृति होतो, ह्मणजे संवयीनें ह्या गोष्टी प्राप्त होतात. चांगला खेळगडी होण्यास नेहमीं खेळ खेळले पाहिजेत; तसेंच उदारप्रकृति होण्यास हरएक प्रसंगीं उदार कृतीच केली पाहिजे. तुह्मीं जर उदार कृति करण्याचा पहिला प्रसंग टाळाल तर दुसऱ्या प्रसंगीं तुह्मांला थोडीशी भीति वाटूं लागेल, तिसऱ्या प्रसंगीं त्यापेक्षां अधिक भित्रेपणा वाटेल; असें होतां होतां तुह्मी नीचत्व पावा-

ळ. पोंहणारा प्रचंड लाटांशीं झुंजतां झुंजतां पोंहण्यांत तरबेज होतो; तो जर नेहमीं शांत पाण्यांत पोंहण्याची संवय ठेवील, तर पुरामध्यें त्याची हबेलंडी उडेल. पापपुण्याच्या साधारण कल्पना जीवनयात्रा सुखावह करण्यास फारशा उपयोगीं पडतील असें नाहीं. जसें आपण एखादा मार्ग चालतांना एका मैलानंतर एक, असे अनेक मैल मागें टाकितों व त्यामुळें किती चाललों हें कळतें, तसें या आयुष्यक्रमांत दुर्गुणरूपी मैल हळूहळू मागें टाकिले पाहिजेत, आणि असें जर न होईल तर आपलें जीवित निष्फल होय.

ज्याला नीतीपासून भ्रष्ट होण्याची भीति असेल त्यानें दुःखप्रसंगीं सुखाच्या घटकेची आठवण करावी. कारण या कष्टमय व दुःखाच्छादित संसाररूपी वातावरणांत नेहमीं उंच भरारी मारावी हें चांगलें; ह्मणजे दुःखरूपी ढगांपासून फारसा त्रास सोसावा लागणार नाहीं. मानवकृतीचें उदात्त चित्र आपल्या डोळ्यांपुढें उभें करा. त्या योगानें अंतःकरण पुनीत होतें. भोळीं माणसें पिशाचबाधा न व्हावी ह्मणून ताईत, दोरे यांचा संग्रह करितात, तद्वत् दुःखरूपी पिशाचापासून बाधा न होण्यास तुह्मी सद्बोधवचनांचा संग्रह करा. अशा प्रकारचीं सद्बोध वचनें कालिदास, सांख्य मुनि, व्यास, वाल्मीकादिकांचे जुन्या ग्रंथांतून व रामदास, तुकारामादिकांचे अर्वाचीन ग्रंथांतून शेंकडोंशें

आढळतात. ह्यांत थोड्या शब्दांत पुष्कळ ज्ञान सांठविलेलें असतें, व त्याचा प्रत्येकास अनुभव येत असल्यामुळें त्याच्या सत्यतेविषयीं अन्य साक्ष नको. तर अशा प्रकारच्या सद्बोध वचनांचा सांठा तरुणपणीं जितका करवेल तितका करावा; कारण पुढें व्यवहारांत त्यांचा निःसंशय मोठा उपयोग होईल. नीतीच्या वचनांचा स्मरणशक्तीमध्यें चांगला संग्रह करून ठेवण्यापेक्षांही उदार आचरण साध्य करून घेण्यास जास्त महत्त्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे, वीर पुरुषांचीं चित्रें नेहमीं आपल्या डोळ्यांपुढें ठेवणें हें होय. स्वतःची चांगली वृत्ति होण्यास व कदाचित् मोठेपणाही मिळविण्यास लहानपणींच शुद्धाचरणाच्या मोठे लोकांच्या चरित्रांची चांगली ओळख करून घेणें यापेक्षां जास्त खातरीचा मार्गच नाहीं म्हटलें तरी चालेल. माझा स्वतःचा अनुभव असा आहे कीं, मोठ्या मनुष्याच्या उदाहरणाचा जो परिणाम होतो, तसा परिणाम कोणत्याही उपदेशपर भाषणापासून होत नाहीं. मोठ्या मनुष्याचें उदाहरण ह्मणजे, ज्या गोष्टींचें आपल्याला नुसतें स्वप्नही पडत नाहीं, त्या गोष्टी आह्मी प्रत्यक्ष आपल्या समोर झालेल्या पाहतों. पुष्कळ नद्यांचे प्रवाह एकवटून जसा जोराचा शब्द होत असतो, त्याप्रमाणें जोरानें तें उदाहरण आह्मांला वारंवार सुचवीत असतें कीं तुम्हींही जाऊन याचप्रमाणें करा. आणि

वास्तविक पाहिलें असतां आमच्या हातून तसें कां होऊं नये? आतां प्रत्येक मनुष्य शौर्यशाली नसतो ही गोष्ट खरी, त्याचप्रमाणें शौर्य दाखविण्याची संधी नेहमीं मिळते असेंही नाहीं, परंतु तीच गोष्ट जरी तुम्हांला करतां आली नाहीं तरी त्याच्यासारखी कांहीं कृति करून दाखवितां येण्यासारखी असते. तुमची रंगभूमि जरी तितकीच मोठी किंवा तेवढी विस्तृत नसली तरी लहान गोष्टींत कां होईना पण तितकेंच पौरुष व सद्गुणाविषयीं आसक्ति तुम्हांस दाखवितां येईल. असेल त्या स्थितींत जें होईल तें करण्याचा मनुष्याचा जर निश्चयच असेल तर जे खरोखर मोठे लोक आहेत त्यांच्या उदाहरणापासून त्यास पुष्कळ फायदा करून घेतां येईल. कोणत्याही मनुष्याच्या कृत्यांचा किती विस्तृत भागावर परिणाम होतो हें पाहून त्यावरून त्याच्या मोठेपणाचा अंदाज करणें हें भ्रममूलक आहे. त्याचप्रमाणें त्या कृत्यांचा स्तुतिपाठ किती जोरानें जगांत होत आहे हें पहाणेंही निरर्थक आहे. ज्या लढाईनें जगांतील राष्ट्रांची उलथापालथ होण्याचा संभव आहे, आणि एकादी लढाई संन्निध आली असतां मोठे मोठे मुत्सद्दी ज्या व्यवहारज्ञानाच्या धोरणावर वागतात, तेंच व्यवहारज्ञान एकाद्या लहान शहरांतील म्युनिसिपालिटीच्या सभासदांस शहराची सुधारणा करण्याकरितां, नवीन कराचा अ-

गर पाणीपट्टीचा विचार करतांना उपयोगांत आणावें लागतें, व तो उपयोगही मुत्सद्यांप्रमाणेंच दूरदर्शित्व आणि शहाणपणा खर्च करून करावयाचा असतो; इतकेंच नव्हे, तर ज्या नैतिक धैर्यासंबंधानें जगांत अगदीं कमी गवगवा होतो, जें नैतिक धैर्य ज्या वर्गाकडे समाजाचें बिलकूल लक्ष नसतें अशा अगदीं गरीब स्थितींतल्या लोकांमध्येंच आढळतें, तेंच नैतिक धैर्य बहुधा वर्णनीय असतें; ह्मणून तारुण्यामध्यें आह्मीं आपल्या कल्पना सर्व कालच्या व सर्वदेशच्या थोर पुरुषांच्या चित्रांनीं भरून टाकल्या पाहिजेत, ह्मणजे चांगल्याचें अनुकरण करण्याची आपल्याला इच्छा उत्पन्न होईल, आणि अशा थोर साक्षीच्या नजरेसमोर नीचपणा करण्याची लाज वाटूं लागेल. खरा धर्म कोणता हें समजण्याची तुह्माला इच्छा असल्यास मतांच्या संबंधानें वाक्पांडित्य करण्याचें काम शैववैष्णवांकडे सोंपवा, आणि तुह्मी भगवद्गीतेसारखें तत्त्वज्ञानाचें पुस्तक घेऊन त्याचे पाठ करा, आणि लक्षपूर्वक मनन करा, ह्मणजे धर्मपंडितांच्या वाक्जालांतून तुमची सुटका झाल्यावांचून कधींही रहाणार नाहीं. गीतेमध्यें भगवंतांनीं अर्जुनाला जो उपदेश केला आहे, त्यावरूनच जगाच्या खऱ्या स्वरूपाचें ज्ञान प्राप्त होणारें आहे. अलीकडे जें धर्मशिक्षण ह्मणून आह्मांला मिळतें तें या कामीं अगदीं

निरर्थक आहे. लहानपणींच मनुष्यामध्यें गांभीर्य व ईश्वराविषयीं भक्ति हीं असतील तरच त्यांपासून पुढें उदार आचरण प्राप्त होईल; अशा वयांतच आमची तरुण मंडळी कोंचावर पडून कादंबरीकारांनीं वेडींवाकडीं काढलेलीं मनुष्यस्वभावाचीं चित्रें मोठ्या समाधानानें वाचतांना जेव्हां मी पहातों, तेव्हां मनुष्यजातीविषयीं तिरस्कारबुद्धि उत्पन्न करणाऱ्या या वाचनापासून वाचणाऱ्यांचा स्वभाव कोणत्या तऱ्हेचा बनणार याचें मला मोठें कोडें पडतें. कादंबऱ्यांपासून कोणत्याही तऱ्हेचें ज्ञान मला कधीं मिळालें नाहीं हें मीं प्रांजलपणें कबूल करतों. त्यांच्यामध्यें उत्तम म्हणून जीं पात्रें घातलेलीं असतात त्यांजबद्दलची गोडी त्यांतील वाईट पात्रांनीं नष्ट होत नाहीं असें मानलें तरी, त्यापासून फारसें समाधान होत नाहीं. ग्रीकभाषेमध्यें प्ल्यूटार्क नांवाच्या ग्रंथकारानें लिहिलेलें चरित्रांचें पुस्तक प्रत्येक मनुष्यानें हातांत धरण्यासारखें आहे. सदर पुस्तकामध्यें निरनिराळ्या तऱ्हेच्या थोरपणाचीं जीं अनेक उदाहरणें आढळतात त्यांवरूनच मनुष्य तरुण असो किंवा मध्य वयांतील असो, त्याजला मनुष्यकर्तृत्व प्राप्त करून घेतलें पाहिजे. या असामान्य प्राचीन ग्रंथकारानें काढलेल्या चित्रसमूहांत खऱ्या मानवी श्रेष्ठपणाबद्दल जी नैसर्गिक भक्ति आणि मानवी व्यंगांबद्दल जी सप्रेम कळकळ दिसते, त्यांच्याशीं तु-

ळना केली असतां बिनचूक लिहिणाऱ्या आमच्या इतिहासकारांचा शिक्षणाचे कामीं फारच थोडा उपयोग आहे. ह्मणून आमच्या तरुण मंडळीनें कादंबऱ्या व नाटकें यांतील मनुष्यांच्या दुष्टपणाचा, मूर्खपणाचा किंवा तऱ्हेवाईकपणाचा अभ्यास करण्याचें सोडून, थोर थोर माणसांच्या चरित्रांमध्यें जें खरें पाणी आणि खरें श्रेष्ठत्व आढळतें तिकडे आपलें मन वळवावें. ग्रीस देशच्या पेरिक्लीससारख्या प्रसिद्ध मुत्सद्यानें थोर मनानें अभद्र भाषण करणाऱ्या मनुष्याला, उजेड घेऊन घरापर्यंत पोंचीव ह्मणून स्वतःच नोकराला सांगणें, जर्मनींतल्या ल्यूथरसारख्या मनुष्यानें, धर्ममतांबद्दल त्याला शिक्षा लावण्याकरितां जमलेल्या राजमंडळापुढें व धर्माधिकाऱ्यांपुढें बिनदिक्कत आनंदानें जाणें, नारायणराव पेशव्यांच्या वधाबद्दल तुह्मांला देहांत प्रायश्चित्त घेतलें पाहिजे असें रामशास्त्र्यासारख्या न्यायाधीशानें रघुनाथरावदादांस तोंडावर सांगणें, ह्या खरोखर घडलेल्या अविस्मरणीय गोष्टी आहेत; आणि तरुण मनुष्यांच्या अंतःकरणांत त्या पूर्णपणें बिंबून राहिल्या पाहिजेत. खरोखर घडलेल्या गोष्टींबद्दल कोणास वाद करितां येत नाहीं; परंतु अत्युत्तम कादंबऱ्या देखील त्यांत एकादा चांगला नीतीचा धडा नसेल तर, पाण्यावरच्या फेंसाप्रमाणें प्रथमदर्शनी सुंदर पण वाऱ्याची जरा झुळूक लागतां क्षणींच लुप्त होऊन जाणाऱ्या असतात.

खरोखर थोर लोकांच्या चरित्रांतील थोरपणाच्या प्रतिकृतीपेक्षांही अशा मनुष्यांच्या प्रत्यक्ष संबंधाचा जर योग जुळून आला तर त्या संबंधापासून फारच चांगला परिणाम घडतो. पुस्तकें उत्तम असलीं तरी मनुष्यस्वभावांतील औदार्य जागृत करण्याचीं तीं केवळ यंत्रें आहेत; शिवाय पुस्तकांचा परिणाम अप्रत्यक्ष असून फार थोडा होतो, त्याप्रमाणें तीं कपाटांत पडून राहून तुम्हांला त्यांचा गंधही न लागण्याचा संभव आहे. परंतु एकाद्या खरोखर थोर पुरुषाची व तुमची जर कधीं गांठ पडली तर विद्युत्प्रवाहाप्रमाणें तुम्हांला ओढून घेतल्याशिवाय तो कधींही राहणार नाहीं; मात्र तसें होण्यास थोरपणा ग्रहण करण्याची तुमच्यामध्यें शक्ति पाहिजे; कारण जे अंध त्यांना कांहींच दिसत नाहीं, त्याचप्रमाणें मृत मनुष्यांस स्पर्शज्ञान नाहीं. आणि कांहीं कांहीं लोक त्यांच्या तऱ्हेनें फार सन्माननीय असतील; परंतु ते प्रत्यक्ष ईश्वरी अवतार झाला तरी देखील हें थोतांड आहे असें म्हणणारे आढळतील. अशा संशयखोर निंदकांपैकीं जर तुम्ही नसाल; चांगल्या स्थितीच्या तरुण मनुष्यामध्यें अवश्य आढळणारी पूज्यबुद्धीनें सद्गुण ग्रहण करण्याची इच्छा आणि सरळ मनोवृत्ति ह्या जर तुमच्यापाशीं असून आयुष्यक्रमण करण्यास तुम्हीं सुरवात केली असेल, तर खरोखर थोर अशा एकाद्या पुरुषाशीं तुमचा संबंध येणें म्हणजे तुमचें मो-

ठेंच भाग्य समजलें पाहिजे. आणि हा संबंध जितका जास्त निकट होईल, तितकें जास्तच श्रेयस्कर. कारण ज्यांची नीति थोर, त्यांच्याच जास्त सहवासापासून जास्त श्रेष्ठपणा नेहमीं नजरेस येतो. केवळ नीच बुद्धीच्या मनुष्याचें असें होत नाहीं. चामर्स किंवा ब्न्सनसारख्या मनुष्याच्या स्पर्शानें मनुष्यजातीविषयीं सप्रेम बुद्धीचें वारें आंगांत शिरणें हें चांगल्या वृत्तीच्या तरुण मनुष्यास, ग्रीक लोकांचें सर्व ज्ञान, जर्मन लोकांची सर्व विद्या, व स्कॉच लोकांचें सर्व शहाणपण यांपेक्षां जास्त मोलाचें आहे. याप्रमाणें खरी जीवनकला तुमच्यामध्यें भरल्यानंतर थट्टेबाज लोक वाटेल तशी निंदा करोत, किंवा दोस्त मंडळी कपाळाला आंठ्या घालोत, परंतु तुमची श्रद्धा कोणावर बसली हें तुम्ही जाणत असतां, तुम्हीं प्रत्यक्ष पाहिलेल्या कृतींवरून श्रद्धा ठेवीत असतां, आणि त्यामुळें तुम्हांस सुखोत्पत्ति होते; कारण खरें नाणें तुम्हांस सांपडलेलें असतें. आतां अशा एकाद्या नीतीच्या पुतळ्याशीं प्रत्यक्ष संबंध येण्याचें भाग्य जरी तुम्हांस लाभलें नाहीं, तरी तुमच्या भोंवतीं कोणत्यारीति स्थितीचीं माणसें असतात हें केवळ दैवावर अवलंबून नाहीं. हलकट लोकांची संगत जरी नेहमीं तुम्हांस टाळतां आली नाहीं तरी आपण होऊन अशा लोकांत मिसळावयाचें नाहीं येवढें तरी तुम्हांस खास करितां येईल. आयुष्यांतील बहुतेक स्थितींत

कोणत्या लोकांशीं आपण सहवास करावयाचा हें तुमचें तुम्हांस ठरवितां येण्यासारखें असतें. ज्याप्रमाणें कांहीं शारीरिक रोग संसर्गजन्य असतात, त्याचप्रमाणें नीतिभ्रष्टता ही आहे; आणि मनुष्य जितका जास्त निर्मळ तितकी जिज्ञासा बळावत जाते. तुकाराम, ज्ञानेश्वरासारख्यांच्या अर्ध्या हिश्शानें जर तुमची पवित्रता असेल तर विश्वयोषितांबरोबर तुम्ही खुशाल हिंडा, तुमची नीति त्यापासून बिघडण्याची भीति नाहीं; परंतु मनुष्यस्वभावाचें दौर्बल्य व तारुण्यामध्यें उत्पन्न होणारा साहजिक मोह यांचा विचार केला असतां, अनीतीच्या माहेरघरांत जे लोक तुम्हाला नेऊन घालतील अशा लोकांची कधींही व कोणत्याही प्रसंगीं संगति करावयाची नाहीं असा तुह्मीं मनाचा दृढनिश्चय करणें सर्वांत उत्तम. अशा ठिकाणीं खिदळण्यापासून जरी तुम्हांला कितीही आनंद किंवा क्षणिक सुख झालें, तरी मनुष्य जातींतील अगदीं पतित अशा लोकांत स्नेहभावानें मिसळण्यापासून तुमच्या स्वतःच्या नीतीचा पाया जो ढांसळेल, तो त्या आनंदानें कधींही भरून निघणार नाहीं. दुर्गुणाकडे सरळ नजर कधींही करितां कामा नये. दुर्गुणी मनुष्याबद्दल आपल्याला दुःख होणें रास्त आहे; परंतु दुर्गुणत्वाचा खेळ करणें घातक आहे. यासंबंधानें बर्न्सची स्थिति काय झाली हें लक्षांत आणा. लोकांना उपदेश कसा करावा हें त्याला चांगलें

अवगत होतें, परंतु त्याचें स्वतःचें आचरण फार भ्रष्ट असे. " मनुष्याइतकें अभिमानी परंतु नीच असें दुसरें कोणी नाहीं " या एका जुन्या ग्रंथकाराच्या भयंकर वचनाची, त्याच्यावरून नेहमीं आठवण होते. या दुर्दैवी कवीचें अनुकरण न करण्याची सावधगिरी ठेवा. त्याच्या स्वभावाच्या उच्छृंखळपणामुळें लोक त्याच्या मूर्खपणाची क्षमा करीत. होतां होईतों तुमच्यापेक्षां जास्त चांगल्या लोकांशींच सहवास करा. दुर्दैवानें तुमच्यापेक्षां हीन स्थितींतील लोकांमध्यें राहण्याचा जर कधीं प्रसंग आला, तर हें पक्कें लक्षांत ठेवा कीं शहाणपणानें व प्रेमळभावानें जर त्यांना तुह्मीं आपल्या बरोबरीला आणिलें नाहीं, तर तुम्हांला आपल्यासारखे केल्याशिवाय ते कधींही सोडणार नाहींत.

एका प्राचीन सुज्ञ कवीनें असें म्हटलें आहे कीं, मनुष्यांनीं पुष्कळ गोष्टी करण्याचा प्रयत्न करावा, परंतु मन मानेल तसें वागणें मात्र बरोबर नाहीं; आणि तसें तुम्हाला वागावयाचें नसेल तर ठरींव वेळीं स्वतःच्या कृत्यांची झडती तुम्हीं स्वतःच घेतली पाहिजे. व्यापारामध्यें प्रत्येक गोष्टीची किंमत होतां होईतों रोख पटविणें, आणि तसें करणें शक्य नसेलच, तर हिशोब लांब न वाढवितां नियमित वेळीं खातेबाकी स्पष्ट रीतीनें ठरविणें, यापासून कर्ज होण्याची भीति कमी होते असें आढळतें. हीच स्थिति आपण ईश्वरापाशीं व आ-

पल्या मनापाशीं जो हिशोब घालावयाचा त्याची आहे. अत्युत्तम नकाशे आणि अगदीं बिनचुक कंपास यांचा उपयोग करण्याची जर आम्हांला संवय नसेल, तर त्यांपासून आमचा कांहींएक फायदा होणार नाहीं. यासंबंधानें पिथॅगोरसाच्या शिष्यांचें आचरण आम्हां सर्वांस अनुकरण करण्यासारखें आहे. प्रत्येक दिवशीं आपण काय काय विशेष कृत्यें केलीं, कोठें कोठें गेलों, आपल्याला अनुरूप असें काय काय घडलें, योग्य रीतीनें काय काय आपले हातून झालें, आणि कोणतें चांगलें कृत्य करण्याची कसूर झाली, या सर्वांचा नीट मनांत विचार केल्याशिवाय कधींही निद्रासुखांत मग्न होऊन जाऊं नका. सर्व गोष्टींचा मनांत ताळा घातल्यानंतर, वाईट कृत्यांबद्दल तुम्हाला दुःख होऊंद्या, आणि चांगल्याचा आनंद माना. परमेश्वरस्वरूप होऊन जाणें ह्मणून साधूलोक ज्याला ह्मणतात, ती वृत्ति कांहीं नियमित मुदतीपर्यंत एकांतवासांत राहिल्याशिवाय, आणि तो एकांतवास आत्मज्ञान व आत्मसुधारणा या महत्त्वाच्या कामीं खर्च केल्याशिवाय कधींही साध्य होणार नाहीं असा माझा पक्का समज आहे. बिछान्यावर शांतपणानें पड आणि आपल्या अंतःकरणाशीं संवाद कर असा एक महत्त्वाचा उपदेश आहे.

डोळ्यांत कधींही अश्रू न येतां जो नेहमीं भोजन करितो, त्याचप्रमाणें मध्यरात्रीच्या अमलांत बिछा-

न्यावर एकटा पडला असतां ज्याचें चित्त कधींही उद्विग्न जाहलेलें नाहीं, त्याला ईश्वराची खास ओळख नाहीं असें एका सुप्रसिद्ध कवीनें ह्मटलें आहे. हा कवी धर्मवेडा किंवा नीरस होता असें कधींही म्हणतां येणार नाहीं. त्याचप्रमाणें एका साधूनें म्हटलें आहे कीं सूर्यास्तापर्यंत आपला राग टिकूं देऊं नका. या वचनांवरून असें स्पष्ट दिसतें कीं कांहीं ठरींव वेळीं नैतिक दृष्टीनें आपल्या सर्व कृत्यांचा जमाखर्च करणें याचा मोठा उपयोग आहे. बहुतेक युरोपांतील देशांत विश्रांतीकरितां म्हणून जसा आठवड्यांत रविवार काढलेला आहे, त्याचप्रमाणें तो किंवा दुसरा कोणता तरी दिवस काढून त्याचा या कामीं उपयोग केला पाहिजे. यहुदी लोकांनीं शरीराला विश्रांति देण्याकरितां मूळ हा दिवस निराळा काढिला हें खरें; व धार्मिक कृत्यांबरोबरच याचा आरोग्यरक्षणाचे कामींही उपयोग होऊं लागला ही शहाणपणाचीच गोष्ट आहे. आतां व्यवहाराच्या सततच्या कांचणीपासून मुक्त होण्याची नियमित मुदतीनें एवढी मोठी संधि मिळत असतां, तिचा अंशतः उपयोग स्वतःची नैतिक तपासणी करण्याकरितां जर कोणीं केला नाहीं तर त्यास शहाणा ह्मणतां येणार नाहीं. स्कॉटलंड देशांतील लोक हा रविवारचा दिवस फार सक्त रीतीनें पाळतात म्हणून विदेशी लोक त्यांच्यावर फार टीका करितात; परंतु

स्कॉटलंडच्या लोकांची वर्तणूक जी सभ्य, गंभीर आणि विश्वसनीय असते, ती हे विश्रांतीचे दिवस ते शांतपणानें विचारांत घालवितात यामुळेंच असते, या गोष्टीचा त्यांनीं विचार करावयास पाहिजे. फ्रेंच लोकांचेंच उदाहरण घेऊं. या हौशी लोकांचे सर्व दिवस आयुष्यांतील व्यवहारांच्या धांदलींत जात असल्यामुळें, फार महत्त्वाच्या गोष्टींतही त्यांची वागणूक अस्थिर आणि छचोर होण्याचा संभव असतो, व तसें झालें तर खरें नैतिक श्रेष्ठत्व ते कधींही पावणार नाहींत. रविवारीं गाणें बंद ठेवून स्कॉटलंडमधले लोक आपल्या भक्तीला उग्र स्वरूप आणीत असतील; परंतु फ्रेंच लोकही जर या दिवशीं जरा जास्त नियमितपणानें वागतील, तर दुसऱ्या दिवशीं त्यांचें पाऊल सारखें उठून जगाच्या हंशास ते पात्र होणार नाहींत.

नैतिक तपासणीच्या नाजुक कर्तव्याबरोबरच स्वाभाविक रीतीनें भक्तीची आठवण होते. या शास्त्रीय प्रगतीच्या कालांत, प्रत्येक गोष्टीचें पृथक्करण करणें, वर्गीकरण करणें, विभाग करणें इत्यादि गोष्टींकडे मनुष्यांचें लक्ष लागल्यामुळें, ज्ञान हीच जगांत मुख्य गोष्ट आहे असें लोक बोलूं लागले आहेत. आतां ज्ञानाचीच आपल्याला विशेष आवश्यकता असेल तेव्हां ज्ञान म्हणजे शक्ति आहे ही गोष्ट खरी; परंतु जगांत ज्ञानापेक्षां जास्त योग्यतेच्या अशा

कांहीं गोष्टी आहेत. नेहमीं भासमान होणाऱ्या अशा कांहीं शक्ति आहेत, आणि नैतिक विषयांमध्यें उच्चपणाची लालसा हीच निःसंशय प्रधानशक्ति आहे, ज्ञान नव्हे. ईश्वरभक्ति हें या लालसेचें उपादान कारण आहे. ही लालसा नसेल तर मनुष्याचा आत्मा नीच अवस्थेंत असतो, त्याला उंच भरारी मारतां येत नाहीं; पिंजऱ्यांत घातलेल्या पक्ष्याप्रमाणें आपल्या तुरुंगाचे गज मोजणें, त्यांचे वर्ग करणें, यापेक्षां अन्य विषयांत त्याची गति होत नाहीं. मनुष्यानें या ब्रह्मांडाचें वैभव विसरावें, आणि आपल्या क्षुद्र देहाकरितां सृष्टीचे नियम आपल्या सोईला लागतील त्याप्रमाणें बदलण्याविषयीं ईश्वरापाशीं धरणें धरून बसावें असें आमचे बिलकूल म्हणणें नाहीं. ईश्वरी सूत्रें बदलावीं म्हणून ईश्वराची भक्ति करावयाची असें नाहीं, तर ईश्वरी इच्छेप्रमाणें आपली इच्छा व्हावी म्हणून भक्ति करावयाची. ईश्वरी सूत्रांमध्यें एकादी गोष्ट निश्चित तऱ्हेनें ठरली नसेल, तर त्या गोष्टीसंबंधानें आमच्या मागण्याचा भगवंताजवळ कितपत उपयोग होईल हें कधींच सांगतां येणार नाहीं. परंतु एवढें आम्हास माहीत आहे कीं, औदार्याचें जें मुख्य उत्पत्तिस्थान त्याच्याशीं आपला उदार स्वभाव जुळता ठेवण्यास अगदीं साहजिक आणि खातरीचा मार्ग म्हटला म्हणजे, ईश्वरस्वरूप आपली वृत्ति

करणें, आणि कार्याची कर्त्याविषयीं जी आदरबुद्धि पाहिजे, त्याप्रमाणें नम्रपणानें पूज्यबुद्धि बाळगणें हा आहे. ईश्वराची आराधना ज्या मानानें मनुष्याला करितां येईल; त्यावरून त्याच्या नैतिक स्वरूपाची खातरीनें पारख करतां येण्यासारखी आहे. जो नेहमीं मूर्खपणाचीं, खोटीं किंवा अधम कृत्यें करूनही ईश्वरापाशीं आशीर्वाद मागण्यास जाईल, तो मनुष्य अगदींच अडाणी असला पाहिजे. जुन्या काळच्या रानटी लोकांत मद्यपानानें धुंद होणें, किंवा कुंटणखान्यांत जाऊन पडणें या गोष्टी ईश्वराला नापसंत नाहींत अशी समज असेल; परंतु आमच्या धर्मसमजुती यापेक्षां पुष्कळ सुधारल्या आहेत, आणि सार्वत्रिक अनुभवावरून असें दिसतें कीं, मनोभावानें एकांतांत ईश्वराची स्तुति करणें, ही गोष्ट विषयी व आपमतलबी मनुष्यास मुळींच साध्य नाहीं. पोपटाप्रमाणें कांहीं ठरींव ईशस्तुतीचीं कवनें ह्मणणें म्हणजे आह्मी त्यास भक्ति समजत नाहीं, यासाठीं नेहमीं ईश्वराची प्रार्थना करणें ही गोष्ट तरुण मंडळीनें कधींही विसरूं नये. सौजन्याचें मुख्य उत्पत्तिस्थान जो ईश्वर त्याला नेहमीं नमून वागत जा. सौजन्यविरहित ज्ञानापासून मन संस्कृत न होतां केवळ अहंकार उत्पन्न होतो. या वृथाभिमानास व उन्मत्तपणास साहजिक, खातरीचें व जलद गुण करणारें औषध म्हटलें म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें

वागणें हेंच होय. प्रत्येक वेळीं भोजनाचे पूर्वी ईश्वराचें नामस्मरण करण्याची आपल्यामध्यें वहिवाट आहेच, त्याचप्रमाणें शोभेकरितां म्हणून नव्हे, तर तल्लीन आत्मा करून कोणतेंही महत्त्वाचें कृत्य करण्यांपूर्वी ईश्वराची प्रार्थना करीत जा म्हणजे झालें. ही संसारयात्रा मोठी कठिण आहे. या प्रवासांत प्रसंग येईल त्याप्रमाणें कोणतेंही कृत्य करा, परंतु तें करण्यापूर्वी भगवंताला तें मान्य होईल किंवा नाहीं याचा मात्र विचार करीत जा. तुमच्या हातांत तरवार असो किंवा लेखणी असो, तिचा उपयोग केवळ आपलें कसब दाखविण्याकरितां उन्मत्तपणानें किंवा बेपर्वाईनें करूं नका; आणि सुखातिशयाच्या वेळीं, त्याचप्रमाणें उदासीनतेच्या आणि निराशेच्या वेळीं देवाजवळ एवढेंच मागणें मागा कीं, हे देवा आम्हावर कृपादृष्टि ठेव आणि आम्हाला पूर्ण उन्नतावस्था येऊं दे.

समाप्त.